नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८१ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक १९ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## २४ तासांत कोरोनामुळे ४ जणांचा मृत्यू

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :**
देशात कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या झपाट्याने वाढत आहे. गेल्या २४ तासांत ४ मृत्यू झाले आहेत. महाराष्ट्रात २ आणि दिल्ली आणि केरळमध्ये प्रत्येकी १ रुग्णाचा मृत्यू झाला आहे.
आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून कोरोनामुळे ११३ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक मृत्यू केरळमध्ये ३६ आणि महाराष्ट्रात ३१ आहेत. दिल्लीमध्येही १३ जणांचा मृत्यू झाला आहे. देशातील ३२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कोरोनाचे ६४८३ सक्रिय रुग्ण आहेत. केरळमध्ये सर्वाधिक १३८४ रुग्ण आहेत. गुजरातमध्ये ११०५ सक्रिय रुग्ण आहेत आणि पश्चिम बंगालमध्ये ७४७ सक्रिय रुग्ण आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# अफलातून गडकरी

काही वर्षांपूर्वी राज साहेब ठाकरे यांनी टोल नाके बंद करण्यासाठी मोठेच आंदोलन केले होते. त्यावेळी अनेक ठिकाणचे टोलनाके बंद करण्यात आले होते. त्या प्रकरणानंतर कोणीही अगदी राज ठाकरे यांनी हे टोलनाक्या बाबतच्या प्रश्नावर कुणीही म्हणजे अगदी राज ठाकरे यांनीही काहीच म्हटले नव्हते. टोल नाक्यांवरील भुर्दंडाबाबत त्यानंतर कोणाचीही प्रतिक्रिया नव्हती. पण आज आमच्या कानावर विश्वास बसू नये. अशी एक आनंदवार्ता आलेली आहे. या विशेष वार्तेचे सामान्य जनांना फारसे काही देणे घेणे नाही. ही आनंद वार्ता चारचाकी वाहनांच्या मालकांसाठी आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा. नितीनजी गडकरी यांनी फक्त तीन हजार रुपयांमध्ये वर्षभर धावणाऱ्या चार चाकी खाजगी वाहनांना अवघ्या तीन हजारात वर्षभरासाठी टोलमुक्ती जाहीर केलेली आहे. ही योजना आगामी १५ ऑगस्टपासून लागू होणार आहे. १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला. त्याच दिवशी चारचाकी वाहनेही अगदी अल्प मुद्रा खर्च करून टोलमुक्त होणार आहेत. मुंबईपासून आता नागपूरकडे जायचे झाले. तर समृद्धी महामार्गावर एका वेळेला जाण्यासाठी साधारणपणे हजार रुपये खर्च येतो. ज्यांना वारंवार जायचे आहे. त्यांना फक्त तीन फेऱ्यांमध्ये आपला भरलेला टोल आणि त्या पैशांची वसुली याच योजनेमुळे होईल. ज्यांना ज्यांना अशा प्रकारच्या मार्गावरून वरचेवर किंवा वारंवार प्रवास करावयाचा आहे. त्यांच्यासाठी ही अत्यंत सुखदायी गोष्ट आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी वेगवेगळ्या प्रकारे वेगवेगळ्या योजना जनतेसाठी सुरू करीत असतात. भले ते रस्ते वाहतूक मंत्री असले. तरीही त्यांचे शेतीच्या प्रश्नांकडेही लक्ष असते. अगदी चौफेर नजर असतेच. शेतकरी सुखी होऊन चार पैसे त्याच्या हाती खेळावेत. किंबहुना शेतकऱ्याला आदर मिळावा. यासाठी ते सतत प्रयत्न करीत असतात. स्वयंचलित वाहनांना सध्या पेट्रोल-डिझेलवर बराच खर्च करावा लागतो. त्यासाठी त्यांनी देशात इलेक्ट्रिक व्हेईकल्स, म्हणजेच विजेवर चालणारी वाहने आणून पर्यावरणाचाही विचार केलेला आहे आणि खर्चही वाचवलेला आहे. अशा प्रकारे बहुआयामी विचार करणारे राजकारणातील नेते अत्यंत विरळेच असतात. अशाच नेत्यांपैकी माननीय गडकरी साहेब आहेत. ज्या नागपूर शहरामध्ये ते खासदार आहेत. त्या नागपूर शहरावर त्यांची चौफेर नजर असते. नागपूर शहरात खासदार सांस्कृतिक महोत्सव, खासदार क्रीडा महोत्सव, जेष्ठ नागरिकांसाठी मोफत तीर्थयात्रा योजना आणि अशा प्रकारच्या कितीतरी आनंददायी निव्वळ घोषणा नव्हे. तर योजना अंमलात आणून त्यांनी प्रत्यक्षात त्याचा अनुभव कित्येक जणांना दिला आहे. या अशा उपक्रमामुळे त्यांची लोकप्रियता निश्चितच वाढलेली दिसून येते. अडल्यानडलेल्यांना मदत करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. या ठिकाणी पक्ष, जात, पंथ, वर्ण याचा जराही विचार न करता कायदेशीर मार्गाने जे जे शक्य होईल. तेवढे अत्यंत कळकळीने करण्याचा त्यांचा निर्धार असतो. आपल्या खासदार कसा असावा. यावर जर निबंध लिहायचा झाल्यास, त्यांच्या मतदार संघातील विद्यार्थी आणि जनता खासदार नितीन गडकरी यांच्यासारखा असावा. असे खुलेपणाने कोणताही आडपडदा न ठेवता लिहू शकतील. आठवड्यातून पाच दिवस ते दिल्लीवासी अथवा भारतवासी असतात. आसेतूहिमालय त्यांची भ्रमंती सुरू असते. एक म्हण आहे, घार हिंडते आकाशी, परंतु लक्ष तिचे पिल्लापाशी अशी त्यांची लक्षणीय नजर आणि दृष्टिकोन असतो. थोडासा अपवाद सोडल्यास आठवड्यातून दीड ते दोन दिवस ते शंभर टक्के नागपूरकरांचे असतातच. अशा आपल्या लोकप्रिय नितीनजी गडकरी यांनी आता ३००० रुपयात वर्षभर फास्ट ट्रॅगची घोषणा करून चार चाकी वाहने असलेल्या खाजगी वाहनधारकांना जवळजवळ टोल मुक्तीच बहाल केली आहे. असे म्हटले तर अजिबात वावगे ठरणार नाही. त्यामुळेच आता आपल्या नागपूरच्या खासदारांनी संपूर्ण भारत वर्षाच्या खासगी चारचाकीं साठी आणि खाजगी वाहन मालकांना सवलत देण्यासाठी 'खास-दार' खुले केलेले आहे. त्यामुळे त्यांचेच खास अभिनंदन करून त्यांनी अशाच जनताभिमुख योजना पुढेही आणाव्यात. तशा ते आणतीलच. माननीय नितीनजी गडकरी हे अफलातून गडकरी आहेत. त्यामुळेच संपूर्ण भारतभरात त्यांचे चाहते आहेत. आम्हाला त्यांच्या विकास दृष्टीबद्दल परिपूर्ण खात्री आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# भारत-कॅनडा संबंध महत्वाचे

### जी ७ शिखर परिषदेत मोदींची कबुली : भारत-कॅनडा उच्चायुक्तांना पुन्हा नियुक्त करण्यास सहमती

**■ वृत्तसंस्था**
**अल्बर्टा, दि. १८ :**
बुधवारी सकाळी कॅनडातील कनानास्किस येथे झालेल्या जी ७ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी पाहुणे राष्ट्र म्हणून सहभागी झाले. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी मोदींचे स्वागत केले. त्यानंतर दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली.
बैठकीनंतर मोदी म्हणाले, भारत आणि कॅनडामधील संबंध खूप महत्वाचे आहेत. भारताला जी ७ मध्ये आमंत्रित केल्याबद्दल मी तुमचा (कॅनडाच्या पंतप्रधानांचा) खूप आभारी आहे. मी भाग्यवान आहे की मला २०१५ नंतर पुन्हा एकदा कॅनडामध्ये येऊन कॅनडाच्या लोकांशी संपर्क साधण्याची संधी मिळाली.



मोदींनी मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली.

यासह, भारत आणि कॅनडामध्ये उच्चायुक्तांना पुन्हा नियुक्त करण्यासाठी करार झाला आहे. खरं तर, दहशतवादी निज्जर हत्याकांडानंतर, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये, दोन्ही देशांनी प्रत्येकी ६ राजदूतांना देशातून काढून टाकले होते.
मोदी शिखर परिषदेत जागतिक नेत्यांनाही भेटले. यामध्ये फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ, मेक्सिकन अध्यक्ष क्लॉडिया शेनबॉम पारडो, ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा, दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग यांचा समावेश होता. यानंतर पंतप्रधान मोदी क्रोएशियाला रवाना झाले.

### तीन कोटींचा बक्षीसी नक्षल नेता

# गर्जला रवीचा खात्मा

### चलपतीची पत्नी अरुणाही चकमकीत ठार

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**
सहा राज्यात मोस्ट वांटेड असलेला जहाल नक्षल नेता तसेच नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य गर्जला रवी उर्फ उदय याला ठार करण्यात आंध्रप्रदेश पोलिसांना यश आले आहे.

चकमकीत रविसह नक्षल नेता चलपती याची पत्नी रावी व्यंकट चैतन्य उर्फ अरुणा आणि अंजु या दोघींचाही खात्मा करण्यात आला. १८ जून रोजी आंध्रप्रदेशच्या अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातील मारडपल्ली जंगलात ही चकमक झाली. विविध राज्यात मिळून गजर्ला रवीच्या डोक्यावर ३ कोटींचे बक्षीस होते.

अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातील मारडपल्लीच्या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांच्या हालचाली वाढल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. यावरून १८ जून रोजी विशेष नक्षलविरोधी पथक ग्रेहाउंड्सच्या जवानांनी या परिसरात शोधमोहीम राबवली होती.

दरम्यान, पहाटे सहा वाजताच्या सुमारास नक्षल्यांनी पोलिसाच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनी दिलेल्या प्रत्युत्तरात केंद्रीय समिती सदस्य गजर्ला रवी उर्फ उदय, झोनल समिती सदस्य अरुणा उर्फ रावी व्यंकट चैतन्य आणि प्लाटून सदस्य अंजु ठार झाले.

गर्जला रवी ऊर्फ उदय हा नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य होता. त्याचा खात्मा झाल्याने नक्षलवादी चळवळीला जबर हादरा बसला आहे. नक्षलवाद्यांनी केलेल्या अनेक मोठ्या हल्ल्यांमागे त्याचा



हात होता. मूळचा तेलंगणातील रहिवासी असलेल्या रवी उर्फ उदयवर आंध्रप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा, महाराष्ट्र आणि झारखंड या सहा राज्यांमध्ये मिळून तीन कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

रवी नक्षलवाद्यांच्या आंध्रा-ओरिसा बॉर्डर समितीचा सचिव तसेच आंध्र प्रदेश स्पेशल झोनल समितीचा सदस्य म्हणूनही कार्यरत होता. तीन राज्यांच्या सीमावर्ती भागांमध्ये त्याचा मोठा प्रभाव होता. त्याच्यासोबत अरुणालाही जवानांनी ठार केले. ती नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समिती सदस्य चलपती याची पत्नी होती. तसेच, ती वरिष्ठ नक्षलवादी नेता चेरकुरी राजकुमार ऊर्फ आझादची बहीण होती. तिच्यावरही ५० लाख रुपयांचे बक्षीस होते.

छत्तीसगडमधील अबुजमाड आणि इंद्रावती नॅशनल पार्क भागात सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या आक्रमक कारवायांमुळे नक्षल चळवळीतील नेते शेजारच्या राज्यात स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे तेलंगाना, आंध्र प्रदेशमध्ये नक्षल कारवाया वाढल्या आहे. विशेष म्हणजे, वरिष्ठ नक्षल नेतेही लपण्यासाठी सुरक्षित ठिकाणांच्या मागावर आहे.

# पाऊले चालती पंढरीची वाट..

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते पादुका पूजन
### संत तुकारामांच्या पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान



**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :**
जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीने आज हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत आषाढी वारीसाठी पंढरीच्या दिशेने प्रस्थान केले. देहू गावापासून निघालेल्या या पालखीत विठ्ठल-रखुमाईच्या भेटीची ओढ असणाऱ्या हजारो वारकऱ्यांचा समावेश आहे.

संत तुकाराम महाराज यांचा यंदाचा हा ३४० वा पालखी प्रस्थान सोहळा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते संत तुकारामांच्या पादुकांचे पूजन झाले. त्यानंतर तुकोबांची पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान झाले. ८

ढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येने वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, आमदार विजय शिवतारे, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्वस्त ह.भ.प.विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी, येथील मुख्य मंदिराजवळील शिळा मंदिराच्या समोर वारकऱ्यांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला. यावेळी टाळ- मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकोबांचे नामस्मरण केले जात होते. श्री संत तुकाराम महाराज संस्थानने यंदाच्या सोहळ्यासाठी ३ बैलजोड्या खरेदी केल्या आहेत.

**वारकरी - पोलिसांत चकमक**

मुख्यमंत्र्याच्या हस्ते पादुका पूजन होत असताना पोलिसांनी वारकऱ्यांच्या दिंड्या काहीवेळ रोखून धरल्या होत्या. यामुळे वारकरी चांगलेच संतप्त झाले. त्यांची पोलिसांशी शाब्दिक चकमक झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या घटनेची पुष्टी करत दिंड्या थांबवण्याचे कारण सांगितले. वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी हा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

# दिल्लीहून बालीला जाणारे एअर इंडियाचे विमान परतले

### विमानतळाजवळ ज्वालामुखीचा उद्रेक

**■ वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १८ :**
एअर इंडियाचे दिल्ली ते बाली हे विमान एआय २१४५ अर्ध्या मार्गातूनच दिल्लीला परतले आहे. बाली विमानतळाजवळ ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याच्या वृत्तामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले.

यापूर्वी मंगळवारी एअर इंडियाचे ७ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली होती. यामध्ये अहमदाबाद-लंडन, दिल्ली-पॅरिस, दिल्ली-व्हिएन्ना, लंडन-अमृतसर, दिल्ली-दुबई, बेंगळुरू-लंडन आणि सॅन फ्रान्सिस्को-मुंबई या विमानांचा समावेश होता. १२ ते १७ जून दरम्यान एअर इंडियाचे ६६ उड्डाणे रद्द करण्यात आलीत.




# राज ठाकरेंशी युती केल्यास फायदाच!

### 'मातोश्री'वरील बैठकीत माजी नगरसेवकांचा सूर

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती होण्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे.

याबाबत दोन्ही पक्षाच्या प्रमुखांनी सध्या मौन पाळले असले तरी नेते आणि पदाधिकारी यांनी युतीची तयारी देखील सुरू केली आहे. अशातच उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील माजी नगरसेवकांची बैठक घेतली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या सोबत युती करावी का? याबाबत प्रश्न माजी नगरसेवकांना प्रश्न विचारला आहे.

माजी नगरसेवकांसोबत उद्धव ठाकरे यांच्या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच मनसे सोबत युती करायची की नाही? याबाबतही उद्धव ठाकरे यांनी विचारणा केली. राज ठाकरे यांच्या पक्षासोबत युती केली तर फायदाच होईल, अशी कबूली या माजी नगरसेवकांनी दिली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुढील काळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतात का? याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

मुंबई महा नगरपालिकेसाठी आपल्याला ज्या



पक्षासोबत युती करायची आहे, त्यासाठी तुम्हाला विश्वासात घेऊनच निर्णय घेईल, असा शब्द देखील उद्धव ठाकरे यांनी सर्व माजी नगरसेवकांना दिला आहे.

तुम्ही शिवसेनेसोबत राहिलात आणि निष्ठावंत आहात. त्यामुळे आगामी काळात अनेक बैठक आपल्याला घ्यायच्या आहेत. माजी नगरसेवकांनी शिवसेना भवन येथे येऊन सामान्यांचे प्रश्न सोडवण्याची मागणी देखील त्यांनी केली. शिवसेना भवन येथे निवडणूक कार्यालय उघडणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी माजी नगरसेवकांना सांगितले. राज्यात ऑक्टोबर ते नोव्हेंबर मध्ये निवडणूक लागू शकते, असा अंदाज देखील उद्धव ठाकरे यांनी बैठकीत बोलून दाखवला.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर पोलीस ताफ्याचा अपघात

### १२ आरोपींसह १९ पोलीस जखमी

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील भातान बोगद्याजवळ एक मोठा अपघात घडला. अनधिकृतपणे भारतात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांना पुणे या ठिकाणी नेत असताना १९ पोलिस वाहनांच्या ताफ्यातील काही गाड्यांचा अपघात झाला. या दुर्घटनेत तब्बल ३१ जण जखमी झाले असून, त्यात १९ पोलिस कर्मचारी आणि १२ बांगलादेशी आरोपींचा समावेश आहे.

देशात अनधिकृत वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींना पुणे येथे घेऊन जाण्यासाठी १९ पोलिस वाहनांचा ताफा निघाला होता. या वाहनांत एकूण १६० बांगलादेशी होते. हा ताफा भातान बोगद्यात आला असता ही घटना घडली.



## लुंगी नको घालू तर आता काय मी उघडा फिरू का?



**पुणे :** माळेगाव साखर कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सहकार बचाव पॅनल प्रमुख चंद्रराव तावरे यांच्यात चांगलीच जुंपली आहे. ८५ वर्षे झाली तरी थांबायला तयार नाही, असं अजित पवार चंद्रराव तावरे यांना उद्देशून म्हणाले होते. त्यानंतर आता अजित पवार यांच्या याच विधानाचा समाचार चंद्रराव तावरे यांनी घेतला आहे. मी १०० वर्षे जगणार आहे. तोपर्यंत मी निवडणूक लढवणार आहे, अजित पवार यांचा कारखान्याचा अनुभव २५ वर्षे आहे. तर या क्षेत्रात माझा अनुभव हा ६५ वर्षांचा आहे, असं चंद्रराव म्हणाले.

चंद्रराव तावरे यांच्यावर टीका करताना हे बाबा ८५ वर्षे झाले तरी थांबायला तयार नाहीत. आता त्यांना पयजामा सोडलाय आणि लुंगी घालायला सुरुवात केली, अशी खिल्ली अजित पवार यांनी उडवली होती. त्याला उत्तर म्हणून माझा अपघात झाला होता. माझा गुडघ्याचा बॉल बदलला आहे. मला पाय वळवता येत नसल्याने पायजमा घालता येत नाही. त्यामुळे मी लुंगी घालतोय. आता काय मी उघडा फिरू का? असा सवालही चंद्रराव तावरे यांनी अजितदादांना केलाय.

## मराठी माणसासाठी काँग्रेस मैदानात



**मुंबई :** मराठी भाषा आणि मराठी माणसासाठी कायमच मैदानात उतरणाऱ्या शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना नंतर आता काँग्रेसने देखील मराठीचा मुद्दा उचलला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पहिली ते पाचवी तील विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. फडणवीस यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या आणि माय मराठीच्या छातीत सुरा खूपसून घात केला असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला आहे.

संघ आणि भाजपचा 'एक राष्ट्र, एक भाषा, एक संस्कृती' हा अजेंडा महाराष्ट्राच्या मुळावर उठला असून तो झुगारून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा सपकाळ यांनी दिला आहे. वारंवार बाळासाहेब ठाकरेंचे नाव घेणाऱ्या शिंदे गटाकडेच शिक्षणखातं असून त्यांनी शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला तशाच प्रकारे मराठीचा खून पाडण्याची सुपारी घेतली आहे. अजित पवार सत्तेसाठी इतके लाचार आहेत की त्यांना तर महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी माणूस जगले काय मेले काय ? याच्याशी काही देणे घेणे नाही. फक्त आपल्याला अर्थखातं मिळावे हेच अजित पवारांचे धोरण आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.

## धुळे प्रकरणावरून संजय राऊत यांचे सीएम देवेंद्र फडणवीसांना पत्र



**मुंबई :** धुळे जिल्ह्यातील शासकीय विश्राम गृहाच्या खोलीत सापडलेल्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकरणी उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करावी, तसेच यात तपास झाल्यास सगळ्या गोष्टी बाहेर येतील, असा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे.

धुळे जिल्ह्यातील शासकीय विश्राम गृहामध्ये अंदाज समितीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये गोळा करण्यात आले असल्याचा आरोप या आधी देखील करण्यात आला होता. या प्रकरणांत सापडलेले पैशा संदर्भात केवळ साधा गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाची ईडीच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी देखील संजय राऊत यांनी केली होती. आता या प्रकरणात समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्यावर संजय राऊत यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत.

## अल्पवयीन मुलाचा शॉक देऊन खून

**कोल्हापूर :** मदरसा बंद पडावा आपल्याला गावी जाता यावे म्हणून एका अल्पवयीन मुलाने दुसऱ्या अल्पवयीन मुलाची शॉक देऊन हत्या केली. फैजान नाजिमा असे मृत मुलाचे नाव असून तो बिहारचा रहिवासी होता. हत्या झालेला फैजान नजीमा आणि हत्या करणारा हे दोघेही बिहारचे होते. हत्या करणाऱ्या विद्यार्थ्याला बिहारमधील आपल्या गावी जायचे होते. त्यासाठी ही संस्था बंद पडावी, या उद्देशाने त्याने फैजानची शॉक देऊन हत्या केली. इलेक्ट्रिक वायरच्या सहाय्याने शॉक देऊन हत्या केल्याची कबुली या विद्यार्थ्याने दिली असून, पोलीस तपास सुरू आहे.

# राज ठाकरेंचा दोन भाषांचा आग्रह चुकीचा

### देशात ३ भाषांचे सूत्र असेल, तर महाराष्ट्र द्विभाषा सूत्रावर जाऊ शकत नाही : फडणवीसांची स्पष्टोक्ती



**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेला दोन भाषांचा आग्रह चुकीचा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले. संपूर्ण देशात नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत (एनईपी) ३ भाषांचे सूत्र लागू असेल, तर महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते आज बुधवारी पिंपरी चिंचवड येथील संतपीठाचे उद्घाटन झाले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी हिंदीच्या सक्तीवर राज ठाकरे यांनी घेतलेला आक्षेप जोरकसपणे फेटाळून लावला.

ते म्हणाले, माझी राज ठाकरेंशी चर्चा झाली. त्यांचा आग्रह आहे की, दोनच भाषा असल्या पाहिजेत. तिसरी भाषा असू नये. मी त्यांना हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, केंद्र सरकारने विचारपूर्वक एनईपीमध्ये तीन भाषांचे सूत्र आणले आहे. देशभरात ३ भाषांचे सूत्र असेल, तर महाराष्ट्रात दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही.

एनईपी संपूर्ण देशासाठी आहे. तामिळनाडूने ३ भाषांच्या सूत्राला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. पण कोर्टाने त्यांची याचिका फेटाळली.

ते पुढे म्हणाले, आपल्या देशातील एखादी अधिकची भाषा शिकण्यात वाईट काय आहे? आपल्या भाषेला डावलण्यात आले असेल तर वेगळी गोष्ट? पण आपली भाषा शिकत असताना आपली मुले दुसरी एखादी भाषा अजून शिकत असतील, तर त्या भाषेतील ज्ञानही त्यांच्यापर्यंत पोहोचेल. त्यामुळे राज ठाकरे यांनी केलेला दोन भाषेचा आग्रह चुकीचा आहे.

एनईपी केंद्र सरकारने एकट्याने तयार केली नाही. देशभरातील तज्ज्ञांनी मिळून ती तयार केली. ती करत असताना मुलांचा मेंदू कसा विकसित होतो, आदी बाबींचा सखोल विचार करण्यात आला. हे धोरण तयार करताना ३ वर्षे चर्चा झाली. त्यावर हरकती व सूचना मागवण्यात आल्या. त्यानंतर ३ भाषेचे सूत्र स्वीकारण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले, हिंदी भाषा आपण यापूर्वी अनिवार्य केली होती. पण काल काढलेल्या जीआरद्वारे ही अनिवार्यता काढून टाकण्यात आली आहे. आता आपण असे म्हटले आहे की, कुठलीही तिसरी भारतीय भाषा तुम्हाला शिकता येईल.

३ भाषेच्या सूत्राचा नवीन शैक्षणिक धोरणात समावेश करण्यात आला आहे. त्यात मातृभाषा ही अनिवार्य आहे. त्याशिवाय दोन भाषा व त्यातील एक भारतीय भाषा असावी असे हे सूत्र आहे. यापैकी एक भाषा म्हणून लोक इंग्रजीला प्राधान्य देतात. त्यानंतर कुठलीही एक भारतीय भाषा म्हणून हिंदी म्हटले होते. कारण, आपल्याकडे हिंदीचे शिक्षक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतात. पण आता आपण ती अनिवार्यता काढून टाकली आहे.

आपण सर्वजण इंग्रजीचा पुरस्कार करतो आणि भारतीय भाषांचा तिरस्कार करतो, हे योग्य नाही. भारतीय भाषा इंग्रजीहून चांगल्या आहेत. इंग्रजी ही व्यवहार्य भाषा झाली आहे हे ठीक आहे. पण नव्या शैक्षणिक धोरणामुळे मराठीला ज्ञानभाषा बनवण्याचा मार्ग खुला झाला आहे.

आता आपण इंजिनिअरिंगचे शिक्षण मराठीत शिकवायला लागलो. यापूर्वी असे होत नव्हते. वैद्यकीय क्षेत्राचे शिक्षणही मराठीत दिले जात आहे. एमबीएही मराठीत शिकवले जात आहे. म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणामुळे मराठीला वैश्विक भाषा, ज्ञान भाषा व अर्थकारणाची भाषा बनण्याचे दालन उघडे झाले आहे. महाराष्ट्र सरकारने ते स्वीकारले आहे, असे फडणवीस यावेळी म्हणाले.

## हिंदीच्या भाषा सक्तीवर राज ठाकरे आक्रमक



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** आपण हिंदू आहोत हिंदी नाही, अशा शब्दात राज ठाकरे यांनी हिंदीची सक्ती महाराष्ट्रात का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. मराठी भाषेची सक्ती दक्षिण भारतातील राज्यात कराल का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. आज भाषा सक्ती करत आहात, उद्या इतरही सक्ती होऊ शकते. म्हातारी मेल्याचे दुःख नाही मात्र काळ सोकावला जाईल, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात राज ठाकरे यांनी सरकारला दिलेली पत्र देखील त्यांनी वाचून दाखवले. तसेच त्यांनी राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना पत्र लिहिले असून राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. या निर्णयामागे आयएएस लॉबी असण्याची शंका त्यांनी उपस्थित केली आहे.

यासंबंधी महाराष्ट्रातील सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांना राज ठाकरे यांनी पत्र लिहिले आहे. राज ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हिंदी भाषा सक्तीची करणार नाही, याबाबत आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बोलणे चालू होते. आपण हिंदीची सक्ती करणार नसल्याचे तसेच हा निर्णय मागे घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते, असा दावा देखील राज ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळे आता राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना आज माझे पत्र जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.

सरकारला हिंदी भाषा का लागत आहे? सरकारच्या या निर्णयामागे आयएएस लॉबीचा दबाव आहे का? गुजरातमध्ये हिंदी सक्तीची नाही, मग महाराष्ट्रावर का लादत आहात? केंद्रात नरेंद्र मोदी आणि अमित शहा असताना गुजरातमध्ये हिंदी सक्तीची का नाही? अनेक राज्यात हिंदीची सक्ती नाही. महाराष्ट्रात असे धोरण का लादले जाते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सर्व भाषा या चांगल्याच असतात. एक भाषा उभी करण्यासाठी कित्येक पिढ्या खर्ची होतात. मात्र लहान लेकरांवर हिंदीची सक्ती लागता येणार नाही, केंद्राच्या धोरणात सक्तीचा कोणताच उल्लेख नाही. मग राज्य सरकार असे निर्णय का घेत आहेत? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी केंद्राच्या निर्णयावर देखील बोट ठेवले. शिक्षणासंबंधीच्या धोरणात तसा उल्लेख असल्याचे खोटे सांगितले जात असल्याचेही ते म्हणाले.

आज हा विषय लादला गेला तर ते मराठीचे अस्तित्व संपवून टाकतील, अशी भीती देखील राज ठाकरे यांनी उपस्थित केली. त्यामुळे या संदर्भात सर्व पत्रकार, संपादक, लेखक, शाळांचे मुख्याध्यापक, राजकीय पक्ष, पालक यांनी या गोष्टीचा विरोधी करण्याचे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.

## स्थानिक निवडणुकांसाठी भाजपचा मेगा मास्टरप्लॅन

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चाहूल लागलेली असताना, भाजपने मोठा राजकीय मास्टरप्लॅन तयार केला आहे. महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये निर्णायक विजयासाठी भाजपने पक्षप्रवेशाचा धडाका लावण्याचे नियोजन सुरू केले आहे. यामार्फत महाविकास आघाडीतील नाराज नेत्यांना गळाला लावून, नाशिकसह मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात आघाडीला मोठे भगदाड पाडण्याचा भाजपचा डाव आहे.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे, पुढील काही महिन्यांत दर आठवड्याला छोटे-मोठे पक्षप्रवेशाचे कार्यक्रम आयोजित केले जातील. हे प्रवेश 'सामान्य' नसतील, तर महाविकास आघाडीतील बडे चेहरे आणि नाराज गटांवर थेट लक्ष केंद्रित करून भाजप त्यांना आपल्या गोटात खेचणार आहे.

सध्या महाविकास आघाडीत अंतर्गत मतभेद आणि नाराजीचं वातावरण आहे. याचा फायदा घेण्यासाठी भाजपने हालचाली सुरू केल्या असून, महाविकास आघाडीतील काही नामांकित नेते भाजपच्या संपर्कात असल्याचेही भाजपच्या गोटातून संकेत मिळाले आहेत. काही नेत्यांच्या चर्चा अंतिम टप्प्यात आहेत, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष पक्षप्रवेशाची तारीखही ठरवली गेली आहे.

नाशिक, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र हे चार प्रमुख विभाग भाजपच्या नव्या ह्यस्पॉट टार्गेटिंगह्ण रणनीतीचा केंद्रबिंदू ठरणार आहेत. या भागांत महाविकास आघाडीला मजबूत संघटनात्मक उपस्थिती आहे, त्यामुळेच भाजपने तेथील नाराज गटांना आपल्याकडे खेचण्याचे धोरण आखले आहे. या भागांत भविष्यात भाजपचे स्थानिक नेते अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मुंबईत गती

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** मुंबई उपनगरातील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन (एसआरए) योजनांमध्ये मोठा निर्णायक बदल घडला आहे. रहिवाशांना भाडे न देणाऱ्या व काम थांबवलेल्या ८६ विकासकांचे अधिकार संपुष्टात आणण्यात आले असून, आता नागरिकांना नवीन विकासक नियुक्त करण्याचा मार्ग खुले झाला आहे. या निर्णयामुळे वषार्नुवर्षे घरांच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो मुंबईकरांना दिलासा मिळणार आहे.

मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज एसआरए कार्यालयात भेट देत उपनगरातील रखडलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी एसआरएचे सीईओ महेंद्र कल्याणकर व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारी, रखडलेली कामे आणि भाडे न मिळाल्याची परिस्थिती शेलार यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.

मुंबईतील एसआरए योजनेतील रहिवाशांचे साल 2022 पासून 880 कोटी रुपये थकित भाडे विकासकांकडे होते. यापैकी 601.50 कोटी वसूल करण्यात आले असून, 279 कोटी रुपये अजूनही थकित आहेत.

एसआरएने 86 रखडलेल्या प्रकल्पांतील विकासकांना कायदेशीर नोटिसा पाठवून त्यांचे अधिकार संपुष्टात आणण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. यामुळे आता या प्रकल्पांमध्ये नवीन विकासकांची नियुक्ती शक्य होणार आहे. शासनाच्या प्रभावी हस्तक्षेपामुळे केवळ दोन महिन्यांत 552 कोटी रुपयांची वसुली झाली.

## सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीचा 'स्ट्रक्चरल ऑडिट' आदेश

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** राज्यातील २५ वर्षांहून जुने असलेले सर्व पूल, साकव आणि शासकीय इमारती यांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करा आणि वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करा, अशा स्पष्ट सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी आज दिल्या.



राज्यात काही दिवसांपासून पूल व इमारतींच्या दुर्घटनांचे प्रमाण वाढले आहे. याच पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरक्षेच्या दृष्टीने जुन्या व कालबाह्य रचनांची तांत्रिक तपासणी (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्याची जबाबदारी घेतली आहे. या माध्यमातून धोका असलेल्या रचना ओळखून त्याबाबत दुरुस्ती किंवा पाडण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

पंढरपूर आषाढी वारीस अवघे काही दिवस उरले असताना, वारी मार्गावर कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी खड्डेमुक्त रस्ते, वाहतुकीला अडथळा न येणाऱ्या व्यवस्था आणि अपघात टाळण्यासाठी संरक्षक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठीही विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही भोसले यांनी स्पष्ट केले.

२५ वर्षांहून जुने सर्व पूल, साकव, इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट अनिवार्य, धोका निर्माण करणाऱ्या रचना तत्काळ रिकाम्या करून आवश्यक ती कार्यवाही करा, वारी मार्गावर सर्व रस्ते खड्डेमुक्त करा; वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही याची दक्षता घ्या, मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवा, प्रत्येक भागाचा अहवाल तयार करून मुख्यालयाला सादर करा, असे निर्देश दिले.

मंत्री भोसले म्हणाले, ह्यरस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारती या केवळ संरचना नाहीत, तर त्या जनतेच्या सुरक्षेशी निगडीत आहेत. त्यामध्ये दुर्लक्ष होणे हे प्रशासनासाठी परवडणारे नाही. यामुळेच सरकारने आता संपूर्ण राज्यभर ह्यसुरक्षित रचना सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेची सुरुवात केल्याचे स्पष्ट होत आहे.

## ४ जिल्ह्यात उबाठा गटाला खिंडार



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, चंद्रपूर, नंदुरबार आणि धाराशीव जिल्ह्यातील उबाठा पक्षाच्या माजी नगरसेवकांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे या चार जिल्ह्यात उबाठाला खिंडार पडले आहे.

पुणे जिल्हा काँग्रेस प्रदेश सचिव सोनाली मारणे, नगरसेवक राहुल तुपेरे, काँग्रेस शहर सरचिटणीस किरण मारणे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंगल पवार, गिरीश जैवळ यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावती नगर परिषदेतील माजी उपाध्यक्ष प्रफुल्ल चटकी, माजी नगरसेवक सुधीर सातपुते, प्रमोद गेडाम, अनिता गेडाम, राजू सारंगधर, चंद्रकांत खारकर, शोभा पारखी, शीतल गेडाम, प्रतिभा सोनटक्के, आशा निबांळकर आणि प्रदीप वडाळ्कर या 11 माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

धाराशीवमधील सोमनाथ गुट्टे, आप्पासाहेब बिराजदार, शंकर चव्हाण, नागनाथ कदम, इलाई शेख, शहाजी हाके यांनी शिवसेनेत प्रवेश केला. नंदुरबार जिल्ह्याचे उबाठा उपजिल्हाप्रमुख शंकर दर्जी, नगरसेवक गणेश वडनेरे, मनोज बोरसे, राहुल टीभे, गोविंद मोरे यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला.

## सातारा जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ

### चिपळूण मार्ग पाण्याखाली : पर्यायी पूल गेला वाहून



**■ वृत्तसंस्था, सातारा, दि. १८ :** कोयना धरण पाणलोट क्षेत्रात सोमवारी जणू आभाळ फाटल्यासारखा पाऊस झाला. कोयनानगर नवजा आणि महाबळेश्वर या ठिकाणी मिळून तब्बल २७० मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

धरणातील पाण्याची आवक १२ हजार क्युसेकवर गेली असून धरणातील पाणीसाठ्यात दोन टीएमसीने वाढ झाली आहे. दरम्यान, वाजेगाव येथील ओढ्याच्या पाण्याने कच्चा रस्ता वाहून गेल्याने कराड-चिपळूण मार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे.

मागील चोवीस तासात कोयनानगरमध्ये सर्वाधिक १०४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असताना काल ९५ मिलिमीटर पाऊस झाला. पावसामुळे वाजेगाव (ता. पाटण) येथील ओढ्याला मोठ्या प्रमाणात पाणी आलं. पाण्याच्या प्रचंड दाबाने वाजेगाव हद्दीतील कच्चा रस्ता वाहून गेला आणि कराड-चिपळूण मार्ग ठप्प झाला.

कोयनातील पाण्याची आवक दहा पटीने वाढली

कोयना धरण पाणलोट क्षेत्रात धुवाधार पाऊस कोसळत आहे. दिवसभरात तब्बल २०७० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. कोयनानगरमध्ये ९५ मिलीमीटर, नवजा येथे ८५ तर महाबळेश्वरला ९० मिलीमीटर पाऊस झाला आहे. दमदार पावसामुळे कोयना धरणातील पाण्याची आवक दहा पटीने वाढली आहे. सध्या धरणात प्रति सेकंद १२,५३८ क्युसेक वेगाने पाणी येत आहे.

कोयना धरणात सोमवारी सकाळी ८ वाजता १७.४३ एवढा उपयुक्त पाणीसाठा होता, तर पाण्याची आवक १,३३६ क्युसेक्स होती. मात्र, मुसळधार पावसामुळे पाण्याची आवक १२,५३८ क्युसेकवर पोहोचल्याने पाणीसाठ्यात तब्बल दोन टीएमसी इतकी वाढ झाली. त्यामुळे पाणीसाठा १९.४ टीएमसी झाला आहे.

पावसामुळे रस्ते आणि शेतांची तळी झाल्याचे पाहायला मिळत आहे शेतीच्या कामावर देखील पावसामुळे मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी मशागती ही पूर्ण झालेल्या नाहीत. पेरणीची इतर कामे पावसामुळे खोळंबल्याने खरीप हंगाम खडतर जाणार असल्याची चिन्हे आहेत.

# 'आभाळमाया', आणि 'खोल खोल दुष्काळ डोळे' चा गौरव

### साहित्य अकादमीचे पुरस्कार जाहीर



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** साहित्य अकादमीचे २३ भारतीय भाषांमधील पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत आणि तरुण लेखक प्रदीप कोकरे यांना पुरस्कार जाहीर झाला. डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया'चा बालवाड्.मय पुरस्कार, प्रदीप कोकरे यांच्या खोल खोल दुष्काळ डोळे कादंबरीला युवावाड्.मय पुरस्कार जाहीर झाला.

नांदेडचे डॉक्टर सुरेश सावंत यांनी आजवर ४० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. प्रदीप कोकरे यांनी मुंबईच्या गिरणी कामगार संपाच्या नंतरचे जीवन, वाढती बेकारी आणि ग्रामीण भागातून नागर जीवनात येऊन स्थिर होऊ पाहणाऱ्या युवकांचे जग आपल्या कादंबरीमध्ये टिपलेले आहे.

**डॉ. सावंतांचे विपुल लेखन**

डॉ. सुरेश सावंत यांनी कथा, कविता, कादंबरी, चरित्र, बालसाहित्य अशा साऱ्या कलाकृतींच्या क्षेत्रात मुशाफिरी केली आहे. त्यांच्या बालकवितेवर विद्यार्थ्यांनी एम. फिल.चे प्रबंध लिहिले. डॉ. सावंत यांचा राष्ट्रपती पुरस्कारासह महाराष्ट्र राज्य शासनाच्या उत्कृष्ट वाड्.मयनिर्मिती पुरस्काराने तीनवेळेस गौरव झाला. जळगाव येथे नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. सावंत यांनी भूषविले होते.

**कोकरे कवी म्हणूनही प्रसिद्ध**

प्रदीप कोकरे मुंबईतल्या वडाळ्याचे. मुंबई विद्यापीठातून ते मराठीतून एम. ए. झालेत. ते कवी म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कविता युगवाणी, खेळ, मुक्त शब्द, अभिधानंतर, कवितारती, लोकसत्ता, काव्याग्रह, वर्णमुद्रा इत्यादी नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या.

लोकवाड्.मय गृह प्रकाशन संस्थेचे सहाय्यक संपादक म्हणून सुद्धा त्यांनी काही काळ काम पाहिले. कोकरे यांचा मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे प्रतिष्ठित वृत्तपत्र पुरस्काराने गौरव झाला आहे. त्यांच्या खोल खोल दुष्काळ डोळे या कादंबरीस २०२२-२०२३ सालची शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन लिटरेचर ही फेलोशिप यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मिळाली आहे. या कादंबरीचा यशवंतराव चव्हाण सेंटरच्या ना. धो. महानोर पुरस्काराही मिळाला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी 'एक्स'वर एक पोस्ट करून डॉ. सुरेश सावंत आणि प्रदीप कोकरे यांचे अभिनंदन केले आहे.

खोल खोल दुष्काळ डोळे या कादंबरीच्या ब्लर्बमध्ये ज्येष्ठ लेखक आसाराम लोमटे म्हणतात, 'एका संवेदनशील कवी मनाच्या तरुणाचे उमेदवारीचे दिवस रेखाटणारी ही कादंबरी आहे.

स्थैर्य, सुरक्षितता न गवसलेल्या आणि बुड टेकण्याच्या धडपडीतल्या दिवसांच्या या जणू नोंदी आहेत. या कादंबरीतल्या नायकाचा प्रवासही भटका आणि भणंग 'एका झाडाची सवे न व्हावी : एका स्थानाची सवे न व्हावी : असा आहे.

जगण्याच्या घुसळणीत शब्दांना सत्व बहाल करणाऱ्या तुकारामापासून ते आवाजात कारुण्य साकळलेल्या मुकुल शिवपुत्रापर्यंत अशा अनेक गोष्टी या नायकाला बळ पुरवणाऱ्या आहेत. वेढलेली परात्मता, दुःख, स्वार्थ, प्रेम, निराशा अशा विविध प्रवृत्तींचे प्रतिबिंब इथे दिसेल.

कादंबरीतील नायकाच्या वरवर निरर्थक, विस्कळीत वाटणाऱ्या उठाठेवी एका निर्णायक वळणावर चिंतनशीलतेचा टप्पा गाठतात आणि ठाव न गवसलेला हा प्रवासही अस्तित्वशोधाच्या बिंदूपर्यंत येऊन पोहोचतो. व्यर्थतेतही अर्थपूर्णता शोधणारी 'खोल खोल दुष्काळ डोळे' ही प्रदीप कोकरे यांची कादंबरी म्हणजे आजच्या एका पिढीचा महत्त्वाचा प्रातिनिधिक स्वर आहे.'

# गुन्हे शाखेकडून साडेतीन लाखांच्या ई सिगारेट जप्त



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १८ :

शहरातील काही शाळकरी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी ई सिगारेटचा वापर करत असल्याची माहिती शहर पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या पथकाने सोमवारी (दि. १६) उशिरा रात्री अशाच ई सिगारेटची विक्री करणाऱ्या एका ३१ वर्षीय तरुणाकडून ७१ ई-सिगारेट जप्त केल्या आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलिसांत या विक्रेत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील क्रिष्णानगर येथील जय लालचंद लोहाणी (३१) याच्याकडून पोलिसांनी ई सिगारेट जप्त केल्या आहेत. जय लोहाणी हा कॉटन मार्केट रोड ते जयस्तंभ चौक मार्गावर परदेशी बनावटीच्या इलेक्ट्रॉनिक्स सिगारेटची विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्याआधारे जयस्तंभ चौक येथे सापळा रचून त्याला पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून दोन दुचाकी व ७१ नग विदेशी बनावटीचे ई सिगारेट असा एकूण ४.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी, कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल केला. ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रमुख पीआय सीमा दाताळकर, एपीआय इम्रान नायकवाडे, एएसआय विनय मोहोड व त्यांच्या पथकाने केली आहे.

मेट्रो सिटीत १० हजार तर शहरात ५ हजारात विक्री ई-सिगारेट देशात प्रतिबंधित आहे. ही सिगारेट शहरात प्रत्येकी पाच हजार रुपयात विकली जात आहे.

तर याच सिगारेटची मागणी मुंबईसारख्या मोठ्या शहरात प्रत्येकी दहा हजार रुपयांपर्यंत केली जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# प्रत्येक कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्डिंगची जनतेला मुभा हवी

## भीमशक्ती सामाजिक संघटना, अशोक प्रतिष्ठानची मागणी



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १८ : जनतेला प्रत्येक कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्डिंगची मुभा असावी, अशी मागणी भीमशक्ती सामाजिक संघटना, अशोक प्रतिष्ठानने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात केली आहे. लोकशाहीत जनताच मालक असून जनतेला प्रत्येक शासकीय कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याचा अधिकार आहे; मात्र अनेक कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्ड साठी मज्जाव केल्या जात आहे. पत्रकारांनाही शासकीय बैठका, सभांमध्ये प्रवेश बंदी करण्यात येत असून, लोकशाहीवरचा हल्ला आहे. त्यामुळे मागणी मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. सरकारी कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्डिंगचा जनतेला अधिकार असून, याबाबत न्यायालयानेही निर्देश दिले आहेत, असे संघटनेचे म्हणणे आहे. भारत लोकशाही प्रधान राष्ट्र असून भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार बहाल केले आहेत. लोकशाहीत लोकांचे प्रश्न, समस्या मार्गी लावून त्यांचे कल्याण साधण्यासाठी शासकीय प्रशासकिय यंत्रणा आहे. मात्र या व्यवस्थेत आज जनतेचा आवाज दाबल्या जात असून जनतेचे प्रश्न, जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले जात असल्याचा अनुभव बहुतांश शासकीय प्रशासकीय कार्यालयात येत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पत्रकारांना प्रवेश नाकारणे, जनतेला व्हिडिओ रेकॉर्ड करण्याचा अधिकार नाकारणे या दोन्ही बाबीतून जनतेच्या संवैधानिक अधिकारावर घाला घातला जात आहे, असे संघटनेचे म्हणणे आहे. निवेदन देताना प्रा. विजय आठवले, भीमशक्तीचे प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे, प्रा. शैलेश इंगळे, अनिल तायडे, पद्माकर वासनिक, विद्याधर मोहोड, संदेश गवई, अरुणा लबडे आदी होत्या.

या केल्या मागण्या भीमशक्ती सामाजिक संघटना व अशोक प्रतिष्ठानतर्फे पुढील काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. प्रत्येक शासकीय कार्यालयात निवेदन किंवा अर्ज देताना त्या निवेदनावर सबंधित अधिकाऱ्याने प्रतिक्रिया दिली पाहिजे व हा संवाद रेकॉर्ड करून घेण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकास हवा. दिलेल्या मुदतीत जनतेची कामे मार्गी न लागल्यास व्हिडिओ रेकॉर्ड च्या आधारे संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचा अधिकार जनतेला असला पाहिजे. जनतेने समस्या निर्मूलनासाठी सादर केलेले निवेदन , तक्रार अर्ज केवळ फॉरवर्ड न करता त्या विभागाला कामे मार्गी लागण्यासाठी आदेश संबंधित अधिकाऱ्यांनी दिले पाहिजेत. तसा लेखी अभिप्राय तक्रारकर्त्यास कळवावा.

# महावितरणच्या कारभाराविरोधात मंत्र्यांकडे तक्रार



■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड , दि. १८ :

'हम करे, सो कायदा'या म्हणीप्रमाणे उमरखेड विभागातील महावितरण कार्यालयाचा कारभार सुरु आहे. या कारभाराविरोधात प्रहार आक्रमक होत ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांना निवेदन देत कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली.

मागील अनेक वर्षांपासून महावितरण कार्यालय कोणत्या ना कोणत्या कारणावरून चर्चेत येत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी कुठलेही नियोजन केले नाही. त्यामुळे थोडी हवा व पाण्याचा शिरकाव आला तरी उमरखेड शहर व तालुक्यातील वीज पुरवठा खंडित होण्याचा नित्यक्रम झाला आहे.

संबंधित कर्मचाऱ्याला याबाबत जाब विचारला असता नागरिकांसोबत अरेरावीची भाषा वापरून त्यांना अपमानित केले जाते. अशा प्रकारचा कारभार सध्या महावितरणच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून उमरखेड शहरासह तालुक्यात सुरू आहे. परंतु, या प्रकाराकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

मागील आठवड्यात वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणची झाडे उन्मळून पडली. यात वीज तार सुद्धा तुटल्या होत्या. या सर्व बाबी दुरुस्त करण्यासाठी काही तासांचा अवधी पुरेसा होता. परंतु, शहरासह तालुक्यातील वीज पुरवठा सुरु करण्यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांना तीन दिवसांचा कालावधी लागला.

महावितरणचे कर्मचारी आपली मुजोरी सोडण्यास तयार नसल्याने आम्ही न्याय कोणाला मागावा हा मोठा प्रश्न नागरिकांमध्ये पडला. त्यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत माहूर येथे दर्शनासाठी आलेल्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेवून निवेदन सादर केले. कारवाईची मागणी प्रहारचे शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी केली. यावेळी आ.किसन वानखेडे, प्रहारचे गोपाल झाडे, शाम चेके, व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**दिवसांपूर्वी दोन दिवस शहराचा वीज पुरवठा बंद असल्याने नागरिकांनी रोष व्यक्त केला**

उमरखेड शहरात व तालुक्यात महावितरणकडून वीज प्रवाहासाठी खांबावर डीपी बसविल्या आहेत. त्या ठिकाणी कुठलेही दरवाजे नसल्याने पावसाळ्याच्या दिवसात त्या उघड्यावर आहेत. त्यात वीज प्रवाह सुरु राहत असल्याने भविष्यात फार मोठी जीवित हाणी होण्याची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी दोन दिवस शहराचा वीज पुरवठा बंद असल्याने नागरिकांनी रोष व्यक्त करत आमदाराच्या घरावर मोर्चा काढत जाब विचारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी उमरखेड विधानसभेचे आमदार यांनी सदर संबंधित अधिकाऱ्यांना फोनद्वारे वीज पुरवठा का बंद आहे.

असा सवाल केला असता. आमदारासोबतही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी फोनवरून अरेरावी करत हुज्जत घातल्याची चर्चा शहरात जोर धरत आहे.

# रेल्वे विभागात पेन्शन अदालतीचे आयोजन

## ४९ तक्रारींवर सुनावणी; समस्यांवर चर्चा



**अकोला :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध तक्रारींच्या निवारणासाठी १६ जून रोजी कृष्णचंद्र सभागृहात जून महिन्यातील पेन्शन अदालतीचे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी भुसावळ, जळगाव आणि अकोला येथील पेन्शनर्स असोसिएशनचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. अदालतीत अकोल्यातील अनेक तक्रारदारांनी येथे समस्या मांडल्या.वर्षातून दोन वेळा पेन्शनर्सच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी पेन्शन अदालत घेतली जाते. यासाठी तीन महिने आधी सूचना देऊन अर्ज मागवले जातात. यावर्षीच्या दुसऱ्या सत्रात एकूण ४९ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २ तक्रारी वेतनविषयक होत्या तर उर्वरित ४७ तक्रारी अन्य विषयांशी संबंधित होत्या. पेन्शन अदालतेमध्ये एकूण ६७,७६४ इतकी रक्कम पेन्शनधारकांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आली. तसेच पी. पी. ओ. चे पुनरावलोकन व परिवार पेन्शनचे पुनर्नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपर मंडल रेल्वे प्रबंधक सुनील कुमार सुमन हे होते. यावेळी लेखा व कार्मिक विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वरिष्ठमंडळ कार्मिक अधिकारी दिलीप आर. खरात यांच्या प्रास्ताविकाने झाली. सूत्रसंचालन मुख्य कार्यालय अधीक्षक उमाकांत बावस्कर यांनी केले. पेन्शन अदालतेमध्ये अपर मंडल रेल्वे प्रबंधकांनी उपस्थित पेन्शनधारकांना आश्वासन दिले की, भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अडचणी उद्भवू नयेत यासाठी प्राप्त तक्रारी वेळेत सोडवण्यात येतील. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहाय्यक कार्मिक अधिकारी एस. जे. हिवाळे यांनी आभारप्रदर्शन केले.

# सौम्या शर्मा (चांडक) अमरावती महापालिकेच्या नव्या आयुक्त

## सचिन कलंत्रेंची पुण्यातील यशदाच्या उपसंचालकपदी बदली





■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १८ : राज्य शासनाच्या नगर विकास विभागाद्वारे सौम्या शर्मा (चांडक) यांची मंगळवार, १७ जून रोजी अमरावती महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली.

त्या स्मार्ट सिटी नागपूरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. सचिन कलंत्रे यांची पुण्यातील यशदाच्या उपसंचालक पदी नियुक्ती केली आहे. कलंत्रे यांना अमरावती मनपाच्या आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेऊन एकही वर्ष पूर्ण झाले नाही. गेल्या वर्षी ३० जून रोजी त्यांची अमरावती मनपाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली होती. तसेच २ जुलै रोजी त्यांनी तत्कालीन आयुक्त देविदास पवार यांच्याकडून आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांचा ११ महिन्यांचा आयुक्तपदाचा कालावधी हा शांततेत गेला. सध्या ते आजारी असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. सौम्या शर्मा या महाराष्ट्र कॅडरच्या २०१८ च्या आयएएस अधिकारी आहेत. त्यांच्या रुपात १८ वर्षांनंतर अमरावती मनपाला महिला आयुक्त महापालिकेच्या आर्थिक सुधारणांकडे लक्ष देणार अमरावती महानगर पालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे नवनियुक्त आयुक्त सौम्या शर्मा यांना दिव्य मराठीने सांगितल्यानंतर पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर निश्चितच आर्थिक सुधारणांकडे लक्ष देणार असे त्यांनी सांगितले. त्यावेळी मी प्रसार माध्यमांसोबत बोलणार आहे.

तसेच अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या त्या पत्नी आहेत, असेही त्यांनी सांगितले. मिळणार आहेत. २००७ मध्ये अर्थात १८ वर्षांपूर्वी कुंदन कौशिक यांची मनपाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली होती.

# यवतमाळमध्ये काँग्रेसची निवडणूक आढावा बैठक




■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १८ :

जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य आढावा बैठक यवतमाळ येथील सेलिब्रेशन हॉल, मेडिकल चौक येथे मंगळवारी दि. १७ जून रोजी उत्साहात पार पडली. या बैठकीला जिल्हाभरातून कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. यावेळी आम्ही निष्ठावंतांच्या पाठीशी असल्याचा सुर कार्यकर्त्यांमधुन उमटत होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी प्रांताध्यक्ष माणिकराव ठाकरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आर्णी-वणी-चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे, माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके, माजी आमदार वामनराव कासावार, राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष प्रफुल मानकर, मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मनीष पाटील, अ?ड. जयसिंग चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक, तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश भीसणकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, सोशल मीडिया काँग्रेस जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, तसेच उत्तमराव खंदारे, संतोष बोरले, सिकंदर शाह, कौस्तुभ शिर्के, निरीक्षक अरुण राऊत, प्रदीप वादाफळे, अ?ड. सीमा तेलंगे, गटनेत्या स्वाती येंडे, अरिज बेग, समीना शेख, वैशाली सवाई, उषा दिवटे, विद्या परचाके, विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष विक्की राऊत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत बोलताना खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले की, 'पक्षाच्या संघर्षाच्या काळात निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा राहील आणि त्यांच्यावर विश्वास ठेवेल. आमदार बाळासाहेब मांगूळकर यांनी प्रास्ताविक भाषणात स्पष्टपणे सांगितले की, 'पक्षाशी एकनिष्ठ नसलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याला पक्षात स्थान राहणार नाही. शिस्त आणि निष्ठा हे काँग्रेसचे मूलभूत मूल्य आहेत. शिवाजीराव मोघे आणि वसंतराव पुरके यांनी देखील संघटनात्मक बांधिलकी आणि गावपातळीवरील सक्रियतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, 'काँग्रेस पक्षाचा पाया तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आहे.

आगामी निवडणुका विचार,चळवळ आणि संघटनेच्या ताकदीने लढायच्या आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, 'सध्याच्या राजकारणात वैचारिक अध:पतन आणि जनतेच्या मुद्द्यांपासून झालेल्या दूराव्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने पुन्हा नव्याने जागृत व्हायला हवे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्तेच विजयाचे शिल्पकार असतील. काँग्रेसची ताकद ही मतदारांमध्ये नव्हे, तर निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये आहे. संघटनातली शिस्त आणि विचारधारा ही आपल्या लढाईची शस्त्रं आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यवतमाळ शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख यांनी केले, तर आभार रमेश भीसणकर यांनी मानले.

# सुनिता कोटगीरवार यांचे देहदान



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १८ :

पांढरकवडा येथील सुनिता कोटगीरवार यांचे सोमवारी दि. १६ जून रोजी सकाळी ५.३० वाजता आजाराने राहत्या घरी वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी मृत्युपश्चात देहदान करण्याचा संकल्प फॉर्म भरला होता. त्याला त्यांचे पती देविदास व पाचही मुलींनी लगेच होकार देऊन त्यांचा संकल्प पूर्ण करण्याचे ठरवले. सुनिताबाई धार्मिक वृत्तीच्या होत्या, त्यांना विज्ञानाची सुध्दा जाणीव होती.

मरावे परी देहरूपी उरावे या उक्तीला त्यांनी आज सार्थ केले. मंगळवारी दि. १७ जुन रोजी दुपारी १ वाजता पांढरकवडा येथे त्याच्या घरी शोक सभा घेऊन त्यांचा पार्थिव देह नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हाद्वारा संचालित श्रीमती सुमित्राबाई ठाकरे आयुर्वेदिक महाविद्यालय, यवतमाळमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्याकरीता उदात्त हेतुने कॉलेजचे प्राचार्य डॉ. किरण खंडारे, एकता देहदान समीतीच्या जिल्हा अध्यक्षा समिना शेख, शरीर रचना विभाग प्रमुख डॉ. पुजा गावंडे, डॉ. अंकीता रायमल, शुभम तातड, चंदन कणसे, रोहन बिरे यांच्या स्वाधीन करण्यात आले. पार्थिवदेह देते वेळेस पती देविदास कोडगिरवार, ममता विजय महाजन, सुजाता संजय उपलेचवार, दुर्गा प्रविण लिंगावार, उमा विठ्ठल पदमवार, मिनल उमेश तम्मेवार ह्या पांच ही मुली व आप्तगन उपस्थित होते.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**e-Tender Notice**

Superscribed percentage rate e-tenders are invited from Established, Reputed, Experienced Contractors and who are Registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of **1) Construction of new Transformer Plinth at 33/11 Kv Kadoli Substation, Tq. Kamtee, Dist. Nagpur amounting to Rs. 2.53 Lakhs 2) Construction of new Transformer Plinth at 33/11 Kv Dhani (Tarsa) Substation, Tq. Mauda, Dist. Nagpur amounting to Rs. 2.59 Lakhs vide e-tender specification No. EEC/NGP/e-T-13/2025-26 to EEC/NGP/e-T-14/2025-26 respectively. The tender with all details will be available on MSEDCL's website www.mahadiscom.in from date-19.06.2025 to 25.06.2025 and submission on 26.06.2025 upto 13.00 hrs. Corrigendum shall not be published in newspapers**

Executive Engineer (C)
CCCM Division, Nagpur

PRO No. 75/NZ. Dt. 18.06.2025

# शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १८ :

शिक्षकांची सेवा करण्याची संधी मला मिळाली पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. त्याच प्रमाणे सोहळ्याचे अध्यक्ष संभाजीराव थोरात यांनी शासनाच्या अन्याय कारक संच मान्यतेच्या विरोधात शिक्षकांनी एक संघ राहावे असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी सुभाष धवसे, राजेश उदार यांनी समयोचित विचार व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक संघ शाखातर्फे शिक्षक नेते मधुकरराव काठोळे यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय राज्य कार्यकारिणीचा सत्कार व शैक्षणिक विचार मंथन सोहळ्याचे आयोजन सहकार भवन येथे केले होते. या शैक्षणिक मंथन तथा सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष राज्य शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांची उपस्थिती होती. तर प्रमूख अतिथी म्हणून पांढरकवडा कृउबासचे संचालक विनोद डंभारे, सुभाषराव धवसे, रमाकांत मोहरकर, भंडारा जिल्हा शिक्षक संघाचे मनोहर काहालकर, प्रदीप मोहटे, किरण मानकर,स्वप्निल फुलमाळी, शरद घारोड, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी प्रकाश गुल्हाने, भगवंतराव राऊत, विठ्ठलदास आरु, मनोज रामधनी उपस्थिती होती. या यशस्वितेसाठी राजेश उदार, विठ्ठलदास आरु , मनोज रामधनी, हिम्मतराव ठाकरे, विकास झाडे, अजय गाडगे, राजेश निरे, धनंजय फूलकर, नितीश देशकरी,दीपक माहकुलकर, संजय पडलवार, गजानन चेर, प्रभूचरण कोल्हे, देवानंद सोयाम विनोद शिंदे, अशोक माळवी, विजय खोब्रागडे, गोकुळ राठोड, प्रमोद गजभिये, गजानन दोडके, बाळा बोभाटे, गिरीष साबळे, गुड्डू मिर, दिनेश शिंदे, विशाल झाडे नीलकमल राऊत, नीलेश नागदिवे, संजय गजभिये, राजहंस मेंढे आदींनी परिश्रम घेतले.

प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष राजेश उदार यांनी सूत्रसंचालन रुपेश कावलकर यांनी केले. तर आभार सतिश बोराखडे यांनी मानले.

# शेतीच्या वादातून दोन गटात हाणामारी

## २७ जणांवर गुन्हा दाखल

**यवतमाळ** : शेतीच्या वादातून झालेल्या बेदम मारहाणीत दोन्ही गटातील २७सदस्यांवर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. ही धक्कादायक घटना दारव्हा तालुक्यातील गहुली हेटी येथे सोमवारी घडली असून या प्रकरणी परस्पर विरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी प्रियंका जाधव (वय ३५) वर्ष रा. आरेगाव, पुसद यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गणेश चव्हाण (वय ३०) वर्ष, प्रदीप चव्हाण (वय ३०) वर्ष, प्रविण चव्हाण (वय २५) वर्ष, सुदाम चव्हाण (वय ५०) वर्ष, जिवन राठोड (वय २५) वर्ष, अविनाश राठोड (वय ३५) वर्ष, रोशन राठोड (वय ३५) वर्ष, अश्वीन राठोड (वय ४५) वर्ष, मिथून चव्हाण (वय ३५) वर्ष, रामराव राठोड (वय ५०) वर्ष, किसन राठोड (वय ४५) वर्ष, मयूर राठोड (वय २०) वर्ष, ओमकार चव्हाण (वय २२) वर्ष, बबलू चव्हाण (वय ३०) वर्ष सर्व रा. गहुली हेटी याच्यावर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. शेतीच्या कारणावरून वाद करून त्यांच्या कुटूंबातील सदस्यांच्या पाणी मिश्रीत मिरची पावडर फेकून लाथाबुक्याने मारहाण करण्यात आली.

तसेच जिवाने मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड, पाईप, दगडाने हल्ला चढवण्यात आला. तर, गणेश चव्हाण (वय २७) वर्ष रा. आरेगाव, पुसद यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी चंदु जाधव (वय ६०) वर्ष, यश जाधव (वय २२) वर्ष, दिपक राठोड (वय ३८) वर्ष, सुधाकर जाधव (वय ५८) वर्ष, प्रेम जाधव (वय ३८) वर्ष, ब्रम्ह जाधव (वय ३२) वर्ष, संदेश राठोड (वय ४०) वर्ष, विनोद राठोड (वय ४०) वर्ष, दिपक राठोड (वय ३८) वर्ष, प्रविण राठोड (वय ३२) वर्ष, बबन राठोड (वय ६०) वर्ष, स्वप्नील जाधव (वय २५) वर्ष आणि ज्ञानेश्वर आडे (वय ३०) वर्ष सर्व रा. गहुली हेटी यांच्यावर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

**नगर परिषद कार्यालय, मोवाड**
ता. नरखेड, जि. नागपूर

दूरध्वनी क्र-०७१०५२३६११२ Email Id-mcmowad1867@gmail.com

**सूचना क्र.०२/२०२५-२६ दि.१८/०६/२०२५**

नगर परिषद मोवाड अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे खात्यात पंजीकृत असलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या अनुभवी कंत्राटदाराकडून नगर परिषद मोवाड क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन करणेकरिता एजन्सी नियुक्त करणे या कामाची निविदा (दुसरी वेळ) मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना https:/mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १९/०६/२०२५ वेळ सकाळी ११:०० वाजता पासून ते दि. ३०/०६/२०२५ वेळ सकाळी ११:०० वाजता पर्यन्त बघण्यास उपलब्ध आहे.

(अमोल परिहार)
मुख्याधिकारी
नगर परिषद मोवाड

# परिवर्तनाची ११ वर्षे...

**भारतात गेल्या ११ वर्षांत राजकीयच नव्हे तर अनेक क्षेत्रांत मोठे परिवर्तन झाले आहे, त्याचे सर्व श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला आहे. या काळात संसदेत व संसदेबाहेर विरोधी पक्षांनी मोदी सरकारवर अनेक मुद्द्यांवर प्रहार केले पण पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळात विरोधकही सहभागी झाले. गेल्या ११ वर्षांत देशाची प्रगती व विकास विलक्षण झाला आणि देशातील गोरगरीब, सामान्य व उपेक्षितांपर्यंत पोहोचला. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक पातळीवर लक्षणीय झेप घेतली. ११ वर्षांत देशातील सर्वाधिक लोकप्रियता व विश्वास नरेंद्र मोदी यांनी संपादन केला आणि सर्वाधिक सदस्य नोंदणी झालेला भारतीय जनता पक्ष हा जगात नंबर १ राजकीय पक्ष झाला, यामागे नरेंद्र मोदी आणि अमितभाई शहा यांचे परिश्रम व संघटन कौशल्य आहे.**

--------------

मोदी सरकारच्या परराष्ट्रनीती व कूटनीतीमुळे जगात भारताची वेगळी ओळख बनली आहे. जगात भारताने अर्थव्यवस्थेमध्ये जपानला मागे सारून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. काश्मीर खोऱ्यात रेल्वे धावू लागली आहे. काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वेने प्रवास करण्याचे स्वप्न साकार झाले आहे. भारताला जगातील महासत्ता बनविण्याचे मिशन मोदी सरकारने हाती घेतले आहे.

गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने जगात भारत हा एक शक्तिशाली देश आहे, अशी प्रतिमा निर्माण केली. देशाच्या सरहद्दीवर कठोर व मजबूत उपाय योजले म्हणूनच भारताच्या सीमारेषांना धक्का लावण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही, अशी व्यवस्था केली. ज्या वेळी शेजारी शत्रूंनी कुरापती काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना वेळीच भारताने धडा शिकवला.

चिनी सैन्याने घुसखोरीचा प्रयत्न केला तेव्हा डोकलाम किंवा गलवान खोऱ्यात त्यांना सडेतोड जबाब देऊन पिटाळून लावले. पुलवामा, पठाणकोट असो किंवा पहलगाम, पाकिस्तानप्रेरित झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना भारताने जबरदस्त उत्तर दिले. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, तर कधी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा करून दहशतवादी तळांबरोबरच पाकिस्तानचे हवाई तळांचे मोठे नुकसान केले.

काश्मीरमधील दहशतवाद आणि छत्तीसगडमधील नक्षलवाद मोडून काढताना मोदी सरकारने कणखरपणा दाखवला. पहलगाममध्ये २६ हिंदू पर्यटकांची निर्घृण हत्या झाल्यानंतर भारताने पाकिस्तावर सैन्य कारवाई केलीच, पण पाकबरोबर झालेले सर्व द्विपक्षीय समझोते रद्द केले आणि सतलज नदीचे पाकिस्तानात जाणारे पाणीही रोखले.

गेल्या ११ वर्षांत देशातील २६ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले ही मोदी सरकारची मोठी जमेची बाजू आहे. जागतिक बँकेच्या अहवालातच ही बाब नमूद करण्यात आली आहे. पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजना, जनधन योजना, आयुष्यमान भारत योजना, अशा योजनांनी सर्वसामान्य जनतेच्या जीवनात फरक पडला आहे.

देशातील ८० कोटी गरीब जनतेला दरमहा पाच किलो धान्य दिले जाते, त्यामुळे या देशात कोणी उपाशी राहू नये याची काळजी सरकारने घेतली आहे. बँकिंग व आरोग्य सेवा, प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण, डिजिटल व्यवहार, मजबूत व पारदर्शी पायाभूत सुविधा, सर्व लाभ थेट लाभार्थीना वेळेत पोहोचविण्याची कार्यपद्धती यामुळे पंचवीस कोटी लोक गरिबीतून बाहेर येण्यास मदत झाली.

पूर्वीच्या काळात ग्रामीण भागात घरात एक कंदील असायचा. तेव्हा वीज गावागावात नव्हती आणि केरोसीनही परवडत नव्हते. वीज वारंवार खंडित होत असे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीतच मोदींनी २४ तास घरोघरी सर्वांना वीज देण्याचे आश्वासन दिले होते. ११ वर्षांच्या कारकिर्दीत सर्व गावागावांत वीज पोहोचली आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना सर्वत्र राबवली जाते आहे.

घरात शौचालय नाही म्हणून बाहेर उघड्यावर विधी करायला जाणाऱ्या जनतेची संख्या देशात कोट्यवधी होती. विशेषतः ग्रामीण भागात ही समस्या मोठी होती. मोदींनी स्वच्छ भारत योजना सुरू केली. उघड्यावर विधी केल्याने अस्वच्छता पसरते व त्यातून आजार व रोगराई निर्माण होते असा प्रचार केला गेला. जागतिक आरोग्य संघटनेने भारताचे या उपक्रमाचे कौतुक केले.

**इंडिया कॉलिंग**

**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

आज देशात १२ कोटी शौचालये उभारण्यात आली असून ६० कोटी लोक त्याचा वापर करीत आहेत. दि. १ मे २०१६ रोजी पंतप्रधान उज्वला गॅस योजना सुरू झाली. गरीब महिलांना मोफत एलजीपी गॅस कनेक्शन मिळू लागले. स्वयंपाकाच्या चुलीच्या धुरापासून महिलांना मुक्तता मिळाली. उज्वला योजनेतून १० कोटी महिलांना गॅस कनेक्शन मिळाले आहे.

देशातील कोट्यवधींचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्येत मोदी सरकारने भव्य राम मंदिर उभारून दाखवले. पण देशातील मंदिरे व तीर्थस्थळांचाही पुनर्विकास केला. काशी विश्वनाथ कॉरिडोर, महाकाल लोक उज्जैन, माँ कामाख्या मंदिर, केदारनाथ धाम, जुने सोमनाथ मंदिर यांच्या जीर्णोद्धारातून अध्यात्मिक क्षेत्राला नवीन ऊर्जा मिळाली. तीर्थस्थळांवर पर्यटन व अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली.

चारधाम राजमार्ग परिवहन योजना, हेमकुंडसाहिब रोप-वे योजना राबवताना भारत - पाकिस्तान सरहद्दीनजीक असलेल्या कर्तारपूर कॉरिडॉरमुळे भारतीय शिखांना तेथे जाण्याचा मार्ग सुलभ झाला. गेल्या वर्षभरात भारतात ९.६६ दशलक्ष विदेशी पर्यटक आले. त्यातून २ लक्ष ७८ हजार कोटी भारताला विदेशी चलन मिळाले. दरवर्षी विदेशी पर्यटकांची भारतात येण्याची संख्या वाढत आहे.

प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय पोलीस स्मारक, जालियनवाला बाग स्मारक, राष्ट्रीय युद्ध स्मारक, आदिवासी स्वतंत्रता सेनानी संग्रहालय, भारत मंडपम, नवीन संसद भवन, या देशाला प्रेरणा, ऊर्जा देणाऱ्या व अभिमान वाटणाऱ्या वास्तू गेल्या ११ वर्षांतच उभ्या राहिल्या आहेत. एक भारत-श्रेष्ठ भारत, काशी तमिल संगम अशा उपक्रमांमुळे भारतातील विविध भाषा व संस्कृती यांच्यात सेतू निर्माण करण्याचे काम केले आहे.

प्रयागराज येथे महाकुंभला ६६ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले. मोदींनी योग दिनाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. सन २०२४ मध्ये उत्तर प्रदेशात २६ लाख लोकांनी योगाची ऑनलाइन घेतलेल्या शपथ उपक्रमाची विश्वविक्रम म्हणून नोंद झाली.

वंदे भारत ट्रेन ही मोदी सरकारने दिलेली देणगी आहे. देशात सर्वाधिक लोकप्रिय ही ट्रेन ठरली असून तिची मागणी वाढते आहे. कटरा ते श्रीनगर मार्गावर सर्वात उंचीवर असलेल्या चिनाब पुलावरून वंदे भारत धावू लागली आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून १२ कोटी शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये दिले जात आहेत. आयुष्यमान भारत योजनेतून ५० कोटी लोकांना पाच लाखांपर्यंत आरोग्य सेवा मोफत मिळू शकेल. अंतराळ क्षेत्रातही गेल्या ११ वर्षांत भारताने भरीव कामगिरी केली आहे. सन २०१७ मध्ये इस्त्रोने १०४ उपग्रहांचे प्रक्षेपण करून विश्वविक्रम निर्माण केला.

मोदी सरकारने ११ वर्षांत देशाचा चेहरा-मोहरा बदलला. जगात भारताला नवीन ओळख मिळवून दिली. पण विरोधी पक्ष म्हणणार, गेल्या ११ वर्षांत पंतप्रधानांनी एकही पत्रकार परिषद घेतली नाही.

पुलवामा किंवा पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादी कुठे पळाले, ते का नाही सापडले? मुळात ते भारतात घुसलेच कसे? पाकिस्तानबरोबर झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताची किती विमाने पाकने पाडली व कितींचे नुकसान झाले?

भारताने जगभर पाकविरोधात सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठवली पण श्रीलंका, म्यानमार, बांगलादेश, नेपाळ, अफगाणिस्तान, मालदिव, मॉरिशस या शेजारी देशात कोणी का गेले नाही? भारताच्या शेजारी देशांनी भारताच्या बाजूने एकही का शब्द उच्चारला नाही?

पंतप्रधानांनी ११ वर्षांत सत्तरहून अधिक देशांना दीडशे वेळा तरी भेटी दिल्या असतील, मग एकही देश पाकिस्तान दहशतवादाला प्रोत्साहन देतो असे का म्हणाला नाही? पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूर काळात भारताच्या विरोधात अमेरिका, रशिया, फ्रान्सने दिलेली शस्त्रे वापरली, मग आपले मित्र कोण? भारत-पाकिस्तान युद्धबंदी आपण घडवली, असे प्रेसिडेंट डोनाल्ड ट्रम्प यांनी एक डझन वेळा म्हटले, मग भारत त्याला प्रतिवाद का करीत नाही?

महाकुंभमध्ये ४० ठार, दिल्ली स्टेशनवर चेंगराचेंगरीत १८ ठार, बंगळूरुला स्टेडियमबाहेर ११ ठार, पुलवामाला ४० सुरक्षा दलाच्या जवानांचा बळी, पहलगामला २६ पर्यटकांची हत्या, मुंब्याला लोकलमधून पडून ४ प्रवाशांचा मृत्यू, अहमदाबादला ड्रिमलायनर विमान कोसळून २७५ ठार, अशा घटनांना जबाबदार कोण? कोणाला शिक्षा झाली? याचे उत्तर कधी मिळत नाही, तरीही देश बदल रहा है, हे मान्य करायलाच हवे.

# इस्त्रायल - इराण संघर्ष!

**इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरु झालेले युद्ध लवकर संपेल असे वाटत नाही. इस्त्रायलला इराणच्या अणूविषयक कार्यक्रमाची भीती वाटते. इस्त्रायलचे असे म्हणणे आहे की इराणने अणूबॉंब बनवण्यात यश मिळविले तर इस्त्रायल करता ती धोक्याची घंटा असेल.**

--------------

इस्त्रायल मधील पुढील पिढीच्या सुरक्षिततेसाठी इराणला अणूबॉंब बनवण्यास प्रतिबंध करणे, हाच त्यावरील योग्य उपाय आहे. इराण हा अणूबॉंब बनवण्याच्या जवळ पोहोचला असल्याने आता वेळ घालवला तर इस्त्रायलचे भविष्य धोक्यात येईल, म्हणुनच पहिल्याच दिवशी इस्त्रायलने इराणवर इतका जोरदार हल्ला केला की इराणची सुरक्षा यंत्रणा हडबडून गेली.

इराण वरील इस्त्रायलचा हा हल्ला अनपेक्षित नव्हता. गेले काही दिवस त्या संदभार्तील बातम्या सातत्याने ऐकायला मिळत होत्या. अर्थात त्या बाबतीत इराण, बेसावध राहिला ही गोष्ट खरी आहे.

इराणचा अणूविषयक कार्यक्रम रोखण्यासाठी, अमेरिका आणि इराण यांच्यात ज्या वाटाघाटी सुरू होत्या, त्या संबंधात, इराणने अमेरिकेच्या अटी मान्य कराव्यात म्हणून इराणवर दडपण आणण्यासाठी, इस्त्रायल इराणवर हल्ला करणार असल्याच्या अफवा पसरवण्यात आल्या असाव्यात असे मानले जात होते.मात्र इस्त्रायलने हल्ला केला आणि इराणचे फार मोठे नुकसान घडवून आणले.



अभय गोखले

इराणच्या बेसावधपणाचा मोठा फटका लष्करातील काही उच्च अधिकाऱ्यांना बसला. या हल्ल्यात इराणचे मिलिटरी चीफ आणि इस्लामीक रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्पसचे प्रमुख मारले गेले,ही गोष्ट साधी मानता येणार नाही. हे अधिकारी त्यावेळी त्यांच्या घरात होते. खरे पहाता त्यांनी तेंव्हा सुरक्षित ठिकाणी असायला हवे होते.

इस्त्रायलचा हल्ला सुनियोजित होता.इस्त्रायली गुप्तहेर संस्था मोसादने इराणची राजधानी तेहरान जवळ गुप्तपणे आपला ड्रोनचा तळ उभारला होता.शस्त्रास्त्रांनी भरलेली काही वाहने इस्त्रायलने अगोदरच तिकडे तयार ठेवली होती. तसेच काही कमांडोज इस्त्रायलने अगोदरच तिकडे गुप्तपणे रवाना केले होते.

इराणच्या गुप्तहेर संस्थेला त्याचा थांगपत्ता लागू शकला नाही.याचा परीणाम म्हणजे इस्त्रायलने इराणवर जे हल्ले केले ते इराणच्या भूमीतूनच केल्याने ते अतिशय प्रभावी ठरले.

इस्त्रायलच्या दोनशे लढाऊ विमानांनी एकाच वेळी इराण मधील शंभर ठिकाणांवर हल्ले केल्यामुळे इराणी सुरक्षा यंत्रणेचे कंबरडेच मोडले गेले.इराण मधील तेल साठे, उर्जा यंत्रणा आणि अण्वस्त्र तळ यांना टार्गेट करण्यात आल्याने युद्धाच्या पहिल्याच दिवशी इस्त्रायलने अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळविले. अर्थात, इस्त्रायलने कितीही प्रयत्न केला तरी, इराणचा संपूर्ण अणूविषयक कार्यक्रम, नष्ट करणे इस्त्रायलला शक्य होणार नाही. त्यासाठी इस्त्रायलला अमेरिकेची मदत घ्यावी लागेल.

सध्यातरी अमेरिका थेटपणे इस्त्रायलच्या बाजूने युध्दात उतरण्याची शक्यता दिसत नाही. मात्र मिडल इस्ट मध्ये ज्या ठिकाणी अमेरिकेचे सैनिकी तळ आहेत, त्यावर इराणने चुकून जरी हल्ला केला तर अमेरिकेला युद्धात उतरण्यासाठी निमित्त मिळेल. म्हणूनच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रंप हे इराणला वारंवार चेतावणी देत आहेत की आमच्या सैनिकी तळांवर हल्ला केलात तर आम्हाला युद्धात उतरावे लागेल.

आता इराण मधील सध्याच्या इस्लामी राजवटी बद्दल थोडक्यात माहिती घेऊया. १९७९ साली इराणचे क्रांतिकारी नेते अयातुल्ला खोमेनी यांनी तत्कालीन इराणच्या शहाची सत्ता उलथवून टाकली आणि आपली इस्लामी राजवट प्रस्थापित केली. इराणचा शहा हा जुलुमी असला तरी तो कट्टरपंथी नव्हता. त्याच्या राजवटीत नागरिकांचे मुलभूत अधिकार सुरक्षित होते. मात्र अयातुल्ला खोमेनी हे सत्तेवर आल्यानंतर त्यांनी आपली कट्टरपंथी धोरणे दमनशाहीच्या माध्यमातून राबवायला सुरुवात केली.

त्याचा सर्वात मोठा फटका इराण मधील महिलांना सोसावा लागला. त्यांच्यावर अनेक प्रकारची बंधने घालण्यात आली.

ज्या नागरिकांना ते सहन झाले नाही ते इतर देशांमध्ये कायमचे निघून गेले. परंतु सत्तेवर आल्यानंतर थोड्याच कालावधीत अयातुल्ला खोमेनी यांच्या राजवटीने, इतर देशांमध्ये जाण्याचा पिडित नागरिकांचा मार्ग बंद करून टाकला.

इस्लामीक रिव्हॉल्युशनरी गार्डची दहशत कमालीची वाढली. निरापराध नागरिकांना ते त्रास देऊ लागले. रिव्हॉल्यशनरी गार्डसनी इराणी सैन्याला समांतर अशी यंत्रणा उभी केली असून, त्यांची दहशत इराण मध्ये सर्वत्र पहायला मिळते. क्रांतीकारी सरकारच्या दमनशाहीच्या विरोधात आजवर इराण मध्ये अनेक आंदोलने झाली, परंतु ती आंदोलने रिव्हॉल्युशनरी गार्डसनी निर्दयपणे चिरडून टाकली.

इस्त्रायलने जेंव्हा इराणवर हल्ला केला तेंव्हा, इराण मधील जनतेला त्यांनी, तेथील अत्याचारी राजवटी विरोधात उठाव करण्याचे आवाहन केले आहे. इस्त्रायल आणि इराण यांच्यात यापुर्वीही युध्द झालेले आहे आणि ते बराच काळ लांबले होते. इराणला कोणत्याही परिस्थितीत अणुबॉम्ब बनवू द्यायचा नाही, याबाबत इस्त्रायल ठाम आहे. आता या युध्दाचा शेवट कधी होणार आणि इस्त्रायलचा मनसुबा सफल होईल का? या प्रश्नाचे उत्तर बहुतांशी अमेरिकेच्या भूमिकेवर अवलंबून राहील.

■ ■ ■

# भारताला धर्मशाळा बनू देणार नाही

भारतात राहणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा महत्त्वाचे भाष्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने एक कडक टिप्पणी केली आहे की भारत ही धर्मशाळा नाही जिथे आपण सर्वत्र परदेशी नागरिकांचे स्वागत करू शकतो.

आपण १४० कोटी लोकांसोबत लढत आहोत. न्यायालयाने राष्ट्रीय सुरक्षेला आणि मर्यादित संसाधनांना प्राधान्य देऊन बेकायदेशीर घुसखोरांना हद्दपार करण्यावरही भर दिला. कडक भूमिका घेत, सर्वोच्च न्यायालयाने श्रीलंकेच्या एका नागरिकाची आश्रय याचिका फेटाळली. श्रीलंकेच्या नागरिकाने आपल्या देशात आपल्या जीवाला धोका असल्याचे कारण देत भारतात आश्रय मागितला होता.

श्रीलंकेचा नागरिक व्हिसावर भारतात आला होता आणि बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत तो ३ वर्षांपासून तुरुंगात आहे. न्यायालयाचा हा निर्णय काही दिवसांपूर्वी रोहिंग्यांबाबत दाखल केलेल्या याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर आहे.

भारतात निर्वासितांच्या आगमनाचा इतिहास नवीन नाही. १२०० वर्षांपूर्वी, पर्शियातील धार्मिक छळ आणि कट्टरतेमुळे, पारशी समुदायाचे लोक गुजरातमध्ये आले, तेव्हा राजा जदिराना यांनी त्यांना आश्रय दिला. पारशी समुदाय भारतात मीठ पाण्यात विरघळते तसे राहत आहे आणि तेव्हापासून ते येथे आदराने राहत आहेत.

भारत नेहमीच दयाळू राहिला आहे. पण आता बेकायदेशीर घुसखोर राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका बनले आहेत. स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर सुमारे २ कोटी लोक भारतात आले. बांगलादेशच्या स्वातंत्र्यापूर्वी सुमारे १ कोटी बांगलादेशी निर्वासित भारतात आले होते. ईशान्येकडील राज्यांमध्ये सुमारे ५३ हजार चकमा आले आहेत.



ॲड. आकाश सपेलकर

ईशान्येकडील राज्यांमध्ये बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची समस्या गंभीर बनली आहे.

हे बेकायदेशीर स्थलांतरित भारताच्या अर्थव्यवस्थेला, राजकारणाला, समाजाला आणि सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करत आहेत. ते केवळ सीमावर्ती भागातच स्थायिक झाले नाहीत तर ईशान्येकडील राज्ये, दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूसह देशातील जवळजवळ प्रत्येक राज्यात पोहोचले आहेत.

सिलिगुडी कॉरिडॉरमध्ये अशा लोकांना वसवणे हे देशाच्या सुरक्षेसाठी चांगले नाही, विशेषतः जेव्हा बांगलादेश चीन-पाकिस्तानच्या जवळ येत आहे, जिथे शेख हसीना यांना हटवल्यानंतर कट्टरपंथीयांचे मनोबल वाढले आहे. २००० च्या अहवालानुसार, देशातील २५ लोकसभा जागांवर आणि १२० विधानसभा जागांवर बांगलादेशी घुसखोरांची प्रभावशाली भूमिका आहे.

अहवालात म्हटले आहे की २००३ पर्यंत दिल्लीतील ६ लाख बांगलादेशी घुसखोरांनी भारतीय ओळखपत्रे मिळवली होती. देशातील इतर अनेक मतदारसंघांमध्येही जवळजवळ अशीच परिस्थिती असू शकते. असा अंदाज आहे की सध्या भारतात ३ ते ५ कोटी बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोर राहत आहेत. त्यापैकी काही चुकीच्या कामांमध्ये सक्रिय असू शकतात.

कोणाला माहित नाही की म्यानमारमधून आलेले रोहिंग्या देशाच्या कानाकोपऱ्यात स्थायिक झाले आहेत आणि अनेक प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी आहेत. बेकायदेशीर घुसखोरांना बसवण्यासाठी अनेक टोळ्या सक्रिय आहेत आणि पैशाच्या बदल्यात ते त्यांच्या आधार कार्डसह बनावट कागदपत्रे तयार करतात.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही मानवाधिकार संघटना आणि काही प्रसिद्ध वकील रोहिंग्यांना निर्दोष निर्वासित मानतात. या वर्षी मार्चमध्ये संसदेने इमिग्रेशन अँड फॉरेनर्स बिल २०२५ मंजूर केले. चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते की, केंद्र सरकार अशा लोकांना भारतात येण्यापासून रोखेल ज्यांचे भारतात येण्याचे वाईट हेतू आहेत, हा देश धर्मशाळा नाही, राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या लोकांना देशात प्रवेश दिला जाणार नाही. घुसखोरांनी गोंधळ निर्माण केल्यास त्यांना कठोर शिक्षा दिली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यानंतर, राज्यांमध्ये बेकायदेशीर घुसखोरांची ओळख पटवण्याचे काम सुरू झाले. अलिकडेच गुजरातमध्ये हजारो बेकायदेशीर बांगलादेशी आढळले. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमध्येही घुसखोरांची ओळख पटवली जात आहे आणि त्यांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

केंद्र सरकारने सर्व राज्यांना एका महिन्याच्या आत बेकायदेशीर घुसखोरांची ओळख पटवून त्यांना हद्दपार करण्यासाठी वैधानिक अधिकारांचा वापर करण्यास सांगितले आहे.

संपूर्ण भारताला माहित आहे की बेकायदेशीर घुसखोरीमुळे आसाम आणि पश्चिम बंगालची लोकसंख्या बदलली आहे. अनेक भागात आदिवासी लोक अल्पसंख्याक बनले आहेत.

निर्वासित आणि स्थलांतरित लोकसंख्येतील वाढीमुळे त्रिपुरासारख्या राज्यांमधील स्थानिक लोकसंख्या त्यांच्याच भूमीत अल्पसंख्याक बनली आहे, ज्यामुळे भूतकाळात बंडखोरीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. जेव्हा भारतातील संसाधने मर्यादित असतात आणि आपल्याच देशाची लोकसंख्या सतत वाढत असते, तेव्हा घुसखोरांना आश्रय देणे म्हणजे स्वतःवर ओझे टाकण्यासारखे होणार नाही का?

भारताने शतकानुशतके जगभरातील छळग्रस्त लोकांना आश्रय दिला आहे परंतु आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. बेकायदेशीर घुसखोर केवळ राष्ट्रीय हितांना हानी पोहोचवत आहेत. केंद्र सरकारने नागरिकत्व सुधारणा कायद्याद्वारे 6 शेजारील देशांमधील छळग्रस्त लोकांना आश्रय दिला आहे, परंतु कायदा मोडणाऱ्यांशी कठोरपणे वागणे खूप महत्वाचे आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला सतर्क राहावे लागेल आणि त्यांच्या परिसरातील लोकांना ओळखावे लागेल.

■ ■ ■

# मूळ आरोपी सुटले, संस्थाचालक अडचणीत का?

**शालार्थ घोटाळा**

नागपूर जिल्ह्यातील शालार्थ पोर्टल घोटाळ्यात शासकीय निधीची लूट उघडकीस आली आहे. बनावट कर्मचाऱ्यांच्या आधारे पगार घेतल्याचा प्रकार गंभीर असून एसआयटीची स्थापना स्वागतार्ह आहे. पण तपासाची दिशा पाहता लक्ष संस्थाचालकांवर केंद्रित असल्याचे स्पष्ट होते. जणू प्रत्येक संस्थाचालक दोषीच आहे, असा समज केला जातो आहे.

**सर्व संस्थाचालक दोषी कसे?**

२०० हून अधिक शाळांच्या संचालकांना एसआयटी चौकशीसाठी बोलवत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, ग्रामीण भागातील संस्थाचालकांवर धमकीचा सूर.

कोणताही ठोस पुरावा नसताना जबाबांवरून संगनमत ठरवले जाते.

सोपे निकष वापरा, गुंतागुंत नको. शाळेचे प्रत्यक्ष अस्तित्व तपासा, कर्मचारी प्रत्यक्ष कार्यरत आहेत का हे पाहा. शैक्षणिक पात्रता व वैधता तपासा. डिग्री व नेमणुकीतील तारखा जुळतात का हे तपासा. संच मान्यता व अतिरिक्त भरतीची पारदर्शकता तपासा.

**एसआयटीचा दृष्टीकोन बदलणे का आवश्यक?**

शेकडो चौकशांत वेळ, पैसा आणि श्रम वाया



अरूण सोपानराव कराळे
वाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

मूळ आरोपी सुटण्याचा धोका.

इतिहास साक्ष देतो, मास ॲक्शन निष्फळ ठरते

सरळ पुराव्याविना अटक म्हणजे संसाधनांचा अपव्यय.

प्रक्रियात्मक चूक म्हणजे गुन्हा नव्हे.

शैक्षणिक तपासाची कौशल्ये पोलीस यंत्रणेकडे नसतात.

कारवाई सुधारणेसाठी हवी...

भीती निर्माण करण्यासाठी नाही.

दस्तऐवजातील त्रुटी, विलंब, अपूर्णता हे गुन्हे नाहीत. चुकीच्या दिशेने चाललेल्या कारवाईमुळे संस्थाचालकांच्या प्रतिष्ठेला धक्का.

शिक्षण संस्थांमध्ये भीती आणि निरुत्साह वाढण्याची शक्यता.

**निष्कर्ष :**

न्याय होऊ द्या, पण प्रतिष्ठा गमावून नाही. शिक्षणव्यवस्थेतील पारदर्शकता आवश्यकच, पण ती करताना निष्पापांवर अन्याय होणार नाही, याचीही दक्षता घ्या. एसआयटी च्या कारवाईचा हेतू सुधारणा असली पाहिजे, शिक्षा नव्हे.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## इस्त्रोचं धाडसी पाऊल, अभिमानास्पद आणि प्रेरणादायी

इस्त्रोने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, सुरक्षा हेच सर्वोच्च प्राधान्य आहे. अमेरिकेतील Axiom-4 मोहिमे अंतर्गत फाल्कन-9 रॉकेटचे प्रक्षेपण ११ जून रोजी नियोजित होते. हे रॉकेट भारत, अमेरिका, पोलंड आणि हंगेरीच्या ४ अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार होते. पण, इस्त्रोने सखोल चाचण्या आणि लो टेंपरेचर लिक टेस्टची मागणी केली.

पोलंड आणि हंगेरीनेही इस्त्रोच्या भूमिकेचे समर्थन केले. स्पेसएक्सकडून यावर तात्पुरत्या उपायांची तयारी होती. परंतु, इस्त्रोने ती साफ नाकारली. संभाव्य धोका ओळखून इस्त्रोने वेळेवर योग्य निर्णय घेतला. डॉ. व्ही. नारायणन यांच्या अनुभवामुळे मोठा अपघात टाळता आला. १३ सदस्यीय भारतीय तज्ञ पथकाने फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरवर थेट हस्तक्षेप केला. सेफ्टी फर्स्ट, लाँच लेटर ही भूमिका खऱ्या विज्ञाननिष्ठेचे उदाहरण ठरली. यामुळे अखेर मागणी नुसार चाचणी करावी लागली. आणि इस्त्रोच्या अंदाजानुसार ती सदोष आढळली. काही महत्वाचे दोष रॉकेटमधे होते. त्यामुळे अपघाताची पूर्ण शक्यता होती. या मोहिमेत भारताचे वैमानिक ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे आहेत.

त्यांच्या सुरक्षिततेसाठी इस्त्रोने आवश्यक तो धोरणात्मक निर्णय घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. इस्त्रोची ही भूमिका म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची वैज्ञानिक प्रगल्भता दर्शवते. प्रत्येक भारतीयाला या निर्णयाचा अभिमान आहे. भारत आता केवळ प्रक्षेपण करणारा देश नाही, तर जागतिक धोरण ठरवणारा बनला आहे. ही घटना इस्त्रोच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची साक्ष देणारी आहे.

हे खरे वैज्ञानिक नेतृत्व आहे, जे धाडस आणि विवेक दोन्ही जपतं. ही भूमिका केवळ अभिमानास्पद आहे असे नव्हे तर नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. संपूर्ण देश इस्त्रोच्या या निर्णयामुळे गर्वाने उभा आहे. इस्त्रोचे मनःपूर्वक अभिनंदन!

■ **सौ. प्रांजली विजय ब्रम्हे**
**नागपूर.**

## हमाम मे सब....

उबाठा शिवसेनेतून बाहेर पडलेले किंवा हाकलले गेलेले नाशिकचे सुधाकर बडगुजर यांना भाजपाने त्यांच्या पक्षात प्रवेश दिला. हे बडगुजर महाशय आघाडीत असताना त्यांनी १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सलिम कुत्तासोबत पार्टी केल्याचा फोटो दाखवत भाजपाने थयथयाट केला होता. फडणवीसांनी एसआयटीची घोषणा केली होती. त्याच बडगुजरला भाजपाने आता आपल्या पक्षात कसा काय प्रवेश दिला? म्हणजे तेंव्हाचा देशद्रोही आता देशप्रेमी झाला का? बडगुजरच्या प्रवेशाबाबत भाजपा प्रदेशाध्यक्ष सकाळी म्हणतात, मला माहित नाही आणि सायंकाळी प्रवेश देतात. याच पक्षाचे निलेश राणे म्हणतात, हिंदुत्वाच्या मुद्यावर आम्ही एक आहोत. या नेत्यांची असली विधाने ऐकून कीव येते. राजकारणात नितीमत्ता, आदर्श राहिले नाहीत. हमाम मे सब ..गे है.

■ **राजन सेलोकर, नागपूर.**

उन्हाळ्याच्या दिवसात कलिंगड हा प्रत्येक घरात हमखास खाल्ला जाणारा आणि थंडावा देणारा एक अत्यंत लोकप्रिय फळ आहे. मात्र कलिंगड खाताना बहुतांश लोक त्यातील बिया कचऱ्यात टाकतात. खरंतर या छोट्या बियांमध्ये आरोग्यासाठी उपयुक्त असंख्य पोषक घटक दडलेले असतात. या बियांचा योग्य प्रकारे वापर केल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो आणि शरीराला भरपूर पोषण मिळू शकतं.

कलिंगडाच्या बियांमध्ये प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह (आयर्न), झिंक, हेल्दी फॅट्स, ओमेगा-६ फॅटी ॲसिड्स आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे सर्व घटक शरीरातील विविध कार्यांसाठी अत्यंत आवश्यक आहेत. विशेषतः उन्हाळ्यात शरीरातील पोषण तुटवड्याची पूर्तता यामुळे शक्य होते.



# कलिंगडाच्या बियांमध्ये दडला आहे खजिना!

**हृदयासाठी फायदेशीर :** कलिंगडाच्या बियांमध्ये असलेले मॅग्नेशियम व हेल्दी फॅट्स हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. यामुळे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. तसेच रक्तदाबही संतुलित राहतो.

**पचन सुधारते :** यामध्ये असलेल्या फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत होते. अन्न पचण्यास मदत होते आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्या दूर होतात. उन्हाळ्यात पाचन बिघडण्याची शक्यता असते, अशा वेळी या बिया लाभदायक ठरतात.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढते :**

कलिंगडाच्या बियांमध्ये असलेल्या अँटीऑक्सिडंट्स आणि झिंकमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. त्यामुळे संसर्गजन्य आजारांपासून शरीराचं संरक्षण होतं आणि शरीरातील पेशींचं नुकसान टळतं.

**त्वचा व केसांसाठी फायदेशीर :**

या बियांमध्ये असणारे पोषक घटक त्वचेला उजळ आणि मऊ बनवतात. केसांची वाढ चांगली होते आणि केस गळती कमी होते. यातील प्रथिने व फॅटी ॲसिड्स त्वचेला आतून पोषण देतात.

**ब्लड शुगर नियंत्रित :** कलिंगडाच्या बियांमध्ये असलेले मॅग्नेशियम रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. त्यामुळे मधुमेह रुग्णांसाठी याचा योग्य प्रकारे वापर फायदेशीर ठरतो.

थोड्या बिया तव्यावर भाजून नाश्त्यासाठी खाव्यात. यामुळे चवही चांगली लागते. बिया भाजून त्याची पावडर करून स्मूदी, दुधात किंवा सूपमध्ये मिसळून वापरता येते. कलिंगडाच्या बिया सकाळी किंवा दुपारी खाल्ल्यास शरीराला अधिक फायदा होतो. रात्री फार जास्त प्रमाणात खाणं टाळावं.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



# लहरी बाबा

**पाऊस आहे लहरी**
**मनात येई तसे वागतो**
**त्याच्या लहरीपणापायी**
**बळी देशोधडीला लागतो .**

**खाईल तर तुपाशी**
**नाही तर उपाशी**
**तुझ्या आडमुठेपणापाई**
**बळीला घ्यावी लागे फाशी..**

**अतीवृष्टीने जनजीवनही**
**होते सारे विस्कळीत**
**पुराचे बळी ठरतात**
**निष्पाप जीव अगणित..**

## डेटॉल फ्रेश भारतीयांना १२ तास ताजेपणा देऊन नेहमीच तयार रहाण्यासाठी देते प्रोत्साहन

**नवी दिल्ली, १८ जून :** भारतातील सर्वात विश्वासार्ह स्वच्छता ब्रँडपैकी एक असलेल्या डेटॉलने त्यांच्या प्रसिद्ध कोलोन फ्रेश आणि लाइम फ्रेश साबण प्रकारांमध्ये १२ तासांचा ताजेपणा देऊन वैयक्तिक काळजी घेण्याची वचनबद्धता वाढवली आहे. ही ऑफर वाढत्या ग्राहकांच्या गरजा म्हणजेच तुम्ही सुरक्षित आहात आणि दिवसभर ताजेतवाने वाटत आहात हे समजल्यावर येणारा आत्मविश्वास तुम्हाला देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. डेटॉल कोलोन फ्रेशसह, वापरकर्त्यांना एक आत्मविश्वासी, उत्साहवर्धक कस्तुरी कोलोन सुगंध मिळतो जो तुम्हाला आंघोळीनंतर ताजेपणा देतो, तर डेटॉल लाइम फ्रेश एक उत्साही लिंबूवर्गीय सुगंध देतो ज्यामुळे ऊर्जावान आणि उत्साही वाटू लागते, जेणेकरून तुम्ही ही साबण तुमच्या सामाजिक कार्यात जाण्यासाठी आणि दैनंदिन कामासाठी वापरू शकता. वापरकर्त्यांना त्यांचे पाऊल पुढे टाकण्यास मदत करणारा एक दैनंदिन सहयोगी म्हणजे डेटॉल फ्रेश आहे - म्हणून ते स्वत:बद्दलच्या शंकांमुळे कधीही संधी गमवत नाहीत.

रेकिट साऊथ आशियाच्या आरोग्य विभागाचे विभागीय विपणन संचालक कनिका कालरा म्हणाले, रेकिटमध्ये, आमचा विश्वास आहे की, आपल्यात ताजेपणा असला आणि सुरक्षित वाटले तरच आपल्याला खरा आत्मविश्वास जाणवतो आणि आपण कोणत्याही गोष्टीसाठी तयार असतो. डेटॉल कोलोन आणि लाईम फ्रेश देऊन, आम्ही फक्त ताजेपणाच देत नाही तर आम्ही लोकांना आत्मविश्वासाचा अनुभव सुद्धा देतो. तुम्ही बोर्डरूममध्ये किंवा स्टेजवर स्वप्न पूर्ण करण्याचा विचार करत असाल पाठलाग करत असाल, तेव्हा १२ तासांचा ताजेपणा तुम्हाला तुमच्या सर्वोत्तम कामगिरीसाठी आत्मविश्वास देतो. डेटॉलकडून हा एक आकर्षक फायदा आहे कारण आम्ही ताजेपणा देऊन सोबतच संरक्षण सुद्धा देण्याचे वचन पूर्ण करतो - कारण जेव्हा तुम्हाला ताजेपणा जाणवतो, तेव्हा तुम्ही नेहमीच कशाही साठी तयार असता.

ही मोहीम दोन कार्यरत ऍंड फिल्मने चालवली आहे, तिची संकल्पना मॅक्कॅन वर्ल्डग्रुपची आहे. यावेळी, मॅक्कॅन वर्ल्डग्रुप इंडियाचे मुख्य क्रिएटीव्ह अधिकारी आणि सीईओ प्रसून जोशी म्हणाले, संधी वाट बघत नाहीत त्या कोणत्याही वेळी येऊ शकतात! आणि जेव्हा त्या येतात तेव्हा तुम्हाला त्या स्वीकारण्यासाठी ताजेपणा, आत्मविश्वास वाटायला हवा. हाच या मोहीमेचा उद्देश्य आहे. १२ तासांच्या ताजेपणासह, डेटॉल लाइम फ्रेश आणि कोलोन फ्रेश तुमच्या सोबत आहेत, ज्यामुळे सतत बाहेर फिरणाऱ्यांना ताजेपणा आणि आत्मविश्वास जाणवतो आणि शरीराच्या दुर्गंधापासून देखील संरक्षण मिळते.

## पीडब्ल्यूच्या श्रेया संजय पांडे हिला ९९.९९ पर्सेंटाइल; ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ९८ पर्सेंटाइल

**अमरावती, १८ जून :** फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने आपल्या एमएचटी सीईटी २०२५ च्या निकालांची घोषणा केली असून महाराष्ट्र बोर्डच्या ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पीसीएम विभागात ९८ पेक्षा जास्त पर्सेंटाइल गुण मिळाले आहेत. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रेया संजय पांडे (९९.९९ पर्सेंटाइल), निर्भय दिलीप लाहोडे (९९.८१ पर्सेंटाइल) आणि शुकल्य राऊत (९९.६१ पर्सेंटाइल) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी पीडब्ल्यूचे यूट्यूब चॅनेल पीडब्ल्यू महाराष्ट्राचा वापर करून तयारी केली होती. त्यातून संकल्पनेवर आधारित शिक्षण तसेच वन शॉट व्हिडिओसारख्या स्वरूपातून उजळणी करून घेतली जाते.

मला संकल्पनेच्या स्पष्टतेबाबत तडजोड करायची नव्हती, असे मत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक असलेल्या श्रेयाने व्यक्त केले. त्यामुळेच मी पीडब्ल्यूचा पर्याय निवडला. मला लेक्चर्सची उजळणी करता यायची, शंका तात्काळ सोडवता यायच्या आणि माझ्या अभ्यासाचे वेळापत्रक शाळेच्या तासांभोवती तयार करता यायचे. त्यामुळे मला सर्वात कठीण विषयांचा सामनाही सहजपणे करता आला.

फिजिक्सवालाचे शिक्षक, संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे म्हणाले की, एमएचटी सीईटी २०२५ ला बसलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे खूप अभिनंदन. मी कायमच या गोष्टीवर विश्वास ठेवला आहे की, यश फक्त गुणांवर अवलंबून नसते. ते सातत्यपूर्णता, प्रामाणिकपणा आणि प्रयत्नांवर आधारित असते. तुम्हा इतक्या विद्यार्थ्यांना आमच्या पीडब्ल्यू महाराष्ट्र यूट्यूब चॅनेलसारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करून यशस्वी होताना पाहणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. पीडब्ल्यूमध्ये तुमचा पहिला टप्पा किंवा शिकण्याचे प्राधान्याचे माध्यम काहीही असले तरी तुमच्या प्रवासात आम्ही मदत करण्याचा प्रयत्न करतो. तुमच्यापैकी काही जणांनी ठरवल्याप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत तर दुःख वाटून घेऊ नका. तुमचा प्रवास अद्याप सुरू आहे.

एमएचटी सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे माध्यम देण्याचा प्रयत्न फिजिक्सवाला करत आहे. त्यात एक समर्पित शंका निवारण इंजिन, व्हिडिओ सोल्यूशन्ससह रोजच्या सराव चाचण्या, वैयक्तिकीकृत अभ्यास योजना आणि अत्यंत सक्षम ग्रंथालय अशा वैशिष्ट्यांसह पीडब्ल्यू प्रत्येक विद्यार्थ्याच्या विशेष शैक्षणिक प्रवासाला मदत करण्याचा प्रयत्न करते. यंदाच्या वर्षी ४.२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी एमएचटी सीईटी २०२५ परीक्षेला बसले.

## मनी मार्केट फंड: सॉफ्टनिंग रेट सायकलमध्ये गुंतवणूकदारांची पसंती मिळवत आहेत



**नागपूर, १८ जून :** व्याजदरांमध्ये घट होत असताना, परतावा, सुरक्षा आणि लिक्विडीटी यांच्यात संतुलन करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी मनी मार्केट फंड एक विवेकी पर्याय म्हणून लोकप्रिय होत आहेत. आपल्या अल्प काळासाठीच्या आणि उच्च गुणवत्तेच्या होल्डिंग्ससाठी ओळखले जाणारे हे फंड्स, सॉफ्टनिंग व्याज दरांच्या वातावरणामध्ये लाभ मिळवण्यासाठी सज्ज आहेत.

नुकतेच भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या मुद्राविषयक धोरणामध्ये रेपो रेट ५० बेसिस पॉईंट्सने कमी करून ५.५% केला आहे. हे आश्चर्यजनक पाऊल उचलत, आरबीआयने रोख प्रवाह वाढवण्यासाठी आणि ऋण वृद्धीला प्रोत्साहन देण्यासाठी कॅश रिझर्व्ह रेशोमध्ये १०० बेसिस पॉईंट्सची घट केली. जसजसे डिपॉझिट रेट कमी होऊ लागतात, मनी मार्केट फंड लघु कालावधीची सरप्लस रोख पार्क करण्यासाठी पारंपरिक फिक्स्ड डिपॉझिटसाठी एक आकर्षक पर्याय प्रदान करतात.

टाटा ऍसेट मॅनेजमेंटचे डेप्युटी हेड - फिक्स्ड इन्कम श्री अमित सोमानी यांनी सांगितले, फ्रंट-लोडेड पॉलिसी सुलभ करण्याच्या चरणामध्ये प्रवेश करताना मनी मार्केट फंड गुंतवणूकदारांसाठी एक स्मार्ट अलोकेशन पर्याय प्रस्तुत करतात. आता रेपो रेट ५.५% झाल्यामुळे गुंतवणूकदार लिक्विडिटी कायम राखत आणि अस्थिरता मर्यादित करत, मनी मार्केट फंडमध्ये रेपोवर ५०-७५ बेसिस पॉईंट्स कमावू शकतात.

मनी मार्केट फंड्स ट्रेझरी बिल्स, कमर्शियल पेपर आणि डिपॉझिट सर्टिफिकेट्स इत्यादींमध्ये गुंतवणूक करतात, जे स्थिरता आणि उत्पन्न यांचे संतुलन प्रदान करतात. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडियानुसार, या श्रेणीमध्ये एप्रिल आणि मे २०२५ मध्ये ४२७३० कोटी रुपयांची एकूण गुंतवणूक करण्यात आली, ही बाब या श्रेणीवर गुंतवणूकदारांचा असलेला विश्वास अधोरेखित करते. हा ट्रेंड दर्शवत, टाटा मनी मार्केट फंडामध्ये या काळात नागपुरातून ९४ कोटी रुपयांची गुंतवणूक केली गेली. आर्थिक वर्ष २५ मध्ये शहरातून गुंतवणूक तीन पटींनी वाढून आर्थिक वर्ष २४ मधील १७४.२ कोटी रुपयांवरून ५६२ कोटी रुपये झाली. फंडाच्या व्यवस्थापनांतर्गत संपत्तीमध्ये ३०,००० कोटी रुपयांचा टप्पा पार करण्यात योगदान दिले.

टाटा मनी मार्केट फंडची कामगिरी डिसिप्लिन्ड ड्युरेशन मॅनेजमेंट आणि उच्च-क्रेडिट गुणवत्ता असलेल्या जारी करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करण्यावर आधारित आहे. जसजसे अल्पकालीन दर कमी होत जात आहेत, असे फंड धोरणात्मक आणि टॅक्टिकल ऍसेट अलोकेशन दोन्हींमध्ये सहभागी होण्यासाठी एक मजबूत केस प्रस्तुत करतात.

लिक्विड आणि मनी मार्केट फंड दोन्ही अल्पकालीन गरजा पूर्ण करतात, नंतरच्या ६ ते ९ महिन्यांपर्यंतच्या मॅच्युरिटीसह, अल्पकालीन ते मध्यम अवधीच्या दृष्टिकोन असलेल्या गुंतवणूकदारांसाठी थोडे चांगले उत्पन्न देऊ शकतात. त्यांच्यामध्ये निवड करणे गुंतवणूकदारांच्या टाईम होरायझॉन आणि जोखीम घेण्याची क्षमता यावर अवलंबून असते, पण दोन्ही वर्तमान धोरणामध्ये आकर्षक गुंतवणूक साधन बनले आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** तुमचा आत्मविश्वास जागृत करण्याचा प्रयत्न करावा लागेल. ज्यामुळे तुम्ही प्रतिकूल परिस्थितीचा सामना करू शकाल. एखाद्या शुभ कार्यक्रमाची सुरुवात कराल. घरात सुख-शांती राहील.

**वृषभ :** आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून चांगली बातमी मिळेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना परदेशात जाण्याचे आमंत्रण मिळेल. प्रगतीसोबतच यश मिळेल.

**मिथुन :** नवीन अनुभव मिळेल. आज थोड्या प्रयत्नाने तुम्हाला मोठा नफा होईल. खेळाशी संबंधित लोकांना आज त्यांच्या प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जाईल, ज्याचा फायदा त्यांना खेळाच्या मैदानात मिळेल.

**कर्क :** तुमच्यासमोर कामासंबंधित आव्हान असेल. पण तुम्ही त्यावर मात करण्यात यशस्वी व्हाल. तुम्हाला नशिबाची पूर्ण साथ मिळेल. अचानक धनलाभ होण्याची संधी मिळेल.

**सिंह :** मन प्रसन्न राहील. ऑफिसच्या कामात तुम्ही व्यस्त राहाल. ज्यामुळे तुमचे बॉस तुमच्यावर खुश होतील. समाजात एखाद्या मुद्द्यावर तुम्ही आपले मत इतरांसमोर मांडाल, ज्याचा स्पष्ट परिणाम दिसेल.

**कन्या :** आज तुम्हाला कामावर काम करण्याची इच्छा होणार नाही. तुम्हाला पुन्हा पुन्हा काही अनुचित घटना घडण्याची भीती वाटेल. आज तुमचा वेळ घराच्या साफसफाईमध्ये जाईल.

**तुळ :** तुमचे आरोग्य चांगले राहील. अधिकाजयांसोबत चांगले संबंध राखण्याचा प्रयत्न यशस्वी होईल. एखाद्या मित्राचे सहकार्य मिळेल. नोकरी करणाजया व्यक्ती आज आपली नोकरी बदलण्याचा विचार करू शकतात.

**वृश्चिक :** तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. ज्यामुळे गरजेच्या वस्तू खरेदी कराल. आज तुम्हाला तुमच्या खर्चांवर नियंत्रण ठेवावे लागेल. मुले आजी-आजोबांसोबत फिरायला जाऊ शकता.

**धनु :** जे लोक मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात त्यांना विशेष यश आणि आर्थिक लाभ मिळतील. नोकरीतील तुमच्या प्रामाणिक कामाच्या शैलीने प्रभावित होऊन, तुमचा बॉस तुमचा पगार वाढवेल.

**मकर :** जवळच्या व्यक्तीकडून तुमच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. तुमच्या घरी एक दूरचा नातेवाईक येईल. त्याला भेटून तुम्हाला खूप आनंद होईल. एकमेकांच्या भावनांचा आदर करावा.

**कुंभ :** आज आर्थिक स्थिती सुधारेल. संपत्ती आणि मालमत्ता वाढेल. जमीनीचा जुना वाद मिटेल. पशुपालनात गुंतलेल्या लोकांना चांगले उत्पन्न मिळेल. दारू पिऊन कामावर जाऊ नका.

**मीन :** आजचा दिवस खूप चांगला असेल. जर तुम्ही विवाहित असाल, तर काहीतरी सरप्राईज प्लॅन करू शकतात. आज दिवस कमाईच्या बाबतीत खूप चांगला असेल. तुमच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

# आईकू ने आईकू ज़ेड१० लाइट ५जी लाँच केले



**नवी दिल्ली, १८ जून :** उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आईकू ने आज त्यांची नवीनतम ऑफर आईकू ज़ेड१० लाइट ५जी लाँच केली. हा स्मार्टफोन विशेषतः आजच्या तरुणांना लक्षात घेऊन डिझाइन केला आहे - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते परवडणाऱ्या ५जी स्मार्टफोनवर अपग्रेड करू इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत. हे उपकरण बिनगे-वॉचिंग, सोशल स्क्रोलिंग आणि ऑनलाइन व्याख्याने यासारख्या क्रियाकलापांसाठी पूर्णपणे भरलेला मनोरंजन अनुभव देते. स्टायलिश डिझाइनमधील कार्यात्मक वैशिष्ट्यांसह, ज़ेड१० लाइट ५जी एक स्मार्ट आणि विश्वासार्ह साथीदार आहे. या सेगमेंटमधील सर्वात मोठ्या ६००० एमएएच बॅटरीसह येणारे हे उपकरण अविरत मनोरंजनासाठी सज्ज आहे. हे मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० ५जी प्रोसेसरद्वारे समर्थित आहे, जे स्मूथ ५जी कनेक्टिव्हिटी आणि आयपी६४ डस्ट वॉटर रेझिस्टन्ससह उत्तम कामगिरी देते. आईकू ज़ेड१० लाइट ५जीच्या किमती खालीलप्रमाणे आहेत - ४जीबी + १२८जीबी व्हेरिएंटसाठी ९,९९९ रुपये (निव्वळ प्रभावी किंमत: ९,४९९ रुपये) ६जीबी + १२८जीबी व्हेरिएंटसाठी १०,९९९ रुपये (निव्वळ प्रभावी किंमत: १०,४९९ रुपये) ८जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी १२,९९९ रुपये (निव्वळ प्रभावी किंमत: १२,४९९ रुपये) हा स्मार्टफोन सायबर ग्रीन आणि टायटॅनियम ब्लू रंगांमध्ये उपलब्ध असेल आणि त्याची पहिली विक्री २५ जून रोजी आईकू ई-स्टोअर आणि ऐमेज़ॉन.इन वर लाइव्ह होईल. यासोबतच, तुम्ही हा स्मार्टफोन एसबीआई क्रेडिट/डेबिट कार्डवर खरेदी करू शकता. ५०० रुपयांची फ्लॅट इन्स्टंट सूट देखील उपलब्ध असेल. आईकूच्या सीईओ निपुण मरिया म्हणाल्या, आईकू ज़ेड१० लाइटद्वारे, आमचे उद्दिष्ट असा फोन तयार करणे होते जो तरुण भारतातील जीवनशैली समजून घेईल. सतत पाहणे असो किंवा सोशल मीडियावर सक्रिय असणे असो - हा ५ जी स्मार्टफोन सर्वत्र जाईल. ६००० एमएएचची प्रचंड बॅटरी आणि पूर्णपणे लोडेड फीचर सेटसह, हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी परिपूर्ण साथीदार आहे ज्यांना कोणतीही तडजोड न करता सर्वकाही हवे आहे. अमेझॉन इंडियाचे स्मार्टफोन्स आणि ॲक्सेसरीज कॅटेगरी लीडर तन्मय शाह म्हणाले, आम्हाला ऐमेज़ॉन.इन वरील आमच्या ५जी स्मार्टफोन पोर्टफोलिओमध्ये आईकू ज़ेड१० लाइट ५जी जोडण्यास उत्सुकता आहे. हे डिव्हाइस आईकू ज़ेड१० लाइट ५जी चे उत्तराधिकारी आहे, जे २०२४ मध्ये बजेट सेगमेंटमध्ये सर्वाधिक विक्री झाले होते. आईकू ज़ेड१० लाइट ५जी हे आजच्या मूल्य-जागरूक ग्राहकांसाठी डिझाइन केले आहे ज्यांना प्रवासात विश्वासार्ह कामगिरी हवी आहे. लाँच ऑफर्ससह, आम्ही देशभरातील लाखो ग्राहकांना ते उपलब्ध करून देण्यास उत्सुक आहोत. या सेगमेंटमधील सर्वात मोठी बॅटरी असलेला ५जी स्मार्टफोन, आयक्यूओ झेड१० लाईट ५जी मध्ये ६००० एमएएचची मोठी बॅटरी आहे जी संपूर्ण दिवसासाठी पॉवर देते - कंटेंट वापरण्यासाठी, शिकण्यासाठी आणि कनेक्टिव्हिटीसाठी. बॉक्समध्ये १५ वॅटचा चार्जर समाविष्ट आहे, ज्यामुळे रिचार्जिंग सोपे आणि त्रासमुक्त होते. दीर्घकालीन वापरासाठी डिझाइन केलेली बॅटरी, ५ वर्षांनंतर (१५०० चक्रे) ८०% पर्यंत क्षमता टिकवून ठेवते. टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे कठीण आईकू ज़ेड१० लाइट ५जी वास्तविक जगाच्या टिकाऊपणा लक्षात घेऊन डिझाइन केलेले आहे. आयपी६४ रेटिंग धूळ आणि स्प्लॅशपासून त्याचे संरक्षण करते.

## वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे पुरुष आरोग्य महिन्यानिमित्त खास हेल्थ पॅकेज

**नागपूर, १८ जून :** पुरुष आरोग्य महिन्याच्या निमित्ताने गांधी नगर, नागपूर येथील वोक्हार्ट हॉस्पिटल्स ने एक विशेष आरोग्य तपासणी पॅकेज सादर केले आहे. हे पॅकेज सुमारे ५,००० किमतीचे असून, आता हे केवळ ९९९ मध्ये मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहे. ही ऑफर ३० जून २०२५ पर्यंत वोक्हार्ट हॉस्पिटल्स, २७ कॉर्पोरेशन कॉलनी, अंबाझरी रोड, नागपूर येथील हॉस्पिटलच्या जुन्या इमारतीत उपलब्ध आहे.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे पुरुषांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि आरोग्याच्या समस्यांचे लवकर निदान करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आहे. या पॅकेजमध्ये प्रमुख अवयवांच्या कार्यक्षमतेशी संबंधित आवश्यक निदान चाचण्या समाविष्ट आहेत:

१. ब्लड टेस्ट
सीबीसी (पूर्ण रक्त तपासणी), फास्टिंग ब्लड शुगर (उपाशी रक्तातील साखर तपासणी)
२. हृदयाचे आरोग्य
लिपिड प्रोफाईल, ईसीजी (इलेक्ट्रोकार्डिओग्राम)
३. किडनी फंक्शन
युरिया, क्रिएटिनिन, युरिक ॲसिड (किडनी फंक्शन टेस्ट)
४. लिव्हर फंक्शन
लिव्हर फंक्शन टेस्ट (यकृत कार्य चाचणी)
५. फुफ्फुसांचे आरोग्य
पल्मोनरी फंक्शन टेस्ट (पीएफटी), छातीचा एक्स-रे
६. प्रोस्टेट तपासणी (फक्त पुरुषांसाठी)
प्रोस्टेट स्पेसिफिक अँटीजन (पीएसए)

विशेष टीप: या पॅकेजचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी, पीएसए चाचणीऐवजी पीएपी स्मीयर टेस्ट केली जाईल.

या उपक्रमाबद्दल बोलताना वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे सेंटर हेड श्री. रवी बागली म्हणाले, वोक्हार्ट हॉस्पिटल्समध्ये आम्ही प्रत्येक नागरिकाला परवडणारी आणि सहज उपलब्ध होणारी आरोग्यसेवा देण्यास कटिबद्ध आहोत. या पुरुष आरोग्य महिन्यातील उपक्रमामार्फत आम्ही प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या आणि लवकर निदानासाठी लोकांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'निरोगी भारत' हे आमचे ध्येय असून, आम्ही समाजासाठी आमचे सर्वोत्तम योगदान देत राहू.

नागपूरच्या नागरिकांनी या आरोग्य उपक्रमाचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. अपॉईंटमेंटसाठी आणि अधिक माहितीसाठी कृपया वॉकहार्ट हॉस्पिटल्स, गांधी नगर, नागपूर येथे संपर्क साधा. फोन क्रमांक: ०७१२-६६५५१९९.

## ॲमवे इंडियाने आपला रोगप्रतिकार शक्तीचा (इम्युनिटी) पोर्टफोलिओ मजबूत केला

**नवी दिल्ली, १८ जून :** जीवनशैलीतील आजार वाढत चालले आहेत आणि आरोग्यविषयक जागरुकता वाढत चालली आहे आणि म्हणून भारतात आपल्याला सक्रिय आरोग्यसेवेकडे स्पष्टपणे वळलेले पहायला मिळत आहे. ॲमवे इंडिया ही आरोग्य आणि स्वास्थ्य यांस प्रोत्साहन देणारी एक आघाडीची कंपनी आहे. उपभोक्त्याच्या बदलत्या गरजांशी जुळवून घेताना, ॲमवे इंडियाने न्यूट्रिलाईट ट्रिपल प्रोटेक्टसह तिची पोषण श्रेणी भक्कम केली आहे. हे एक वैज्ञानिकदृष्ट्या तयार केलेले, वनस्पती वर आधारित पूरक आहार आहे ज्याला ॲसेरोला चेरी, हळद, आणि लिकोराईस यांच्या नैसर्गिक शक्तीचा आधार देण्यात आलेला आहे. या शक्तिशाली सुत्रीकरणात रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देणे, दाह कमी करणे, आतडे, त्वचा आणि रोगप्रतिकारक आरोग्यासाठी मजबूत अँटिऑक्सिडंट प्रदान करणे, अशी तिप्पट कार्ये करून लाभ प्रदान करणारी पोषक तत्त्वे आहेत.

लाँच बाबत टिप्पणी करत, रजनीश चोप्रा, व्यवस्थापकीय संचालक, ॲमवे इंडिया यांनी सांगितले, देशाच्या निम्म्याहून अधिक आरोग्यावर कमी प्रमाणात पोषण मिळाल्याचा परिणाम होत आहे आणि म्हणून सर्वांगीण कल्याणासाठी स्वच्छ, वनस्पती वर आधारित उपायांची गरज आता वाढत जाणार आहे. आजचे उपभोक्ते आरोग्याला आता जास्त प्राधान्य देत आहेत, पूरक आहारांमध्ये ५२% लोकं रोगप्रतिकारकशक्तीला सर्वोच्च लाभ म्हणून स्थान देत आहेत आणि त्यायोगे समग्र स्वास्थ्याकरिता शिफारशींची वाढती मागणी स्पष्ट होत आहे. उपभोक्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन आणि उत्पादन नाविन्य उपक्रम पाइपलाइन वेगवान करण्याच्या आमच्या धोरणात्मक व्यवसायाच्या प्राधान्याचा एक भाग म्हणून, आम्ही आनंदाने आमचे नवीनतम नाविन्य उपक्रम - न्यूट्रिलाईट ट्रिपल प्रोटेक्ट बाय ॲमवे, सादर करीत आहोत. हे विशिष्ट सूत्रीकरण विज्ञानाने शक्ती प्रदान केलेल्या घटकांना एकत्रित करते ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती, आतडे आणि त्वचेला समर्थन मिळते आणि व्यक्तींना स्वतःच्या स्वास्थ्याच्या सर्वसमावेशक दृष्टीकोनाला सक्रियपणे स्वीकारण्यासाठी सबल करते. आरोग्याला प्राथमिकता देणाऱ्या दृष्टिकोनासह, आम्ही ॲमवे मध्ये व्यक्तींना त्यांच्या आरोग्यावर आणि स्वास्थ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांचा आरोग्य कालावधी सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सामर्थ्य देण्याची बांधिलकी स्वीकारलेली आहे आणि लोकांना फक्त दीर्घायुष्य जगण्यास नव्हे, तर निरोगी आयुष्य जगण्यास सुद्धा मदत करीत आहोत.

या शक्तिशाली सुत्रीकरणाबद्दल बोलताना, अमृता असरानी, मुख्य विपणन अधिकारी, ॲमवे इंडिया यांनी सांगितले, संपूर्ण आरोग्याची प्रगती करण्याची ॲमवे इंडियाने स्वीकारलेली बांधिलकी सुरु आहे आणि न्यूट्रिलाईट ट्रिपल प्रोटेक्ट त्या बांधिलकीचा पुरावा आहे. हे ॲसेरोला चेरी, हळद आणि लिकोराईस यांनी भरलेले असून या शक्तिशाली त्रिकूटात असे पोषक तत्वे आहेत जे एकत्र येऊन एकूण आरोग्यास समर्थन प्रदान करत आहेत. एक सैनिकासमान सेरोला चेरी आघाडीवर आहे आणि व्हिटॅमिन सी च्या स्रोतांपैकी एक म्हणून सेरोला चेरीसोबत एस्कॉर्बिक ॲसिड वापरून रोगप्रतिकारशक्तीला समर्थन पुरविले जाते. त्यानंतर रांगेत येते लिकोराईस आणि हे शांतता निर्माण करणारे म्हणून कार्य करते. लिकोराईस दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडेंट गुणधर्म दर्शविते जे शरीराच्या एकूण संरक्षण यंत्रण्यास समर्थन देऊ शकतात. शेवटी, हळद संरक्षकाचे कार्य करते, मुक्त कणांना (फ्री रॅडिकल्सला) निष्क्रिय करून अँटीऑक्सीडेंट फायदे प्रदान करते. एकत्रितपणे, हे घटक एक तिप्पट कार्य करणारे सुत्रीकरण तयार करतात जे एकमेकांना सहकार्य करून रोगप्रतिकारशक्तीला समर्थन पुरवितात, दाह कमी करतात आणि एकूण स्वास्थ्य वाढवण्यासाठी अँटीऑक्सीडेंट फायदे प्रदान करतात.

## बदामांचे सेवन करत यंदा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करा



**नागपूर, १८ जून :** दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय योग दिन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्य वाढवण्यामध्ये योगाच्या सर्वांगीण फायद्यांना प्रकाशझोतात आणतो. योगा केल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात, पण सानुकूल निष्पत्तींसाठी त्यासोबत संतुलित आहाराचे सेवन करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आरोग्यदायी आहारामध्ये कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, मिनरल्स अशा पौष्टिक घटकांचा समावेश असला पाहिजे. प्रथिने महत्त्वपूर्ण पौष्टिक घटक आहे आणि प्रथिनांच्या उत्तम नैसर्गिक स्रोतांपैकी एक बदाम सोईस्कर व पौष्टिक निवड आहेत. तुम्ही दीर्घकाळापर्यंत योगासने करत असाल किंवा आव्हानात्मक काम करत असाल पुरेशा प्रमाणात प्रथिनांचे सेवन केल्याने शारीरिक क्षमता कायम राहते आणि सत्रानंतर स्नायूबळ वाढण्यास मदत होते. दैनंदिन नित्यक्रमामध्ये बदामांचा समावेश करणे योगाच्या प्रवासाला प्रबळ करण्याचा सोपा व गुणकारी मार्ग ठरू शकतो.

नट्सचा राजा बदाम पोषणाचा पॉवरहाऊस आहे. बदामांमध्ये १५ आवश्यक पौष्टिक घटक असतात आणि अनेक आरोग्यदायी फायदे देतात. नुकतेच डॉ. मार्क कर्न यांनी प्रकाशित केलेल्या संशोधनामधून निदर्शनास आले की, नियमित बदामांचे सेवन केल्याने व्यायामानंतर स्नायूंचे नुकसान कमी होत स्नायूबळ जलदपणे वाढण्यास मदत होऊ शकते. डॉ. ऑलिव्हर यांच्या संशोधनामधून बदाम व्यायामानंतरचे गुणकारी स्नॅक म्हणून निदर्शनास आले, जे स्नायूदुखी कमी होण्यास मदत करतात आणि स्नायूबळ वाढवतात. यामुळे बदाम व्यायाम व योग नित्यक्रमासाठी परिपूर्ण सोबती आहेत, जे सुधारित कार्यक्षमता आणि एकूण आरोग्यासाठी शरीराला उत्तम पोषण देतात.

दैनंदिन आहारामध्ये बदामांचा समावेश केल्याने विविध आरोग्यदायी फायदे मिळू शकतात, जसे एलडीएल (बॅड) कोलेस्ट्रॉल कमी करू शकतात, रक्तातील शर्करेच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवू शकतात, त्वचा आरोग्यदायी ठेवू शकतात आणि वजनावर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात. तसेच, बदाम अत्यंत वैविध्यपूर्ण आहेत आणि कोणत्याही प्रकारामध्ये सेवन करता येऊ शकतात, पण त्यांच्यामधील पौष्टिकता कायम राहते. सर्वोत्तम बाब म्हणजे बदाम दैनंदिन आहारामध्ये सहजपणे समाविष्ट करता येतात. बदाम स्नॅक म्हणून सेवन करता येतात, सॅलड्समध्ये टाकता येऊ शकतात, स्मूदीजमध्ये मिसळता येतात किंवा विविध डिशेसमध्ये गार्निशिंग म्हणून वापरता येतात.

## योगामुळे कलाकारांच्या जीवनात बदल घडून आला!

**मुंबई, १८ जून :** योगा बऱ्याच काळापासून अनेकांसाठी संतुलन व उपचाराचा स्रोत राहिला आहे, ज्यामधून शारीरिक, भावनिक व मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. यंदा आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त एण्ड टीव्हीवरील कलाकार या प्राचीन पद्धतींचा त्यांच्या जीवनावर झालेल्या सकारात्मक परिणामाबाबत सांगत आहेत, तसेच इतरांना योगा करण्याचे आवाहन करत आहेत. हे कलाकार आहेत गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि आसिफ शेख (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील विभुती नारायण मिश्रा).

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''योगाने माझ्या जीवनात, विशेषत: आव्हानात्मक काळादरम्यान परिवर्तनात्मक बदल घडवून आणला आहे. मी विशेषत: व्यस्त शूटिंगनंतर थकून जायची आणि अतिप्रमाणात आहार सेवन करायची. मी माझ्या नित्यक्रमाध्ये पश्चिमोत्तानासन (बसून पुढे वाकणे) करायला सुरूवात केली, ज्यामुळे मज्जासंस्थेला आराम मिळू लागला आणि भावनिक ताण कमी झाला. मी आणखी एक योगासन करते, ते म्हणजे नाडी शोधन प्राणायाम (एक नाकपुडी बंद करत दुसऱ्या नाकपुडीमधून श्वास घेणे), जे रिसेट बटनासारखे काम करते, त्वरित शांतमय भावना व प्रसन्नता देते. या योगासनांनी माझ्या जीवनात सजगता आणली आहे, माझे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होत आहे.''

मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये विभुती नारायण मिश्राची भूमिका साकारणारे आसिफ शेख म्हणाले, ''कामाच्या गडबडीत शारीरिक फिटनेस उत्तम राखण्यासह मानसिक व भावनिक संतुलन राखणे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या धावपळीच्या युगामध्ये योग माझ्यासाठी उत्तम ठरले आहे. वृक्षासन (झाडाप्रमाणे पवित्रा) मला धावपळीदरम्यान, विशेषत: दीर्घकाळपर्यंत शूटिंग केल्यानंतर शांत व अवधान केंद्रित करण्यास मदत करते. भुजंगासनने (कोब्रा पवित्रा) माझी शारीरिक क्षमता प्रबळ केली आहे आणि ऊर्जा वाढवली आहे. मी दररोज हे आसन करतो. मी प्रवास करत असलो तरी कधीच अनुलोम विलोम टाळत नाही. मी शूटिंगसाठी तासभर प्रवास करताना देखील हे आसन करतो. यामुळे मला मन:शांती मिळते आणि मी तणावमुक्त राहतो. जेवणानंतर मी वज्रासन करतो, ज्यामुळे अन्नपचनास मदत होते आणि हे आसन अत्यंत गुणकारी ठरले आहे.''


### आज का अंदाज

गुरूवार १९ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ७ | २ | ५ | ६ | ८ |
| २४५ | १६६ | ११२ | १२४ | १२९ | १४० | २४० | १३४ |
| ३८० | २२९ | २५७ | २७८ | २४६ | २५८ | ३६७ | २८८ |
| ६७८ | ३३७ | ३४७ | ३६८ | ३४५ | ३४८ | ४६६ | ३६७ |
| १० | ३० | ४१ | ७३ | २१ | ५१ | ६२ | ८३ |
| १२ | ३२ | ४५ | ७८ | २४ | ५२ | ६५ | ८४ |
| १५ | ३६ | ४६ | ७० | २६ | ५६ | ६८ | ८९ |

**१९ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६२ | ९२ |
| २५ | ३५ | ६५ | ९३ |
| २६ | ३६ | ६७ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## तेनाली हिप्नॉसिसचे रहस्य उलगडून एकापाठोपाठ एक झालेल्या आत्महत्यांचा छडा लावणार



**मुंबई, १८ जून :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेने तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या महान दरबारी कवी आणि अत्यंत मुत्सद्दी रणनीतीकर्त्याच्या सुरस कथा सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, तेनाली पवित्र राजदंडाच्या चोरीमागचे कारस्थान उघड करतो, राज्य पुट्टी (अजित झा) च्या भोंदुपणाचे पितळ उघडे पाडतो आणि कृष्णदेवराय (आदित्य रेडिज) राजाला हे समजावून देतो की राजेपद हे विनम्रतेत असते, संकेतांमध्ये नाही!

आगामी भागांमध्ये, एकामागून एक आत्महत्येच्या घटना घडतात, ज्यांच्यामुळे विजयनगर साम्राज्य हादरून जाते. या प्रत्येक घटनेत मरणारी व्यक्ती मरता मरता काही ठराविक शब्द पुटपुटते. याच्यामागे काही तरी जादूटोणा असल्याची शंका तेनालीच्या मनात येते, पण त्यातील हिप्नॉसिसचे संकेत त्याच्या लक्षात येतात. तो हिप्नॉटिस्ट चंद्रकला (पियाली मुन्शी) ची मदत घेतो. तिचे म्हणणे असते की, तिचा एक दुष्ट स्वभावाचा शिष्य या मृत्युंच्या मुळाशी आहे. या प्रकरणाचा छडा लावत लावत तेनाली बेल्लारीत जाऊन पोहोचतो. येथे एक काव्य गायन आणि एक संदिग्ध कवी विरुपाक्ष (विपिन शर्मा) यांच्याकडे तेनालीला अपेक्षित ते उत्तर असते. रहस्याचा एक एक पदर सोडवता सोडवता, रामाला छडा लागतो की, विरुपाक्षची पत्नी शर्वणी (दीपाली सैनी) यामध्ये गोवलेली आहे. पण अचानक तिचा मृत्यू होतो आणि त्यामुळे गुंता वाढतो. चंद्रकलाची नेमणूक रॉयल माइंड कोच म्हणून करण्यात येते आणि दरबारावरील तिचा प्रभाव वाढतो, तेव्हा रामाच्या मनात हा विचार प्रबळ होऊ लागतो की, खरा सूत्रधार सतत त्याच्या सोबतच तर नव्हता?

## झी टीव्हीच्या कलाकारांनी शेअर केले संगीताशी जोडलेले त्यांचे खास क्षण!



**मुंबई, १८ जून :** जगातील एकमेव अशी भाषा जी कोणत्याही भाषांतराशिवाय समजते ती म्हणजे संगीत त्याचा उत्सव म्हणजे वर्ल्ड म्युझिक डे! दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जाणारा हा दिवस केवळ सुर आणि तालाचा नव्हे, तर आठवणींचा, भावना व्यक्त करणाऱ्या चालींचा आणि परंपरांमध्ये मिसळलेल्या लयीचा उत्सव आहे. सण-उत्सवांनी गजबजलेल्या गल्लीपासून ते शांत खोलीपर्यंत, संगीत हे नेहमीच मानवी भावना आणि अनुभवांचे स्पंदन राहिले आहे जे पिढ्यान्पिढ्या जोडते, मनाला शांती देते आणि हृदयात प्रेरणा जागवते. या खास दिवशी झी टीव्हीच्या कलाकारांनी सरू मधील मोहक मटकर, वसुधा मधील प्रिया ठाकुर, जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराणा, जमाई नं.१ मधील अभिषेक मलिक, जागृति एक नयी सुबह मधील रचना मिस्त्री आणि कुमकुम भाग्य मधील आर्ची सचदेव यांनी आपल्या आयुष्यातील त्या संगीताने भरलेल्या खास क्षणांच्या आठवणी सांगितल्या, ज्या त्यांच्या भावविश्वाशी घट्ट जोडल्या गेल्या, मनाला शांतता दिली आणि कायमच्या त्यांच्या आयुष्याचा भाग बनल्या पडद्यावर आणि पडद्यामागेसुद्धा.

सरूमध्ये सरूची भूमिका साकारत असलेली मोहक मटकर म्हणाली, माझ्यासाठी संगीत हे कधीच फक्त पार्श्वसंगीत नव्हते ते माझ्या जीवनाचे गाणे आहे. लहानपणापासून मी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत शिकायला सुरुवात केली होती, पण या प्रेमाला खरी खोली माझ्या आईने दिली. रियाज करताना ती नेहमी माझ्यासोबत बसायची आणि हलकेच सूर लावायची. एकदा आमचा रेडिओ बंद पडला होता, तेव्हा आम्ही दोघींनी मिळून लता मंगेशकर यांचे एक जुने गाणे गायला सुरुवात केली. मग हळूहळू घरातले सगळेच सामील झाले अगदी ड्रायव्हरही गायला लागला! तो क्षण एखाद्या जादूसारखा होता वेळ स्तब्ध झाला होता आणि आम्ही संगीताच्या लाटांमध्ये तरंगत होतो. संगीत हे असंच असतं प्रेम, हास्य आणि आठवणी एका क्षणात समेटून टाकणारं. माझ्यासाठी वर्ल्ड म्युझिक डे म्हणजे अशाच खास क्षणांना पुन्हा जिवंत करणं आणि प्रत्येक सूरात पुढे जात राहणं.

वसुधामध्ये वसुधा साकारणारी प्रिया ठाकुर म्हणाली, माझ्यासाठी संगीत म्हणजे आठवणी उन्हाळ्याच्या दुपारी येणाऱ्या गंधासारखे, बालमित्रांच्या हास्यासारखे, त्या अंताक्षरीच्या स्पर्धांची आठवण, ज्या तासन्तास चालायच्या. आमच्या शहरात एक प्रथा होती आम्ही सर्वजण हातात खाऊ घेऊन छतावर जमायचो आणि जुन्या गाण्यांवर मनमुराद गाणी गायचो. अनेकदा आम्ही स्वत:चे शब्द तयार करायचो, आणि कदाचित अशाच गोंधळात आमची मैत्री आणखी घट्ट व्हायची. आज आम्ही वेगवेगळ्या शहरांमध्ये आहोत, पण जेव्हा मी एकटीने ते गाणी ऐकते, तेव्हा वाटतं की त्यांच्या आवाजांचा प्रतिध्वनी अजूनही माझ्याभोवती आहे. या वर्ल्ड म्युझिक डे ला मी ठरवलंय आमच्या ग्रुप चॅटवर त्या आठवणी पुन्हा जिवंत करायच्या आहेत, एक गाणं, एक चुकीचा बोल आणि आम्ही पुन्हा हसणार आहोत!

## पात्रांची अवस्था दयनीय झाली!

**मुंबई, १८ जून :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'मध्ये पात्रं तणावपूर्ण व विनोदी स्थितींमध्ये अडकतात. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील आगामी एपिसोडबाबत दरोगा हप्पू सिंग ऊर्फ योगेश त्रिपाठी म्हणाले, ''अवधेशिया (उर्मिला शर्मा) एक विचित्र सत्य उघड करते की, राजेशला (गीतांजली मिश्रा) सशासारख्या दातांची खूप भिती वाटते. ते पाहिल्यावर तिला पॅनिक अटॅक येतात, ज्यामुळे तिचे मानसिक संतुलन बिघडते आणि ती नियंत्रणाबाहेर जाते. दरम्यान, डेण्टिस्टने चुकून पत्नीचे दात काढल्यानंतर कमिशनर (किशोर भानुशाली) त्याच्यावर संतापतो आणि बिचाऱ्या हप्पूला (योगेश त्रिपाठी) त्याच्या बॉसच्या रागाचा सामना करावा लागतो. परिस्थिती अधिक बिकट होते, जेथे हप्पूचे एका स्थानिक गुंडासोबत भांडण होते. तो हप्पूला इतकी मारहाण करतो की, त्याचे दात पडतात. हप्पू त्या स्थितीत घरी आल्यानंतर राजेश त्याला पाहून घाबरते. तिला आता सर्वजण भयानक दात असल्याचे दिसू लागतात आणि ती तिच्या आजुबाजूच्या सर्वांसह कटोरी अम्मावर (हिमानी शिवपुरी) हल्ला करते. कुटुंब एका डेण्टिस्टशी संपर्क साधतात, तो स्पष्टपणे सांगतो की हप्पूच्या दातांच्या नसा सुजल्या आहेत आणि त्याला किमान एक महिना असेच राहावे लागेल. उपाय शोधण्याच्या प्रयत्नात असलेले कुटुंब राजेशसाठी मानसोपचारतज्ज्ञाला बोलावतात, जो तिला रस्सीने बांधून ठेवून तिच्या भीतीचा सामना करण्याचा विलक्षण उपाय सुचवतो. हप्पू संकोच करत राजेशला रस्सीने बांधतो आणि दात दाखवतो. ती ओरडते, रस्सी सोडते आणि घराभोवती त्याचा पाठलाग करते. हप्पूला वाटते की तो सुरक्षित आहे, त्याच वेळी कटोरी अम्मा त्याला मागून पकडते, तर राजेश ओरडत राहते. सुदैवाने हप्पूचे दात शेवटी सामान्य होतात. पण संकट संपलेले नसते, कारण राजेश आता सामान्य दातांना देखील घाबरते! तिचा सामना करण्यासाठी संपूर्ण कुटुंब घरात बनावट दात घालू लागतात. मानसोपचारतज्ज्ञ दुसऱ्यांदा परत येतो, यावेळी संमोहित करून राजेशला ड्रॅक्युलाच्या चित्राकडे पाहण्यास भाग पाडतो आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ती आता सामान्य आणि विचित्र दोन्ही दातांना घाबरते, पण ड्रॅक्युलाचे दात तिला ठीक वाटतात. आता कुटुंब काय करेल?''

## मी अनेक टेक्समध्ये २२ पूर्ण घूमर केले : नौशीन अली

**मुंबई, १८ जून :** झी टीव्हीवरील वसुधा मालिका आपली भावनिक कथा आणि अनेक स्तर असलेल्या व्यक्तिरेखा यांसह देशभरातील प्रेक्षकांसोबत एक शक्तीशाली नाते निर्माण करत आहे. सध्या मालिकेतील घटनांना एक भावनिक वळण मिळाले असून, वसुधा (प्रिया ठाकूर) एका मोठ्या मानसिक धक्क्यातून जात आहे, कारण चौहान कुटुंब आता मेघा (मनदीप कौर) हिला देवांश (अभिषेक शर्मा) साठी योग्य जोडीदार मानू लागले आहेत. आगामी भागांमध्ये देवांश आणि मेघाच्या साखरपुड्याचा जल्लोष साजरा केला जाणार असून, पारंपरिकतेने भरलेले, संगीत आणि उत्साहाने भारलेले हे वातावरण भारावून टाकणारे असेल.मात्र या थाटामाटात एक क्षण असा येतो जो खऱ्या अर्थाने शोस्टॉपर ठरतोआकर्षक आणि मोहक घूमर सादरीकरण, जे चंद्रिकाच्या रूपात नौशीन अली सरदार यांनी साकारले आहे. राजस्थानच्या सांस्कृतिक परंपरेत खोल रुजलेला घूमर हा पारंपरिक लोकनृत्य प्रकार आहे, जो नव्या सुरुवातींचे प्रतीक मानला जातो. नौशीन यांनी अत्यंत नाजूकतेने आणि प्रभावीपणे हे नृत्य सादर करत परंपरेला मान दिला आहेबळकट गिरक्या, प्रभावी अशा हातांच्या हालचाली आणि मंचावरील त्यांच्या उपस्थितीने हे सादरीकरण उठून दिसले. या सीक्वेन्ससाठी त्यांनी चार दिवस कसून सराव केला. एका प्रोफेशनल कोरिओग्राफरच्या मार्गदर्शनाखाली पायांची हालचाल, हातांचे नाजूक इशारे आणि घूमरची खास शैली आत्मसात करत त्या साकारणे ही एक साधना होती. स्वतःच्या अनुभवाबद्दल बोलताना नौशीन अली सरदार म्हणाल्या, घूमर सादर करणे ही माझ्यासाठी खूपच आनंददायक आणि विशेष गोष्ट होती. हे नृत्य अत्यंत नाजूक, परंपराशील आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आहे. मी चार दिवस या नृत्याचा सखोल सराव केलाहातांचे इशारे, पावलांचा ठेका, आणि चेहऱ्यावरील भाव सर्व काही समजून घेतले. आम्ही पारंपरिकतेला न्याय देण्यासाठी प्रत्येक हालचाल बारकाईने शिकली. मी संपूर्ण पोशाखात सराव केला, ज्यामुळे घागऱ्याचं वजन, त्याचा फडफडणारा पट आणि गिरक्या घेताना लागणारा ठेका याची खरी अनुभूती मिळाली. मी चंद्रिकेचा नाजूकपणा जपत हे नृत्य प्रामाणिकपणे सादर करण्याचा प्रयत्न केला.

# ६ महिन्यांत नक्षलवाद्यांचा कमांडर अनब बिश्नोई गँगचा सदस्य अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १८ :





शहरात मागील सहा महिन्यांत दोन मोठ्या गुन्हेगारांना अटक झाल्याने खळबळ उडाली आहे. काही महिन्यांपूर्वी नक्षलवादी कमांडरला अटक करण्यात आले होते, तर नुकत्याच केलेल्या धाडीत इंटरनॅशनल गुन्हेगारी टोळी लॉरेन्स बिश्नोई गँगचा सक्रिय सदस्य भूपेंद्र सिंह उर्फ भिंडा याला अटक करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षात गुन्हेगारी वतुर्ळात चर्चेत असलेल्या लॉरेन्स बिष्णोई आणि बिन्नी गुर्जर या गँगच्या एका कॉंट्रॅक्ट कीलर असलेल्या सदस्य कुख्यात भूपेंदरसिंग उर्फ भिंडा याला एलसीबी पथकाने दि. ३१ मे रोजी अटक केल्याने खळबळ उडाली होती. दरम्यान त्याची चौकशी केली असता त्याने भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा लॉरेन्स बिष्णोई आणि बिन्नी गुर्जर या गँगचे सदस्य असल्याची कबुली त्याने पोलिसांसमोर दिली. २०२३ मध्ये राजस्थानमधील बाडमेर येथील हरपालसिंग उर्फ रिंकू याचा खून करून फरार असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर यवतमाळ येथे परिवारासह लपून होतो, असेही त्याने स्पष्ट केले. त्याला ताब्यात घेऊन पंजाब व राजस्थान पोलिसांशी संपर्क साधला असता त्याच्यावर तब्बल १७ गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. एलसीबी पथकाने त्याच्या घराची झडती घेतली असता, घरात एक रिव्हॉल्व्हर आढळून आली होती. यापूर्वी झारखंड येथील नक्षली नेता तुलसी उर्फ दिलीप महतो हा यवतमाळ जिल्ह्यात लपून असल्याची गोपनीय माहिती होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, अनेक वेळा बनावट ओळखपत्रांच्या आधारे ही घरे भाड्याने घेतली जातात. काही ठिकाणी घर मालकांनाही याची कल्पना नसते, तर काहीजण हेतुपुरस्सर दुर्लक्ष करतात. घर भाड्याने देताना भाडेकरूंची पोलिस पडताळणी करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. ही पडताळणी न केल्यास, त्यातून जर गुन्हा घडला, तर घरमालकालाही गुन्ह्यात सामील समजले जाऊ शकते. शहरातील विविध भागांमध्ये काही भाड्याच्या घरामधून वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे धक्कादायक प्रकार अलीकडे समोर आले आहेत. पोलिस प्रशासनाने अशा काही ठिकाणी छापे टाकून संशयित महिलांना अटक केली असून, या कारवायांमुळे शहरात खळबळ उडाली आहे. अनेकदा घरमालक भाडे मिळवण्याच्या घाईत कोणतीही शहानिशा न करता घर भाड्याने देतात. याचा गैरफायदा घेत काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून घर कुंटनखान्यांमध्ये रूपांतरित केली जात आहे. यात महिलांना जबरदस्तीने अडकवण्याचे प्रकारही दिसून येत आहेत. उमरी येथील स्टोन क्रशर परिसरातून ताब्यात घेतले. दरम्यान झारखंड पोलिसांकडून याबाबत माहिती घेतली असता, तो २००५ पासून फरार असल्याची बाब तपासात समोर आली असून तोच नक्षली नेता तुलसी उर्फ दिलीप महतो असल्याचे निष्पन्न झाले होते. गेल्या सहा महिन्यात वेगवेगळ्या कारवाईने जिल्हा हादरून गेला असून नक्षलवादी, बिश्नोई गँगचा सदस्याला ताब्यात घेतल्याने खळबळ उडाली आहे.

## पिंजर रस्त्यावर खड्डे; अपघाताची शक्यता



**बार्शीटाकळी:** तालुक्यातील भेंडीमहाल ते पिंजर या गावाच्या रस्त्याची गेल्या काही दिवसांपासून दुरुस्ती न झाल्याने दुरवस्था झाली आहे. रस्त्यावरील खड्ड्यामुळे हा रस्ता जीवघेणा ठरत आहे. परिणामी या मार्गावरून ये-जाकरणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होत असून, अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी भेंडीमहाल परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. भेंडीमहाल येथून बार्शीटाकळी तालुक्याकडे जाण्यासाठी भेंडीसूत्र आणि पिंजरकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग आहे. या मार्गावरून वरील सर्व गावातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करावी लागते. मात्र रस्त्याची फार दुरवस्था झाली आहे. गेल्या अनेक काळापासून या मार्गाची दुरुस्ती न केल्यामुळे रस्त्यावर खड्डेच-खड्डेडले आहेत. या रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी या भेंडीमहाल परिसरातील ग्रामस्थांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे केली आहे. मात्र गावकऱ्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. रस्त्याची डागडुजी सुद्धा करण्यात आली नाही. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पिंजरवरून एखादा रुग्ण आणायचा असल्यास मोठी कसरत करावी लागते, त्यामुळे संबंधित विभागाने भेंडीमहाल गावातील नागरिकांची रस्त्याची समस्या लक्षात घेऊन हा रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## गार्डन क्लबतर्फे वृक्ष संवर्धन मोहिम



**अकोला :** अकोला गार्डन क्लबतर्फे वृक्ष संवर्धनाचे कार्य हाती घेण्यात आले आहे. या उपक्रमाची सुरुवातकोठारी कॉन्व्हेंटते किर्तीनगर, बालाजी नगरपर्यंत करण्यात आली. यापूर्वी निसर्गप्रेमींनी व विविध संस्थांनी वृक्षारोपणकार्यक्रम ।अंतर्गत लावलेल्या झाडांचे संवर्धन व संगोपन करण्याच्या उद्देशाने या झाडांच्यावाढलेल्या फांद्या व रस्त्यावर आलेल्या फांद्या तोडून झाडाच्या वाढीकरिता पोषक वातावरण बनवण्यात आले.

याशिवाय काही जुन्या झाडांना त्यावेळी लावलेले ट्री गार्ड्स सुद्धा कापून त्या झाडांना मोकळ करण्यात आलं. अकोला गार्डन क्लब टीमकडून वृक्षसंवर्धनाचाअनुरूप व अभिनव असा कार्यक्रम कसोशीने व योग्य प्रकारे राबविण्यात आला. हे कार्य अकोल्यातील सर्व निसर्गप्रेमी, पर्यावरणप्रेमिंनी आपाआपल्या परिसरामध्ये सुरु करावे असे आवाहन अकोला गार्डन क्लबतर्फे करण्यात येत आहे. उपक्रम राबवण्यासाठी मुख्य कार्यकारिणी सदस्य आलोक खंडेलवाल, कोकिळा पाटिल, हरिश मालपानी, संतोष अग्रवाल, संजय हेडा, संजय आगाशे, ब्रिजमोहन चितलांगे, शुभम शर्मा, शारदा बियाणी, महिला विंगच्या अध्यक्षा अनुराधा ढवळे, सदस्या माधुरी दाते, क्लबचे माजी अध्यक्ष अजय सेंगर, जयप्रकाश पाटिल व विजय ढवळेयांनी सक्रिय सहभाग घेतला. यांच्या नेतृत्वात राबवला उपक्रम : अकोला गार्डन क्लबचे अध्यक्ष संजय शर्मायांच्या नेतृत्वातटीमने या मोहिमेचा शुभारंभ केला. या वेळी उपाध्यक्ष, प्रकल्प संचालक शरद कोकाटे, निशिकांत बडगे, सचिव श्याम गोटफोडे, सहसचिव प्रा. वैशाली पाटील, कोषाध्यक्ष सुधीर रांदड, सहकोषाध्यक्ष सुनिल कवीश्वर, नीरज आवंडेकर, भूषण ताजणे आदींनी सक्रिय सहभाग घेतला.

# अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेची सभा

■ महासागर प्रतिनिधी,
खामगाव , दि. १८ :



शहरानजीकच्या घाटपुरी येथे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली शाखा बुलडाणा च्या जिल्हा सभेचे आयोजन १६ जून रोजी करण्यात आले होते.

सभेचे अध्यक्षस्थानी सुखदेराव डाबेराव होते. तर प्रमुख अतिथी म्हणून महेंद्रसिंग राठोड, सचिन पालकर, नंदिनी टारपे, ज्ञानेश्वर राठोड, संगीता बारेला, संगीता धांद्रे, गजानन सोळंके, ग्यानसिंग बामणे यांची उपस्थिती होती.

सभेमध्ये जिल्हा अध्यक्ष सोपान सोळंके यांनी समाजावर होणारे अन्याय अत्याचार, आदिवासी विकास विभागाकडून मिळणाऱ्या योजना या प्रत्येक आदिवासी पर्यंत पोहोचल्या पाहिजे, समाजाला मिळणाऱ्या सवलती, योजना, अधिकार याबाबत जागृती मोहीम आखावी याबाबत मार्गदर्शन केले. सभेमध्ये गोपाल चव्हाण, अमोल राठोड, नीलेश पवार, मंगलसिंग राठोड, महेंद्र चव्हाण, भीमसिंग पवार, नीलेश पवार, सागर चव्हाण, प्रताप राठोड, विनोद डाबेराव, विनोद सोळंके, विजय चव्हाण, वासुदेव बोरकर, पहाडशिंग डाबेराव, लक्ष्मण सोळंके आदी समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोपान सोळंके यांनी, संचालन मंगलसिंग राठोड यांनी तर आभार प्रदर्शन महेंद्रसिंग चव्हाण यांनी केले.

## उमरी पठार वृद्धाश्रमात पितृ दिवस उत्साहात



**दिग्रस :** भारतीय संस्कृतीत वृद्धाश्रम हा शब्दच नाही. तरी सुध्दा संपूर्ण जिल्हाभर वृद्धाश्रमाचे जाळे विणल्या जात आहे. खरतर आम्ही निराधार ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम सुरु केले. निराधार वृद्धांची सेवा, सुश्रुषा व्हावी व दारिद्र्यात आलेला मृत्यू समाधानी व्हावा या विचाराने प्रेरित होऊन सेवा सुरु आहे. परंतु, ज्यांना मूलबाळ आहे ते सुध्दा वृद्धाश्रमात येत आहे. संस्कृती या विषयी प्रबोधन होने गरजेचे आहे. पुरोगामी महाराष्ट्रात पित्याची आबाळ होत आहे, असे अंतर्मुख करणारे विचार संस्थेचे संस्थापक शेषराव डोंगरे यांनी व्यक्त केले. उमरी पठार येथील संत श्री डोला महाराज वृद्धाश्रमात पितृ दिनाचा कार्यक्रम विश्वस्त विजया दीडमुठे यांच्या अध्यक्षतेखाली व दीपक दीडमुठे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. पित्यासमान ज्येष्ठ नागरिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक शेषराव डोंगरे यांनी आपले विचार व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, ज्याला अंगाखांद्यावर घेऊन जीवापाड जपले, त्यानेच मोठेपणी घराबाहेर काढले. अशा मुलांची संख्या प्रचंड वाढत आहे. शरीराने पंगू झालेल्या आईवडिलास वाऱ्यावर सोडून देणारी मुले आहेत. दुर्लक्षित ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक निर्वाह कल्याण अधिनियम २००७ कायदा शासनाने अस्तित्वात आणला. खरंतर या अधिनियमांची जागृती झाली नाही. अन्याय होऊनही ज्येष्ठनागरिकांनी दाद कुठे मागावी हे कळत नसल्याने अनेक वृद्धांची गल्लोगल्ली आबाळ होत आहे. बापाचे कष्ट जाणा, त्यांची सेवा करा, जिवंतपणी त्यांना दुख देऊ नका, वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ देऊ नका किंवा आपण वृद्धाश्रमात नेऊन ठेऊ नका. त्यांना शेवटच्या श्वासापर्यंत आनंदाने ठेवा. वडिलांची सेवा करणाऱ्याला काही कमी पडत नाही हे मी माझ्या ३५ वर्षाच्या सेवेच्या अनुभवातून सांगतो असे उद्गार शेषराव डोंगरे यांनी शेवटी काढले. या कार्यक्रमाला वृद्धाश्रमातील १६० ज्येष्ठनागरिक, वृद्धाश्रमाचे व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश डोंगरे व केअर टेकर राजू जयस्वाल उपस्थित होते. मिष्टान्नाच्या भोजनांनतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# यकृत विकारांवर संवाद सत्र ही विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पर्वणीच उपचारपद्धती, क्लिनिकल दृष्टांत, केस स्टडीजवर माहिती

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १८ :



नीमा आयुर्वेद फोरम-पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स, आयुर्वेद अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'यकृत विकार तथा तद्वीद संभाषा' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी खास प्रश्नोत्तर आधारित व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन केले होते. हे चर्चा सत्र विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारे होते.

तसेच निमाद्वारे निदान, उपचारपद्धती, क्लिनिकल दृष्टांत, केसस्टडीज व प्रत्यक्ष अनुभव यावर आधारित माहिती दिली. ती विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरली.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी स्तवन व पूजनाने करण्यात आली. या वेळी प्रमुख वक्ते वैद्य चरण सोनारे यांचा नीमा आयुर्वेद फोरम अमरावती तर्फे मोमेंटो व 'एक झाड, एक वैद्य'नुसार गुळवेलाचे रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. तसेच पोटे पाटील कॉलेज तर्फे संत गजानन महाराजांची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर वैद्य उन्मेश डालके यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषण डॉ. दिनेश गवळी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पारूल नांदगावकर व त्यांच्या टीमने केले, तर आभार डॉ. श्यामसुंदर भुतडा यांनी मानले.

या प्रसंगी नीमा आयुर्वेद फोरम, महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. अमोल ठवळी, डॉ. सागर सांबे, डॉ. विजय खंडारे, डॉ. आनंद उल्हे तसेच पोटे कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स, आयुर्वेद अमरावती येथील वैद्य व स्टाफ उपस्थित होता. या सत्रात वैद्य चरण सोनारे यांनी यकृत विकारांच्या आयुर्वेदिक आणि आधुनिक दृष्टिकोनावर मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांना यकृत विकारांचे निदान, उपचारपद्धती, क्लिनिकल दृष्टांत, केस स्टडीज व प्रत्यक्ष अनुभव यावर आधारित माहिती दिली गेली.

विद्यार्थ्यांना तज्ञ वैद्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यांच्या शंका निरसन करताना वैद्य सोनारे यांनी आजच्या काळातील यकृत विकारांचे महत्त्व, जीवनशैलीचे घटक तसेच पंचकर्म आणि आयुर्वेदिक औषधोपचारांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे संवादात्मक पद्धती विद्यार्थ्यांनी थेट प्रश्न विचारून अनुभव समजून घेतला. हा उपक्रम निःशुल्क होता. अमरावती जिल्ह्यातील आयुर्वेद महाविद्यालयातील २७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी वैद्य उन्मेश डालके, वैद्य आकाश चांगोले व वैद्य परिसे उंडे यांनी मेहनत घेतली. पी. आर. पोटे कॉलेज येथील वैद्य व स्टाफचे विशेष सहकार्य लाभले.

प्रामुख्याने वैद्य श्यामसुंदर भुतडा, वैद्य पारूल नांदगावकर यांचे मोलाचे योगदान लाभले. 'ज्ञान, अनुभव आणि संवाद यांचे अनोखे मिलन -एक शैक्षणिक पर्वणी' ठरलेले हे सत्र विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरले.

## जुलै पासून सुरू होणा-–यइग्नो अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १८ :

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जुलै, २०२५ पासून सुरू होणा-या सत्राकरिता एम.ए. ( इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, ग्रामीण विकास, दूरशिक्षण, तत्वज्ञान), एम.कॉम. एम.बी.ए., (फायनान्स, हुमन रिसोर्स, मार्केटिंग, ऑपरेशन, सर्वीस मॅनेजमेंट प्रवेश परीक्षेशिवाय) बी.ए., बी.कॉम.सामान्य, बी.ए.टुरिझम, बी.ए.ऑनर्स (अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र, इंग्रजी, हिंदी), बी.कॉम. (लेखा व वित्त), पदव्युत्तर पदविका (ग्रामीण विकास, इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन, अॅग्री बिझिनेस, हुमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्सीयल मॅनेजमेंट, ऑपरेशन्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंग मॅनेजमेंट), डिप्लोमा (पर्यटन, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन), सर्टिफिकेट (आपत्ती व्यवस्थापन, फुड अॅन्ड न्युट्रीशन, हुमन राईट्स, गायडन्स, न्युट्रीशन अॅन्ड चाईल्ड केअर, कंझुमर प्रोटेक्शन, फक्शनल इंग्रजी, ग्रामीण विकास, टिचींग ऑफ इंलीश, टुरिझम, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन) इत्यादी अभ्यासक्रमांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

इग्नोच्या www.ignou.ac.in वेबसाईटवरून तसेच https://ignouadmission.samarth.edu.in/ लिंकवरून अर्ज सादर करण्याची अंतिम तिथी दिनांक १५ जुलै, २०२५ असून प्रवेश शुल्क इंटरनेट बँकींग/डेबीट/क्रेडीट/एटीएम कार्डद्वारे भरता येईल. सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे. अनुसुचित जाती/जमाती वर्गवारीतील विद्यार्थ्यांना बी.ए.,बी.कॉम.बी.एस्सी. पदवी करिता नि:शुल्क प्रवेश देण्यात येत आहेत. अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नोचे अभ्यासकेंद्र, मुलींचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळिवले आहे.

## प्रमाणपत्रांचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद , दि. १८ :

माळ पठारावरील रोहडा येथे महसूल विषयक तक्रारीचे निवारण, शेतजमिनीचे उतारे, शालेय प्रमाणपत्रे, वारस नोंदी, नकाशे व इतर विविध सेवा एकच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे अयोजन नुकतेच पार पडले. यामध्ये विद्यार्थी व नागरिकांना उत्पन्न, अधिवास व जात प्रमाणपत्र असे ४२ प्रमाणपत्रांचे वाटप उपविभागीय अधिकारी डॉ. आशिष बिजवल, तहसीलदार महादेव जोरवर यांच्या हस्ते करण्यात आले. वारसनोंदी घेतलेल्या अद्ययावत सातबारा, रोशन कार्ड, विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

आधार कार्ड असे एकूण काही अर्ज तातडीने निकाली काढण्याची प्रक्रिया करण्यात आली. समाधान शिबिरामुळे ग्रामस्थांचा वेळ व पैसा वाचवण्यास मदत होत असून नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन बिजवल यांनी केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHEIKH FAZILA FATIMA.** NOW MY NEW NAME IS **FAZILA FATIMA.**
ADD : H.N.651A/46, NEAR FINGER FACTORY, MAHESH NAGAR SHANTI NAGAR, NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **DINESH ASHOKKUMAR CHADDA.** NOW MY NEW NAME IS **DINESH ASHOKKUMAR CHHODA.**
ADD : PLOT NO. 97 RAM NAGAR GAROBA MAIDAN NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ILYAS.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ILIYAS ABDUL JABBAR** AND SURNAME IS **KHAN.**
ADD : 1128/J/645 2ND LINE OF KABRASTAN HASANBAG NAGPUR.
MY OLD PASSPORT NO IS **J1969685**

MY OLD NAME WAS **ZAHEDA AMEEN SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ZAHEDA FATEMA AMEEN SHEIKH.**
ADD : VIDYANAGAR WARD, BALLARPUR CHANDRAPUR.442701

MY OLD NAME WAS **MOHAMMAD NAVED MOHAMMAD SAYYED SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD NAVED SHEIKH.**
ADD : HOUSE NO.1207 / A / 8 / 201, FIVE STAR ROYAL APARMENT, NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **DINESH ASHOKKUMAR CHADDA.** NOW MY NEW NAME IS **DINESH ASHOKKUMAR CHHODA.**
ADD : PLOT NO 97, NEAR HANUMAN MANDIR,RAM NAGAR, BAGADGANJ NAGPUR, 440008
PASSPORT NO- **M4804780**

MY OLD NAME WAS **ALIM SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **ALIM SAKUR SHEIKH.**
ADD : HOUSE NO. 1526/E/21 HILL TOP NEAR MANOHAR KIRANA STORE JAI NAGAR PANDHARABODI RAM NAGAR NAGPUR MAHARASHTRA 440010

MY OLD NAME WAS **SAKINA SHAM.** NOW MY NEW NAME IS **SAKINA MURTAZA AKOLAWALA.**
ADD : PLOT NO.:-250,SHIRIN VILLA, NEAR NAYAPURA HIGH SCHOOL, BEHIND OMER SOCIETY, SHANTI NAGAR,NAGPUR-440002, MAHARASHTRA, INDIA

MY PASSPORT NO.**L7434140** IS MY INCORRECT NAME WAS **AFREEN NAAZ SHEIKH.** NOW NEW CORRECT NAME IS **AAFREEN SHAMSUDDIN SAYYED.**
ADD:GOVINDPUR, GONDIYA MS 441601 MS

# श्री संत वासुदेव महाराजांचा पालखी सोहळा वाशीम जिल्ह्यामध्ये दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
अकोट, दि. १८ :

पालखी सोहळ्यात २५० वारकरी



अकोटें सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज उपाख्य श्रीज्ञानेश्वरदास यांच्या पालखी सोहळ्याचे गत आठवड्यात श्री क्षेत्र श्रद्धासागर येथून प्रस्थान झाले.

भाविकांनी या पालखी सोहळ्याला निरोप दिला. हा पालखी सोहळा दररोज २० ते २५ किलोमीटर पायी प्रवास करत आहे. हा पालखी सोहळा अकोला जिल्ह्यातून वाशीम जिल्ह्यामध्ये दाखल झाला.

वाशीम जिल्ह्यातील भाविकांनी या पालखी सोहळ्याचे स्वागत केले. २५० वारकरी पालखी सोहळ्यात आहेत. या भाविकांची निवास व भोजन व्यवस्था डॉ. श्रीराम घुगे मेडशी, आनंद बिर्ला मालेगाव, नामदेवराव कडू सावरगाव बर्डे, दिनकरराव वाटाणे वाशीम, ज्ञानबा पायघन आजनखेडा, पुरुषोत्तमसेठ बाहेती कन्हेरगाव नाका यांच्याकडे आहे. पालखीसोबत संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष वासुदेवराव महाराज महल्ले, उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, सहसचिव अविनाश गावंडे, निमंत्रित सदस्य अनिल कोरपे, दिंडी सोहळा व्यवस्थापक अंबादास महाराज मानकर यांच्या मार्गदर्शनात पालखी सोहळा मार्गक्रमण करत आहेत.

## सर्व जातीपंथाला सोबत घेऊन केलेला विकास सर्वांगिण असतो : विजयराज शिंदे

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. १८ :



मेहकर तालुक्यातील बेलगाव येथील सरपंच व त्यांच्या ग्राम सदस्यांनी गावातील जाती-पंथाच्या लोकांना एकत्रित करून जो विकास केला तो सर्वांगीण विकास आहे, असे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी केला .

डोणगाव मंडळातील बेलगाव येथे भारत संकल्प सभेचे आयोजन १५ जून रोजी करण्यात आले होते. यावेळी विजयराज शिंदे बोलत होते. विचार पिठावर संकल्प से सिध्दी तक या अभियानाचे जिल्हा संयोजक चंद्रकांत बर्दे, सरपंच वानखेडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव वानखेडे, डोणगाव मंडल अध्यक्ष नरेंद्र अर्जुनराव वानखेडे, भाजपचे वरिष्ठ नेते प्रल्हाद अण्णा लश्कर, राजेश निकम, सिताराम ठोकळ, शिवशंकर गायकवाड, धनंजय जाधव, रामराव सपकाळ यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी शिंदे म्हणाले की, सबका सथा सबका विकास' हे ब्रीदवाक्य वापरून बेलगावचा विकास झाला. हे पंतप्रधान नरेंद्र मोदींना अपेक्षित आहे. खऱ्या अर्थाने मोदींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचे काम येथील सरपंच करत आहेत. यावेळी उपस्थितांना प्रास्ताविक मध्ये अर्जुनराव वानखेडे म्हणाले की, गावाचा विकास साधत असताना अनेक अडचणी निर्माण झाल्या मात्र या सर्व अडचणीवर मात करत आपण गावातील सर्व समाज जोडण्याचा प्रयत्न केला. सबका साथ सबका विकास या प्रमाणे बेलगाव येथे विकास सुरू आहे.

बेलगाव येथील विकास कामांकरता एक कोटीचा निधी भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांनी बेलगाव गावाकरिता एक कोटीचा विकास निधी दिला. त्यातुन मराठा समाज मंगल कार्यालय सभामंडप, मराठा समाज स्मशान भूमि, मराठा समाज मंगल कार्यालय कंपाऊंड, मराठा समाज मंगल कार्यालय येथे पेव्हर ब्लॉक, दर्गा येथे हायमास्ट लाईट आदी कामे होणार आहेत.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३




# ज्येष्ठाचं श्रेष्ठत्व

भक्ती विशेष

स्वाती पेशवे

हिंदू कालगणनेनुसार वर्षातील तिसरा महिना म्हणजे ज्येष्ठ. या काळात वैशाखवणव्याची धग कमी झालेली असली तरी पुरती शमलेली नसते. त्यामुळे ज्येष्ठाच्या प्रथम पर्वात सूर्याची प्रखरता अनुभवायला मिळते. सूर्याच्या या ज्येष्ठतेवरुनच या महिन्याला ङ्गज्येष्ठङ्घ या नावाने ओळखलं जातं. उष्णतेबरोबरच या मसाची नाळ जळाशी जोडलेली आहे. त्यामुळेच या काळात सूर्य आणि वरुणदेवाची उपासना केली जाते. ऋतूबदलाचा काळ असल्यामुळे या मासामध्ये वातावरणातील बदल प्रकर्षाने अनुभवायला मिळतो. प्रथम चरणात वातावरणाबरोबरच शरीरातील पाण्याचा स्तरही कमी होत असतो. त्यामुळे शरीरातील पाण्यासह जमिनीतील घटत्या जलस्तराची नोंद घेणं, पर्याप्त प्रमाण टिकवण्याच्या हेतूने काळजी घेणं आणि कार्यरत होणं गरजेचं ठरतं. मात्र पाऊसकाळ सुरू होताच काळजी मिटते आणि जलधारा झेलण्यात सृष्टीबरोबरच वृत्तीही तल्लीन होऊन जाते. म्हणूनच हा काळ एक वेगळीच सुखानुभूती देतो.

नव्या नव्हाळीचं निश्चितच एक महत्त्व असतं, वेगळं औत्सुक्य असतं. या दृष्टीने ज्येष्ठ पावसाची नव्हाळी अनुभवण्याची संधी देतो. घामाने चिंब झालेल्या एखाद्या दुपारी अचानक वातावरणात बदल होत असल्याचा अनुभव, त्यानंतर उधळणारा मृद्गंध, एक-दोन सरींनी न्हाऊमाखू घालताच गोमटेपणाने प्रफुल्लित आणि रसभरीत होणाऱ्या लता-वल्लरी, दाटून उरणारा कुंदपणा, रागाचा गंभीर विस्तार संपल्यानंतर एखाद्या गायकाने अथवा वादकाने द्रुतगतीने आविष्कार सादर करावा त्यासम वेग घेणारं धारानृत्य असे निसर्गाचे सगळे विभ्रम ज्येष्ठातच अनुभवायला मिळतात. म्हणूनच हा काळ एक वेगळी अनुभूती देऊन जातो.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे या महिन्यात जल आणि सूर्याची उपासना केल्यास चांगले परिणाम मिळतात. त्यामुळेच यासंबंधीची व्रतवैकल्यं अंगिकारली जातात.

**ज्येष्ठ महिन्यात जल आणि सूर्याची उपासना केल्यास चांगले परिणाम मिळतात असं सांगितलं जातं. त्यामुळेच या महिन्यात यासंबंधीची व्रतवैकल्यं अंगिकारली जातात. सकाळ-सायंकाळी सूर्यमंत्राचा जप केला जातो. विशेषत: रविवारी उपवास केला जातो. या महिन्यातील प्रत्येक मंगळवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानाला तुळशीपत्रांचा हार अर्पण केला जातो. त्यानंतर नैवेद्य दाखवला जातो. ज्येष्ठ असा गजबजलेला असतो.**



सकाळ-सायंकाळी सूर्यमंत्राचा जप केला जातो. विशेषत: रविवारी उपवास केला जातो. या महिन्यातील प्रत्येक मंगळवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानाला तुळशीपत्रांचा हार अर्पण केला जातो. त्यानंतर नैवेद्य दाखवला जातो. या पुजेमुळे कुंडलीतील मंगळासंबंधीच्या समस्या दूर होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ज्येष्ठ महिन्यात वेगवेगळ्या आघाड्यांवर लढा द्यावा लागत आहे. ज्येष्ठ महिना अशा प्रत्येक महिलेला मानवंदना देतो.

ज्येष्ठ महिन्याला ऐतिहासिक महत्त्वही आहे. इतिहासातल्या शौर्याचं मूर्तीमंत प्रतीक असणाऱ्या महाराणा प्रताप यांची जयंती ज्येष्ठ महिन्यातच येते. सिंहाचा जबडा उघडून त्याचे दात मोजणाऱ्या निधड्या छातीच्या संभाजीराजांची जयंतीसुद्धा तिथीप्रमाणे ज्येष्ठ

स्त्रियांचा आवडता वटपौर्णिमा हा सण येतो. साक्षात यमराजाबरोबर बुद्धिकौशल्याने संवाद साधून पातिव्रत्याच्या बळावर पतीचे प्राण परत आणणारी सावित्री ही आजही प्रत्येक स्त्रीचा आदर्श आहे. आज प्रत्येक महिला वडाची पूजा करत नसली तरी तिच्या मनातलं पतीविषयीचं प्रेम आणि त्याला साथ देण्याची वृत्ती जागोजागी दिसते. आजही प्रत्येक स्त्रीच्या रूपात त्याच पुराणकाळातील सावित्रीचा अंश वावरत आहे. फक्त तिचे संदर्भ बदलले आहेत एवढंच. अनेक ठिकाणी पतीच्या हयातीनंतर त्याची अर्धवट राहिलेली जबाबदारी पत्नी समर्थपणे पेलते आणि कडू-गोड आठवणींवर उर्वरित आयुष्य काढते. हा देखील अलीकडच्या काळातील सावित्रींच्या पातिव्रत्याचाच आदर्श म्हणायला हवा. कालमानानुसार भावना व्यक्त करण्याच्या पद्धती बदलत असतात. पण त्यामागील पतीप्रेम, निष्ठेची भावना ही पुराणकाळातल्या सावित्रीच्या मनातील भावनेसारखीच असते.

सध्याच्या सावित्री केवळ घराच्या पातळीवर लढतात असं नव्हे तर त्यांना

महिन्यातच आहे. विशेष म्हणजे त्याच्याच दुसऱ्याच दिवशी इतिहास घडवणारे, गुणसंपन्नतेचे शिरोमणी छत्रपती शिवाजीराजे यांचा शिवराज्याभिषेक दिन येतो. याच तिथीला किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेकाचा प्रेक्षणीय सोहळा पार पडला आणि त्यानंतर सुरू झाली ती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची मालिका आणि एका आदर्श राजाची यशस्वी कारकिर्द. आजही या दिवसाचा आठव अंगावर रोमांच उमटवून जातो. या निमित्ताने बहारदार कार्यक्रम पार पडतात.


शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊबाई यांचा स्मृतीदिनसुद्धा याच महिन्यात येतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांसारखा सर्वगुणसंपन्न पराक्रमी राजा घडवणारी एक कुशल, परिपूर्ण माता म्हणून उभ्या महाराष्ट्राला जिजाऊंची आठवण आहे. त्यांच्या नावाने आदर्श मातांना पुरस्कारही दिले जातात. शिवाजीराजे भोसले यांच्या घराण्यातल्या या तीन थोर व्यक्तींची आणि त्यांच्या गुणांची आठवण या मासाच्या निमित्ताने येते. आदर्श जीवनाला परमेश्वर मानणारे, सतत सत्याची पूजा करणारे, प्रतिभावंत साहित्यिक आणि मुलांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सानेगुरूजी यांचा स्मृतीदिन ज्येष्ठ महिन्यातच येतो. या सत्त्वशील, आदर्शवादी लेखकाने आपल्या लेखनातून समाजाला सतत उत्तम आणि पवित्र विचारांचे संदेश दिले. हे संस्कृतीरक्षक लेखक **श्यामची आई** सारख्या पुस्तकातून अजरामर आहेत. या निमित्ताने त्यांचीही आठवण येते.

सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणारा दृष्टिदान दिन ज्येष्ठातच येतो. या दिवसामुळे नेत्रदानाच्या चळवळीला नवी गती मिळते. या मासातली आध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे क्षेत्र देहू येथून संत तुकारामांच्या पालखीचं प्रस्थान होतं. त्याच्याच दुसऱ्या दिवशी क्षेत्र आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं प्रस्थान होतं. विठूमाऊलीचे अगणित भक्त या दिवसांची आतुरतेने वाट पाहत असतात. ते भक्तीभावने पालखी सोहळ्यात सामील होतात. अशा तऱ्हेने पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व लाभलेला ज्येष्ठ अनेक दृष्टींनी परिपूर्ण असतो. म्हणूनच तो ज्येष्ठ असतो.

## अमृतवाणी

रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा।
सांडी तू अवगुणु रे भ्रमरा।।
चरणकमळदळू रे भ्रमरा।
भोगी तूं निश्चळु रे भ्रमरा।।
सुमनसुगंधु रे भ्रमरा।
परिमळु विद्गदु रे भ्रमरा।।
सौभाग्य सुंदरू रे भ्रमरा।
बाप रखुमादेविवरू रे भ्रमरा

-संत ज्ञानेश्वर



# कालीमातेला नूडल्सचा नैवेद्य


अजबगजब

भारत हा श्रद्धाळूंचा, भाविकांचा देश आहे. पुराणकथा, आख्यायिका, दंतकथा आदींचा मोठा पगडा असणारा हा समाज ईश्वराचं अधिष्ठान मानणारा आहे. कुलदैवतांप्रमाणे प्रत्येकाची आपापली श्रद्धास्थानं असतात आणि इष्ट देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी जो तो आपापल्या पद्धतीने करुणा भाकत असतो. देवाची आराधना करत असतो. असं असल्यामुळेच काही देवळांमध्ये अजबगजब प्रथा-परंपरा पहायला मिळतात. कोलकातामध्ये ङ्गचायनीज काली मंदिरङ्घ हे असंच एक स्थान आहे.

या पवित्र स्थळी कालीमातेची पूजा होते. पूजा संपन्न झाल्यानंतर देवाला नैवेद्य दाखवण्याची पद्धत आपल्याकडे आहे. नैवेद्य आणि आरती झाल्याशिवाय पूजा पूर्ण होत नाही. बरेचदा हा नैवेद्य पक्वान्नांचा असतो. स्नानादी आन्हिके आटोपून शुद्ध तना-मनाने रांधलेले पदार्थ देवापुढे ठेवतात, ते ग्रहण करण्याचा आग्रह केला जातो आणि त्याने ते ग्रहण केलं आहे असं समजून तो नैवेद्य प्रसाद स्वरुपात उपस्थितांमध्ये वाटला जातो. कालीमातेच्या या देवळातही नैवेद्य दाखवला जातो. मात्र तो गोडाधोडाचा नसून नूडल्स, चॉप्सी, शेजवान राईस अथवा भाज्या घालून तयार होणाऱ्या चायनीज पदार्थांचा असतो.



आश्चर्य वाटलं ना? पण हे अगदी खरं आहे. कोलकात्याच्या तंगरा नामक भागात चीनी लोकांची मोठी वस्ती आहे. बऱ्याच वर्षांपासून ते इथे राहतात. भारतीयांप्रमाणे तेदेखील कालीची मनोभावे पूजा करतात आणि त्यानंतर आपल्या खाद्यसंस्कृतीतील पदार्थ देवीला अर्पण करतात. त्यामुळेच कालीमातेचं हे मंदिर ङ्गचायनीज काली मंदिरङ्घ म्हणूनही ओळखलं जातं.



# काय देते विद्या?

समर्थ उवाच

विद्या व्यक्तीला उन्नत अवस्थेकडे नेते, मात्र विद्येचा सदुपयोग व्हायला हवा. सद्विद्याप्राप्त माणसाला परमार्थाची गोडी कळते. हे सविस्तर सांगताना श्रीसमर्थ म्हणतात,

**सत्यवचनी शुभवचनी। कोमळवचनी येकवचनी।**
**निश्चयवचनी सौख्यवचनी। सर्वकाळ।।**
**द्रव्यसुची दारासुची। न्यायसुची आंतरसुची।**
**प्रवृत्तिसुची निवृत्तीसुची। सर्वसुची नि:संगपणे।।**
**मित्रपणे परहितकारी। वाग्माधुर्ये परशोकहारी।**
**सामर्थ्यपणें वेत्रधारी। पुरुषार्थे जगमित्र।।**

सद्विद्या माणसाला शहाणं करते. अशा माणसाला श्रुती, स्मृती, उपनिषदे आदींचं ज्ञान असतंच त्याचबरोबर व्यवहारात सावधपणे आणि प्रसंग ओळखून कसं वागावं हेही तो जाणतो. कोणाला मानसन्मान देऊन आदर दाखवायचा आणि एखाद्या लबाड माणसाची लबाडी हुषारीने कशी ओळखायची हे त्याला बरोबर समजतं. सत्य आणि नेमकं बोलणारा, बोलल्याप्रमाणे कृती करणारा, चपळ, कौशल्यवान असा पुरुष आपली साधनवृत्ती आणि ज्ञानार्जनाची प्रवृत्ती कधीच सोडत नाही. आगम आणि निगम म्हणजेच शरीर आणि आत्मा यांच्या परस्परसंबंधाचं, जीवाशिवाच्या नात्याचं त्याला सूक्ष्म ज्ञान असतं. तो भक्तीसुद्धा अनेक मार्गांनी करत असतो. कधी तो पुरश्चरणं करतो तर कधी तीर्थयात्रा, कधी जप तर कधी शरीरकष्टाचं तप... मात्र साधनेचा मार्ग निश्चित असल्याने तो सदैव तृप्त आणि समाधानी असा योगीस्वरूप बनतो. मनातूनच विरागी झाल्यामुळे त्याचं वागणं-बोलणं सौम्य, शुद्ध, सात्विक आणि निष्कपट असतं. तो निर्व्यसनी असतो आणि या सद्गुणांमुळे लाभणारी मन:शांती त्याच्या मुखावरही झळकत असते. त्यामुळे त्याच्या दर्शनानेही सर्वांना निरातिशय प्रसन्नता लाभते.

असा वितरागी असूनही कला आणि संगीतात ज्ञान आणि रस घेणारा असतो. तो त्यांचं रसग्रहण करून स्वत: आनंदित होतो आणि इतरांनाही आनंद देऊन जातो. सौजन्यपूर्ण आणि निरपेक्ष वागल्यामुळे तो सर्वांनाच हवाहवासा वाटतो आणि जणु हा जिवलग मित्र आहे असंच सर्वांनाच वाटतं. तो नेहमी सत्य, शुभ, कोमलपणे बोलणारा आणि दिलेलं वचन न मोडणारा असतो. अशी व्यक्ती जनतेपुढे आदर्श वस्तुपाठ देते असं समर्थ म्हणतात.

# साधावा परमार्थ



आत्मबोध

द्वैतामध्ये दुःख आहे तर अद्वैतामध्ये सुख आणि आनंद आहे. आपण अद्वैतामध्ये राहिलो तर आनंद मिळतो. मुळात हे जग एकच आहे. प्रपंच दहा दिशांना विस्तारतो पण परमार्थाची मात्र एकच दिशा असते. आपण तिच्याकडे लक्ष ठेवावं. काही न करणं (अर्थात मनाने) हा खरा परमार्थ होय. परमार्थामध्ये ङ्कमीङ्ख ला स्थान नाही. प्रपंच हा द्वैत आहे. त्याचं मोठं अवडंबर असणारच. जगण्याचा अंतिम हेतू कळत नाही तोपर्यंत प्रपंच करणं हेच ध्येय असल्याचं आपण समजतो. वास्तविक, मनुष्यप्राणी हा देह आणि मन या दोन्हीही मिळून बनला आहे. म्हणूनच त्याने ऐहिक आणि पारलौकिक अशा दोन्ही गोष्टी साधल्या पाहिजेत. परमार्थ साधणं हाच आपल्या जन्माचा खरा हेतू आहे. व्यवहारात द्वैताशिवाय आनंद नाही. म्हणून परमार्थात, मानसपूजेत सर्वप्रथम ङ्कमीङ्ख आणि ङ्कपरमात्माङ्ख अशा द्वैताने सुरुवात करावी लागते. परमार्थ हाडीमासी खिळत नाही तोपर्यंत आपल्याला वाचनाची गरज असते. त्यामुळे साधनेला नवं बळ मिळतं. मन भगवंताच्या ठायी कसं गुंतवायचं हे समजतं. त्यासाठी आपण काय करावं यासंबंधी मार्गदर्शन मिळतं.

एक बाप आपल्या मुलाला पोहायला शिकवत होता. प्रथम त्याने मुलाला घोट्याइतक्या पाण्यात आणलं, नंतर ढोपराइतक्या पाण्यात आणलं, नंतर आणखी पुढे आणलं आणि एक दिवस मुलाला पाण्यात खेचून घेतलं. या हुशार बापाप्रमाणेच गुरू आपल्याला परमार्थ शिकवत असतात. मात्र त्यासाठी पाण्यात उतरालायला तर हवं! देहाने प्रपंच केला पण तो फळाला येत नाही. म्हणूनच संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगितला आहे. पण आपला शहाणपणा, अभिमान, अहंकार आड येतो त्याला काय करावं? हा अभिमान दुसरा कुणी उत्पन्न करतो असं थोडंच आहे? आपल्या ध्यानातही येणार नाही इतकी वासनेची सूक्ष्म बीजं खोलवर कुठे तरी दडलेली असतात. त्यामुळे लौकिकाची अभिलाषा सुटत नाही. हे पाश तोडण्यासाठी संतांनी एक मार्ग सुचवला आहे आणि तो म्हणजे नामस्मरणात राहून विषयाची ऊर्मी उठू न देणं. प्रपंचातली विघ्नं सूचनावजा असतात. ती आपल्याला जागं करतात. आपण भगवंताला ओळखण्यासाठी जन्माला आलो आहोत याचा विसर पडू नये या हेतूने विघ्नांची योजना असते. भगवंताच्या जवळ नेण्यासाठीच विघ्ने येत असतात. तेव्हा त्यांना न घाबरता भगवंताच्या नामात स्वतःला विसरून जाणं हा परमार्थाचा सोपा मार्ग आहे.

# दूर करा चिंता

जीवनमंत्र

**चिंता इतनी कीजिए की**
**काम हो जाए**
**पर**
**इतनी नहीं की**
**जिंदगी तमाम हो जाए**

किती योग्य सल्ला दिला आहे या कवीने... आपल्याला कुठल्या ना कुठल्या गोष्टीची काळजी लागून राहिलेली असते. कुठलीशी चिंता आतल्या आत पोखरत असते. चिंतेचं स्वरुप हलकं आहे की गंभीर, त्यामुळे चिंतीत व्हावं की सोडून द्यावं, त्याने जीवनावर नकारात्मक प्रभाव पडेल की फारसा फरक पडणार नाही हे आणि यासारखे मुद्दे व्यक्तीसापेक्ष असतात. त्यांना कुठलेही ठोकताळे लावता येत नाहीत की कोणत्या नियमांच्या निकषात बसवता येत नाही. त्यामुळे एखाद्याला करो या मरो चा प्रश्नदेखील दुर्लक्ष करण्याजोगा वाटतो तर एखाद्याला सगळी सुखं असतानाही छोटी चिंताही चितेसारखी जाळत राहते. म्हणूनच कवीने सांगितल्याप्रमाणे सजग रहावं आणि हाती घेतलेलं काम पूर्ण करावं. कामासंबंधीचा विचार आणि त्या अनुषंगाने येणारी चिंता निश्चितच करावी कारण ही चिंता कार्यप्रवण ठेवते. मात्र जगण्यातील रस संपवणारी चिंता दूर करणंच श्रेयस्कर...



# परब्रह्माचं 'अक्षर'स्वरुप

बोल ज्ञानियाचे

खालील ओवीतून ज्ञानेश्वरांनी परब्रह्माचं स्वरुप स्पष्ट करुन सांगितलं आहे. परब्रह्माचं स्वरूप अजोड, अतुलनीय असल्याचं माऊली सांगतात.

**जे ऐसेही परि विरुळे।**
**इथे विज्ञानाचिये खोळे।**
**हालवलेही न गळे।**
**ते परब्रह्म।।**

जीवनवस्त्र अत्यंत तलम असतं. ते अनेक धाग्यांनी विणलेलं असतं. पण हलवलं असताही या वस्त्रांमधून गळत नाही ते परब्रह्म होय, असं ज्ञानेश्वरमाऊली सांगतात. परबह्म हे सूक्ष्मातील सूक्ष्म आणि विशालातील विशाल आहे. अगदी फुटक्या खापरातही परबह्म आहे पण ते पाण्याप्रमाणे त्यातून गळून जात नाही. परब्रह्म हे अक्षर आहे. अक्षर म्हणजे क्षर नाही ते. मन शीतल होतं, कोणतीही शंका किंवा द्वंद्व उरत नाही तेव्हा परमज्ञानाची प्राप्ती होते. परमज्ञान हा परबह्म जाणून घेण्याचा मार्ग आहे. एकदा परमज्ञान प्राप्त झालं की परब्रह्माच्या अविनाशी स्वरुपाची ओळख पटते. ब्रह्म स्वयंभू आहे तर बाकी सर्व निर्माण करावं लागतं. त्यामुळेच इतर सगळ्या वस्तू क्षर आहेत, विनाशी आहेत तर परमात्मा अक्षर आहे.



या जड प्रकृतीपासून अक्षय परमात्म्याकडे जाणं निश्चितच सोपं नाही. त्याला ज्ञानसाधनेची जोड द्यावी लागते. त्यामुळेच परमज्ञानाची प्राप्ती करून घेणं गरजेचं ठरतं असं ज्ञानेश्वर माऊली सांगतात.

# मातृभक्तीचं प्रतीक मरिअम्मन मंदिर

तीर्थाटन

मातृभक्तीविषयी आपण खूप काही वाचतो, ऐकतो. पण मातृभक्तीला वाहिलेलं मंदिर सिंगापूरमध्ये आहे हे तुम्ही जाणता का? इथे असणारं मरिअम्मन मंदिर द्रविड स्थापत्यशैलीचा अद्भूत नमुना आहे. तामिळीयन भाविक नारायण पिल्लई यांनी १८२७ मध्ये हे मंदिर बांधलं. २०१० मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. या मंदिराचं प्रवेशद्वार दक्षिणी गोपुरम शैलीत बांधलं आहे. गाभाऱ्यात माता मरिअम्मन विराजित आहे. भारताच्या ग्रामीण भागात मरिअम्मन मातेला मातृशक्तीचं प्रतीक मानतात. ही देवी आईच्या मायेने रोगराईपासून आपलं संरक्षण करते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या मंदिराचे निर्माणकर्ते नारायण पिल्लई ईस्ट इंडिया कंपनीमध्ये कार्यरत होते. कंपनीने सिंगापूरमध्ये बस्तान बसवायचं ठरवलं. त्यावेळी अनेक हिंदू लोकही इथे स्थायिक झाले. त्यांना आराधना करता यावी या हेतूने हे मंदिर बांधण्यात आलं. पाऊस पडत नसल्यास या देवीची आराधना केली जाते. मंदिराच्या शिखरावर विविध हिंदू देवीदेवतांच्या प्रतिमा आहेत.

सिंगापूरमध्ये स्थित असणाऱ्या भारतीयांचं सर्वात महत्त्वाचं श्रद्धास्थान असणारं हे देऊळ भाविकांनी सतत गजबलेलं असतं. ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात इथे मोठा उत्सव पार पडतो. यावेळी भाविकांची मोठी गर्दी असते. एकूणच सिंगापूरला जाण्याचा योग आल्यास या मंदिराला भेट देण्यास विसरु नका.



# इयत्ता पहिली ते ५ वी साठी हिंदी तृतीय भाषा

## हिंदी अनिवार्य करण्याच्या निर्णयाला विरोध झाल्यानंतर राज्य सरकारचा नवा आदेश जारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

राज्य सरकारच्या वतीने इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत तृतीय भाषा सूत्र स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे आता मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा हिंदी अनिवार्य नसली तरी, तिसरी भाषा विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे.

यासंबंधी काढण्यात आलेल्या जीआर नुसार मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषे ऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल.

अशा विद्यार्थ्यांना हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरता किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास त्या भाषेच्या अध्यापन करण्याकरता शिक्षक देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. किंवा सदर भाषा ही ऑनलाइन पद्धतीने शिकवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही अनिवार्य असेल, असे देखील शालेय शिक्षण विभागाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

**हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला विरोध**

राज्यामध्ये मराठी, इंग्रजी बरोबरच हिंदी भाषा ही अनिवार्य करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र निर्माण सेना, उद्धव ठाकरे यांचा पक्ष यासह महाराष्ट्रातील अनेक सामाजिक आणि राजकीय संघटनांनी या निर्णयाला विरोध केला होता.

त्यानंतर अखेर या निर्णयात बदल करण्यात आला असून त्यानुसार आता हिंदी ही तृतीय भाषा असेल. मात्र विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास इतर भाषेचा पर्याय देखील निवडता येणार आहे.

**जीआरमध्ये नेमके काय?**

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता १ ली ते ५ वी साठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल;

परंतु या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषे ऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल.

तथापि, हिंदी ऐवजी इतर भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्यास इच्छुकता दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या शाळेतील इयत्तानिहाय संख्या ही किमान २० इतकी असणे आवश्यक राहील. हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरता उपरोक्त प्रमाणे विहित किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छुकता दर्शविल्यास, त्या भाषेच्या अध्यापनाकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल अन्यथा सदर भाषा ही ऑनलाइन पध्दतीने शिकविण्यात येईल. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल.

# मोबाईलपासून लांब राहिले...

## अव्वल भक्ती एम. मेनने उलगडले यशाचे रहस्य

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १८ :



एमएचटी सीईटी (पीसीबी) २०२५चा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यात अकोल्याची भक्ती एम. मेन हिने १०० टक्के पर्सेंटाइल घेत राज्यातून पहिली आली आहे.

आपल्या यशाचे गमक सांगताना भक्ती म्हणाली की, मी सोशल मीडियापासून लांब होते. दोन वर्षात मोबाइल कधी हाताळला नाही. दररोज मेडिटेशन करायचे व एक तास तरी बॅडमिंटन खेळायचे'.

भक्तीचे वडील अकोल्यात कृषी अधिकारी आहेत तर आई गृहिणी आहे. परीक्षेत यश मिळावे यासाठी नेमके काय केले? यावर ती म्हणते, दहावीनंतर मी मोबाईल वापरणं पूर्णपणे थांबवलं. सोशल मीडियासारख्या गोष्टी माझ्या अभ्यासात अडथळा ठरू शकतात हे मला जाणवले.

त्यामुळे दोन वर्षात फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटसअ‍ॅपसारखे कोणतेही अ‍ॅप वापरले नाहीत, अगदी मोबाईल हातात सुद्धा घेतला नाही. दररोज सकाळी आणि संध्याकाळी मेडिटेशन केल्याने भक्ती सांगते.

अभ्यासात फोकस ठेवण्यासाठी मेडिटेशन फायद्याचे ठरले. याशिवाय, बॅडमिंटन हा तिचा आवडता खेळ असून, दररोज एक तास तरी खेळत असे. अकरावीत तर रोज खेळायचे, बारावीत थोडे कमी झाले तरी आठवड्यातून दोन-तीन वेळा बॅडमिंटन न चुकता खेळायचे.

दररोज सरासरी दहा ते बारा तास अभ्यास करायची. अभ्यासाचा ताण येऊ नये म्हणून वेळेचे योग्य नियोजन करत होते. थोड्या थोड्या विश्रांतीसह अभ्यास करून कंटाळवाणेपणा दूर ठेवला.

प्रा. ललित काळपांडे यांच्या मार्गदर्शनात दररोजचा अभ्यास वेळ, रिव्हिजन आणि टेस्ट सिरीज या सगळ्याचे काटेकोर नियोजन केले होते.

सीईटीतही राज्यात अव्वल आले आहे. नीटमध्ये परीक्षेत ५६७ गुण मिळवले आहेत. एमबीबीएस करून न्यूरो सर्जन बनायचे आहे. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना मेंदूशी निगडित शस्त्रक्रियांचे तंत्र आत्मसात करून समाजासाठी कार्य करू इच्छिते. समाजात विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना मदत करू इच्छिते.

भक्तीने अभ्यासात सातत्य ठेवले; त्यामुळेच मिळाले यश भक्तीने अभ्यासात सातत्य ठेवले. जिथे तिला अडचण येत होती तिथे मार्गदर्शन घेतले. समाधान होईपर्यंत ती स्वस्थ बसत नसे. दिवसातून तिने १०-१२ तास अभ्यास केला. कुठलीही गोष्ट मनावर घेतली आणि त्या दिशेने मार्गक्रमण केले की यश मिळते. दोन वर्षे ही विद्यार्थ्यांच्या करिअरची असतात. भक्ती त्याचे एक उदाहरण असल्याचे शिक्षणतज्ज्ञ प्रा. ललित काळपांडे यांनी सांगितले.

# आषाढी एकादशीच्या महापूजेचे फडणवीस यांना निमंत्रण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :



पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने यंदाच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे औपचारिक निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. रविवार, ६ जुलै रोजी पहाटे २.२० वाजता श्रींच्या चरणी मुख्यमंत्री फडणवीस सपत्नीक महापूजा करणार आहेत.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांचा विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे आणि चिपळ्यांनी सन्मान करण्यात आला.

या शिष्टमंडळात मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, अ‍ॅड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांचा समावेश होता. यावेळी शिष्टमंडळाने आषाढी यात्रेच्या व्यापक नियोजनाबरोबरच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या जतन आणि संवर्धन कार्याची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली.

भाविकांसाठी सुरू करण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीसह इतर महत्त्वाच्या सेवा-सुविधांबाबतही माहिती देण्यात आली. यंदाची आषाढी एकादशी ही रविवारच्या शुभमुहूर्तावर येत असल्याने पंढरपूर नगरीत लाखोंच्या संख्येने भाविक दाखल होणार आहेत. शासनाच्या शासकीय पूजेची जबाबदारी मुख्यमंत्री फडणवीस पार पाडणार असून, यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष विठूरायाच्या चरणांशी जोडले जाणार आहे.

# मुंबईत रॅपिडो आणि उबेरविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

मुंबई पोलिसांनी रॅपिडो आणि उबेर बाईक टॅक्सीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. राज्य सरकारच्या परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे वाहतूक सेवा पुरवल्याबद्दल प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) या कंपन्यांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

दोन्ही कंपन्यांविरुद्ध बीएनएसच्या कलम ३१८(३) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एप्रिलमध्ये आरटीओने या प्रकरणी रॅपिडोला नोटीस बजावली होती. परिवहन आयुक्तांनी दोन्ही अ‍ॅप-आधारित अ‍ॅग्रीगेटर्सविरुद्ध कारवाईचे आदेश दिले होते. त्यानंतर एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

कर्नाटक सरकारने २ एप्रिल रोजी बाईक टॅक्सी सेवांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. कर्नाटकात १६ जूनपासून ओला, उबेर, रॅपिडो बाईक्स बंद झाल्या. कर्नाटक उच्च न्यायालयाने १३ जून रोजी रॅपिडो, ओला आणि उबर मोटो सारख्या बाईक टॅक्सी सेवा बेकायदेशीर घोषित करून राज्य सरकारचा आदेश कायम ठेवला होता. या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जून रोजी होईल.

कर्नाटक सरकारने २ एप्रिल रोजी बाईक टॅक्सी सेवांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे पाऊल उचलण्यात आले की खाजगी नंबर प्लेट असलेल्या दुचाकी वाहनांचा व्यावसायिक सेवेसाठी वापर करता येणार नाही कारण त्यासाठी कोणतेही स्पष्ट नियम नाहीत.

न्यायालयाने असेही म्हटले आहे की जोपर्यंत राज्य सरकार मोटार वाहन कायद्याच्या कलम ३ अंतर्गत बाईक टॅक्सींसाठी परवाना, विमा आणि सुरक्षिततेशी संबंधित नियम निश्चित करत नाही, तोपर्यंत त्यांचे कामकाज बेकायदेशीर मानले जाईल. न्यायालयाने सहा आठवड्यांच्या आत सर्व सेवा बंद करण्याचे आणि तीन महिन्यांच्या आत नियम बनवण्याचे निर्देश दिले होते.

# राज्यात भाजपचे सरकार आणण्यात शरद पवारांचा हत्तीचा वाटा

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची सडकून टीका

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १८ :

शरद पवार यांनी वेळोवेळी भाजपला मदत केली असून राज्यात २०१४ मध्ये भाजपचे सरकार स्थापन होण्यात त्यांचा सिंहाचा नव्हे तर 'हत्तीचा वाटा' होता, असा खळबळजनक दावा शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला आहे. बुलढाणा येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शरद पवार हे स्वतःला देशातील सर्वात मोठे विरोधक सिद्ध करण्याचा प्रयत्न करत असून, पक्षाचे अस्तित्व टिकवण्यासाठी भाजपविरोधी भूमिका घेत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. शरद पवार साहेबांनी 2014 मध्ये भाजपला थेट किंवा अप्रत्यक्षपणे साथ दिली. त्यावेळेस त्यांनी भाजपचे सरकार येण्यासाठी मोठी भूमिका बजावली. आता मात्र तेच भाजपचा विरोध करत आहेत, हे दुहेरी धोरण आहे, असा आरोप जाधव यांनी केला आहे, असे वृत्त एका मराठी वृत्तवाहिनीने दिले आहे.

प्रतापराव जाधव म्हणाले की, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जर दारूचे दर कमी व्हावेत अशी मागणी करत असतील, तर मी स्वतः सरकारकडे त्यांचे निवेदन देतो, असा टोला त्यांनी काँग्रेसलाही लगावला.

रायगडमधील पूजावादाच्या वादावर बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले, हिंदू



धर्मात कोणी कुठे, कशी पूजा करावी, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. रायगडवर जर काही पूजा झाली असेल तर त्यात गैर काही नाही. यावरून राजकारण करण्याची गरज नाही.

**शरद पवारांचे वक्तव्य काय?**

सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बसायचे ही भूमिका कुणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा नाही. कुणाशीही संबंध ठेवा, पण भाजपशी संबंध हा काँग्रेसच्या विचारांचा असूच शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधीसाधूपणाच्या राजकारणाला प्रोत्साहित करायचे नाही. त्या दृष्टिकोनातून पावलेही टाकायची नाहीत, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी अजित पवार गटात आपला पक्ष विलीन करण्याच्या वावड्यांवर पडदा टाकला.

# मनपा निवडणुकांसाठी काँग्रेसची स्वबळाची तयारी सुरू

## आघाडीबाबत निर्णय वर्किंग कमिटीकडे नितीन राऊतांचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :



राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने स्वबळावर लढण्याच्या तयारीला प्रारंभ केला आहे, अशी माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनी दिली.

कार्यकर्त्यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या असतात आणि त्यामधूनच पक्ष मजबूत होतो, असेही ते म्हणाले. ह्ही लोकल बॉडीची निवडणूक आहे. यात थेट कार्यकर्ते रिंगणात उतरतात, त्यामुळे पक्षाची ताकद दिसून येते आणि स्थानिक पातळीवर संघटन अधिक बळकट होते, असे मत राऊत यांनी मांडले.

**महाविकास आघाडीवर सस्पेन्स कायम**

महाविकास आघाडीत काँग्रेस सामील राहणार का? याबाबत विचारले असता नितीन राऊत म्हणाले की, महाविकास आघाडी म्हणून लढायचे की नाही, याचा अंतिम निर्णय काँग्रेस वर्किंग कमिटी घेईल. स्थानिक नेतृत्वाने तयारी मात्र स्वबळावर सुरू ठेवावी, अशी सूचना आहे.

**पक्ष संघटनाला चालना देणाऱ्या निवडणुका**

नितीन राऊत पुढे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजेच कार्यकर्त्यांसाठी राजकीय संधीचं सुवर्णद्वार असते. यातून नव्या नेतृत्वाला वाव मिळतो. त्यामुळे काँग्रेस संघटनेची नवी घडी बसवण्यासाठीही या निवडणुका महत्त्वाच्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी म्हणून काँग्रेस जोरकसपणे तयारी करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**काँग्रेसचा फोकस स्थानिक नेतृत्वावर**

राजकीयदृष्ट्या सध्या राज्यात महत्त्वपूर्ण घडामोडी सुरू असताना काँग्रेसने दिलेला स्वबळाचा संकेत लक्षवेधी ठरत आहे. स्थानिक पातळीवर स्वतंत्रपणे ताकद उभी करण्यासाठी काँग्रेसचे प्रयत्न सुरू झाले असून, येत्या काळात पक्षाच्या रणनीतीला अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

## अध्यक्ष व संचालक पदावरून अपात्र

# बच्चू कडू यांचे हायकोर्टात आव्हान

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १८ :

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (एडीसीसी) अध्यक्ष बच्चू कडू यांनी त्यांच्या अध्यक्ष व संचालक पदाच्या अपात्रतेला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात दाखल केली आहे. गुरुवार, १९ जून रोजी या याचिकेवर सुनावणी होणार आहे.



तत्कालीन विभागीय सहनिबंधक चैतन्य नासरे यांच्या न्यायालयाने कडू यांना बँकेचे अध्यक्ष व संचालक या दोन्ही पदासाठी अपात्र ठरविले आहे. सोमवार, १६ जून रोजी हा निर्णय सार्वजनिक झाला. दरम्यान आज, मंगळवारी दुसऱ्याच दिवशी त्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याचे बच्चू कडू यांच्या वतीने बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी गेले आठवडाभर बच्चू कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यभूमी असलेल्या गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यामुळे शनिवारी सायंकाळी उपोषण सोडताच त्यांना येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. अशाही स्थितीत सहनिबंधकांच्या आदेशाला आव्हान देणार असल्याचे बच्चू कडू यांनी सोमवारीच हॉस्पीटलमधून प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले होते.

नाशिक येथे आंदोलनादरम्यान सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केला म्हणून तेथील एमएलए-एमपी विशेष न्यायालयाने कडू यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावली होती.

नेमक्या याच शिक्षेचा आधार घेऊन विभागीय सहनिबंधकांनी बच्चू कडू यांना अपात्र ठरविले आहे. परंतु जाणकार सूत्रांच्या माहितीनुसार सदर शिक्षेला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती शिवकुमार दीघे यांच्या एकलपिठाने ११ मार्च २०२५ रोजीच निलंबित केले आहे.

हाच मुद्दा घेऊन कडू उच्च न्यायालयात गेले आहेत. युक्तिवादादरम्यान याशिवायही काही मुद्दे मांडले जातील, अशी सूत्रांची माहिती आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाचे न्यायमुर्ती पानसरे यांच्या एकलपिठासमोर ही सुनावणी होईल.

## : लोक सेवार्थ :

# सामाजिक बांधलकी जोपासणारी अमर संस्था



लोकजागर

सामाजिक बांधलकी जोपासत समाजासाठी समाजकार्याचा वसा अमर या संस्थेने चालविला त्यातून आजच्या समाज रचनेत अनाथ निराधार बालके, आईवडील, विना पोरकी बालके झालेली या बालकांच्या भविष्यातील अंधकार दूर करण्याचा प्रयत्न संस्था करित आहे.

त्या बालकांना निव्वळ आसरा देत नाही तर अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य शिक्षण, संस्कार व पुर्नवसन या सर्व गरजांची पुर्ती करून त्यांच्या आयुष्याला अर्थ व सौंदर्य प्राप्त करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न संस्था करते.

या बालकांना बाल न्याय मंडळाच्या मान्यतेने प्रवेश दिला जातो. त्यांना शैक्षणीक सुविधा यात त्यांच्या उत्तीर्ण वर्गानुसार शाळेत प्रवेश मिळवून दिला जातो. शालेय साहित्य उदा स्कुल बॅग, वह्या पुस्तके, पेन, पाटी, पेन्सील कंपासपेटी इ.सर्व साहित्य संस्थेतर्फे पुरविण्यात येते.या खेरीज त्यांना सकस पोषक आहार दिला जातो.

अमर संस्थेच्या माध्यमातून वृद्धाश्रमाची सुरवात करण्यात आली सदय स्थितीत वृध्दाश्रमात १२ वृद्ध आजी बाबा आहेत यांना संस्थे मार्फत प्रत्येकी खोली, पलंग, गादी, उशी, चादर ब्लँकेट याच बरोबर सकाळचा चहा नाश्ता २ वेळचे जेवण दुपारचा चहा दिले जातो तसेच वर्षातून दोन वेळा कपडे दिले जाते. ६ वृद्धांना मोफत हया सर्व सुविधा पुरविण्यात येतात. तसेच आरोग्या विषयी काळजी, आंघोळीला गरम पाणी अशा सुविधा पुरविल्या जातात.

संस्थेने २००६ मध्ये गो-शाळा सुरू केली. अपंग गाई, वृद्ध गायी गंभीर गायी, आजारी गाई अशा प्रकारची शेडची व्यवस्था करण्यात आलेली असून गायीच्या दुधाचा वापर अनाथालयातील बालकांना नाश्तासाठी केला जातो व गायींच्या शेणाचा वापर बायोगॅस निर्मिती करून १०० अनाथ बालके व २५ वृद्धाच्या स्वयंपाकासाठी होत आहे.

संस्थेद्वारा समाजातील दिन दुबळ्या लोकांना साठी वस्त्र पेढी हि योजना सुरु करण्यात आली आहे. उच्चभ्रु लोक आपले कपडे काही दिवस वापरून टाकुन देतात अशी वस्त्रे त्यांच्या स्वेच्छेने त्यांनी संस्थेत जमा केली की त्यांना धुवून फाटलेली असल्यास शिवून प्रेस करून ज्यांच्या अंगावर आज पुरेशी वस्त्रे नाहीत व ते लोक नविन वस्त्रे मिळु शकत नाहीत अशा लोकांना व बालकांना वापरण्यास दिली जातात.

या वस्त्रपेढी योजनेचा लाभ चोपडा शहरातील गरिब गलिच्छ वस्तीमध्ये देण्यात येतो. अश्या प्रकारे वस्त्रपेढी योजना चालविण्यात येते.भारतासारख्या देशात गरीबीचे प्रमाण जास्त आढळून येते आजही बरेचसे लोक अर्ध पोटी व अर्धवट कपडयांवर दिसून येतात म्हणून विचार करून आपण जे काही कपडे बाजूला सारतो त्यांचा वापर करत नाही असे कपडे उच्चभ्रू समाजाकडून मागवून योग्य असतीलतर त्यांचे शिवणकाम करून ते कपडे ज्यांना त्याची आवश्यकता आहे त्या देण्याचे कार्य अमर संस्थेच्या माध्यातून सुरु आहे. ■ ■ ■

## : शून्यातून विश्व :

# यशोगाथा बोअर्डबीज टेक सोल्युशन्स कंपनीची

कर्नाटकातील हुबळी येथे जन्मलेले आनंद, हे कोटा येथे आपल्या आयआयटी प्रवेश परिक्षेची तयारी करत होते. अतिशय हुशार असल्याने ते उत्तम विद्यालयांमध्ये शिकणार आणि अभियंता बनून साधारणपणे ज्या आयुष्याला चांगले, आनंदी आयुष्य म्हणतात, असे आयुष्य व्यतीत करणार, अशीच अपेक्षा होती. पण त्यांनी मात्र त्यांच्याकडून जे अपेक्षित नव्हते नेमके तेच केले.

त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण अर्ध्यावरच सोडले आणि त्याहीपुढे जात त्याहीपेक्षाही वाईट असे काही तरी केले. ते त्यांच्या मूळ गावी परत आले आणि वयाच्या १८ व्या वर्षी स्वतःचे स्वतंत्र काम हाती घेतले. पुढच्या काळात अनेक पुरस्कार आणि प्रशंसा मिळविणारे आनंद हे आज उत्तर कर्नाटक प्रदेशातील सर्वाधिक मागणी असलेले उद्योजक आहेत. मात्र एकाच ठिकाणी अडकून न रहाण्याची वृत्ती असलेले आनंद यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने एका नव्या प्रवासाला सुरुवात केली आहे.

त्यांनी पंचवीस शहरांमधून दहा हजार किलोमीटरच प्रवास केला करुन तीस हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना तरुण वयातच व्यावसायात प्रयोग करण्यासाठी प्रेरणा दिली आहे.

आनद यांच्या निर्णयाने चकीत झालेले पालक आणि आसपासच्या लोकांकडून होणाऱ्या लांच्छनास्पद टिप्पण्या, यामध्येच आनंद यांनी हुबळी येथे बोअर्डबीज टेक सोल्युशन्स ला सुरुवात केली. हुबळी हे कर्नाटकातील एक व्यवसायाचे केंद्र होते. कामाच्या सुरुवातीच्या काळात, ते करत असलेल्या या कामाबाबत लोकांमध्ये विश्वास निर्माण करणे ही सर्वात मोठा अडचण होती. तसेच त्यांना कसलीच तांत्रिक पार्श्वभूमी नव्हती. त्यानंतर त्यांनी नावाजलेल्या सॉफ्टवेअर कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या आपल्या शाळेतील वरीष्ठांनाच आपल्यासह काम करण्याबाबत विचारणा केली आणि त्यांनीही ते मान्य केले. त्याचवेळी या सर्वांना आपल्याबरोबरच कायम ठेवण्याची अवघड कामगिरीही त्यांच्यावर होती. सुरुवातीच्या काळात उत्पादनातील चिंतांसाठी बोअर्डबीजने आऊटसोअर्सिंग केले आणि हळूहळू या प्रदेशात भरभराटीला आलेल्या उत्पादन उद्योगासाठी एक संपूर्ण वाढ झालेली ईआरपी सोल्युशन्स कंपनी बनण्याकडे वाटचाल केली. त्याशिवाय कंपनीकडे १५० मोबाईल ॲप्सचे पोर्टफोलियो आहेत, ज्याचे तीन लाखांपेक्षा जास्त डाऊनलोडस् झाले आहेत. उत्तर कर्नाटक प्रांतात केंद्रस्थानी वसलेले हुबळी ओळखले जाते ते छोटा बॉम्बे म्हणून... एक गजबजलेला व्यापारी जिल्हा अशी या शहराची ओळख आहे. ■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# शिक्षकांनी काढली शासन आदेशाची अंत्ययात्रा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १८ :



प्रहार शिक्षक संघटनेच्या बेमुदत उपोषण आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी शासनाच्या संच मान्यता शासन आदेशाची अंत्ययात्रा काढण्यात आली.

यावेळी राज्य अध्यक्ष महेश ठाकरे यांच्यासह अकरा आंदोलनकर्त्या शिक्षकांना स्थानबद्ध करण्यात आले. आंदोलनकर्त्या शिक्षकांनी यावेळी घोषणा देत शासनाचा निषेध केला.

प्रशासनाने आंदोलनाची दाखल न घेतल्याने प्रहार शिक्षक संघटना कमालीची आक्रमक झाली असून कार्यवाही होत नसल्याने अखेर संघटनेने संच मान्यतेच्या शासन आदेशाची अंत्ययात्रा काढली. यावेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्या शिक्षकांना ताब्यात घेतले.

प्रहार शिक्षक संघटनेचे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या समस्या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयावर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाचा आजचा तिसरा दिवस आहे. आजपासून अन्नत्याग आंदोलनाची भूमिका संघटनेने घेतली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालया समोर निदर्शने करीत शेकडो शिक्षकांनी शासन व प्रशासन विरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करीत आपला रोष व्यक्त केला. या घोषणाबाजीने आयुक्त कार्यालय दणाणून सोडले. ग्रामीण शिक्षण व्यवस्था मोडीत काढणारा व शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करणारा संच मान्यता दिनांक १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावा या प्रमुख मागणीसह एकूण ३५ मागण्या शिक्षक संघटनेने केल्या आहेत.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी काल आंदोलनकर्त्या शिक्षकांनी रक्तदान करून शासनाचा व प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त केला. प्रशासनाने दखल न घेतल्यास दिनांक १८ जून पासून अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचा इशारा संघटनेने दिल्यानंतर व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची विभागीय आयुक्त त्यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे चर्चा झाली. संघटनेची विभागीय आयुक्त कार्यालयात संबंधित सर्व अधिकाऱ्यांसमक्ष बैठक घेण्याची सूचना बच्चू कडू यांनी केली.. काल रक्तदान करणाऱ्या आंदोलनकर्त्यांमध्ये अमोल आगे, नागसेन रामटेक, अमोल वरेकर, अश्विन हिंगणकर, उमेश वानखडे, संदीप जाधव, अमोल हिरुळकर यांचा समावेश होता.

नागपूर
महासागर
# वृत्तसागर
■ गुरूवार, दि. १९ जून २०२५ ■

## अंगणवाडीच्या थकीत विजबिलाला नगर परिषदेचा आधार

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १८ :**
डिगडोह देवी नगर परिषद झाल्यानंतर परिसरातील अंगणवाडीच्या महिनोगीणती रखडलेल्या वीज बिलाच्या थकीत रकमेला अखेर मुख्याधिकाऱ्यांनी हिरवी झंडी दिल्यानंतर भरणा करण्यात आला.

डिंगडोह नगर परिषद व्हायच्या पूर्वी ग्राम पंचायत असल्याने ग्राम विकास खात्याच्या अखत्यारीत परिसरात ६ अंगणवाड्या असून स्थानिक प्राधिकरण बदलून नगर परिषद झाली. परंतु या भागातील शासकीय इमारतीत असलेल्या अंगणवाड्या व जिल्हा परिषदेच्या शाळा मात्र हस्तांतरित झाल्या नाहीत. त्यामुळे पूर्वी ग्राम पंचायत देत असलेल्या विजबिलाचा भरणा नगर परिषदने बंद केला.

आता या अंगणवाडी कडे हजारो रुपये थकबाकी झाल्याने वीज वितरण कंपनी ने वीज पुरवठा बंद केला .वीज पुरवठा नसल्याने पंखे व लाईट बंद झाले. लहान मुलांना याचा त्रास सुरू झाला. त्यानंतर स्थानिक डिंगडोह जागृती मंचच्या पदाधिकाऱ्यांनी मोनू सिंग यांच्यासह मुख्याधिकारी रामेश्वर पांडागळे यांची भेट घेतली. त्यानंतर या सहा अंगणवाडीची थकबाकी नगर परिषद कडून अदा करण्यात आली. त्यामुळे आता या अंगणवाड्यांचा विद्युत पुरवठा सुरू झाला आहे.

या अंगणवाड्या नगर परिषद ला हस्तांतरित झाल्या नसल्याने आर्थिक मदत करताना अडचण येते. तात्पुरती स्वरूपात ही मदत करण्यात आली.

# सौर कौशल्य विकास प्रशिक्षणाला वेग देणे आवश्यक

## महावितरणचे सीएमडी लोकेशचंद्र यांचे प्रतिपादन : हरित ऊर्जा क्षेत्रात ७ लाखांवर रोजगाराच्या संधी




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :**
राज्यात प्रामुख्याने सौर ऊर्जेमुळे पारंपरिक ऊर्जेच्या परिवर्तनाचा वेग वाढला आहे. येत्या पाच वर्षांत वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेत आणखी 38 हजार मेगावॅट हरित ऊर्जेची राज्यात भर पडणार आहे. यासह सौर ऊर्जेच्या विविध योजनांमुळे हरित ऊर्जेच्या क्षेत्रात सुमारे 3 लाख 30 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक तसेच सात लाखांवर रोजगारांची निर्मिती होणार आहे. त्यामुळे कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळासाठी बेरोजगार महिला व युवकांना प्रशिक्षण देणे व त्याचा वेग वाढवत नेणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र सौर कौशल्य कार्यक्रम अंतर्गत महावितरण, आशियाई विकास बँक व मिटकॉन यांच्या संयुक्त सहकार्याने एकलहरे (नाशिक) येथील मुख्य प्रशिक्षण व सुरक्षा केंद्रामध्ये सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या पहिल्या वर्गाचे उद्घाटन लोकेश चंद्र यांच्याहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे यांची उपस्थिती होती.

महावितरणमध्ये शिकाऊ उमेदवार (अप्रेंटिस) असलेल्या 57 युवतींना या प्रशिक्षणात प्रथम संधी देण्यात आली आहे. सहा दिवसीय प्रशिक्षणात त्यांना प्रामुख्याने सौर पॅनेल बसवणे, दुरुस्ती करणे, नियमित देखभाल व इतर प्रशिक्षण देण्यात येत आहे.

यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधला. सौर कौशल्य प्रशिक्षणाच्या राज्यातील पहिल्या तुकडीमध्ये सर्वच प्रशिक्षणार्थी म्हणून महिलांना संधी देण्यात आली याचा त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. भविष्यात हरित ऊर्जेची गुंतवणूक व रोजगाराच्या संधी वेगाने वाढत जाणार आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी आशियाई विकास बँक, महावितरण व मिटकॉन यांचा संयुक्त प्रशिक्षणाची योजना अतिशय स्वागतार्ह आहे असे त्यांनी सांगितले.

लोकेश चंद्र म्हणाले, राज्यात विजेची स्थापित क्षमता सध्या 36 हजार मेगावॅट आहे. त्यात सन 2030 पर्यंत तब्बल 38 हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह 45 हजार मेगावॅट विजेची भर पडणार आहे. त्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता 13 टक्क्यांवरून 52 टक्के होणार आहे. यात सौर ऊर्जेचा सर्वाधिक वाटा राहणार आहे.

जगातील सर्वांत मोठा 16 हजार मेगावॅटचा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प राज्यात मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना 2.0 मधून पूर्णत्वास जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेद्वारे दिवसा वीजपुरवठा मिळविण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण होत आहे. यासोबतच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप आदीमुळे सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे, असे त्यांनी सांगितले.

संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार म्हणाले की, महावितरणकडून पहिल्या टप्प्यात 4 हजार जणांना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यात किमान 30 टक्के महिला प्रशिक्षणार्थींचे प्रमाण असेल असे नियोजन आहे. सोबतच राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना सौर कौशल्य प्रशिक्षण देण्यास वेग देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशियाई बँकेचे सल्लागार प्रद्योत मुखर्जी यांनी केले. मिटकॉनचे उपाध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. कार्यक्रमाला मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) अरविंद भादिकर, मुख्य अभियंता सुंदर लटपटे, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांची प्रमुख उपस्थिती होती. ंचालन सौ. शिल्पा फसे यांनी केले.

## शेतकऱ्यांच्या नावावर १४५ कोटींचा कर्ज घोटाळा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :**
शेतकऱ्यांच्या नावावर एका व्यक्तीने तब्बल १४५ कोटी रुपयांचे कर्ज घेतले. शेतकऱ्यांना कर्ज फेडीसाठी बँकाकडून नोटीस मिळाल्यावर हे प्रकरण पुढे आले. १४५ कोटी रुपयांच्या शेतकरी कर्ज घोटाळ्यात अटक झालेल्या रामनराव बोल्ला सध्या कारागृहात आहे.

नागपूर ग्रामीण भागात २०१७ ते २०२३ दरम्यान, रामनराव बोल्ला नावाच्या व्यापाऱ्याने सहआरोपींच्या मदतीने शेतकऱ्यांकडून आधारकार्ड, फोटो, ओळखपत्रे गोळा केली. सरकारी योजना सांगत शेतकऱ्यांना बँक खाती उघडायला लावण्यात आली. प्रत्यक्षात मात्र, या कागदपत्रांचा वापर करून १८४ बनावट कर्ज प्रस्ताव तयार करण्यात आले. हे प्रस्ताव पुढे तीन बँकांकडे सादर करण्यात आले. यात कॉर्पोरेशन बँक, आयडीबीआय आणि वैश्य बँक यांचा समावेश आहे. लाखो रुपयांचे कर्ज या शेतकऱ्यांच्या नावाने मंजूर झाले. परंतु ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यातून पुढे फिरवून थेट बोल्ला आणि त्याच्या कुटुंबीयांच्या खात्यांमध्ये वळवण्यात आले.

फॉरेन्सिक ऑडिट अहवालानुसार, एकूण ७६ कोटी ४७ लाख रुपये असे बेकायदेशीररीत्या वळवले गेले. या सर्व व्यवहारात वेअरहाऊसमधील अन्नधान्याचे गहाण दाखले वापरण्यात आले. प्रत्यक्षात धान्याऐवजी भुसा ठेवून बनावट गोदाम अहवाल तयार करण्यात आला. काही एनसीएमएलचे( नॅशनल कमोडिटी मॅनेजमेंट लिमिटेड) अधिकारीही आरोपींसोबत सामील होते. त्यांनी बोगस स्टॉक दाखवत बँकांकडून कर्ज मंजूर करून घेतले. २०१८ मध्ये जेव्हा शेतक?यांना बँकांकडून कर्जफिडीच्या नोटीस आल्या, तेव्हा त्यांनी वकिलांच्या सल्ल्याने पोलिसांत तक्रार दाखल केली. या प्रकरणातून अनेक शेतकरी आर्थिक व मानसिक तणावात गेले.

२८ ऑक्टोबर २०२३ रोजी रामनराव बोल्ला याला अटक झाली. त्याने नियमित जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फळके यांनी त्याचा अर्ज फेटाळला. न्यायालयाने स्पष्ट केले की, हा आर्थिक गुन्हा समाजाच्या नैतिकतेवर घाला घालणारा आहे आणि त्यातील पुरावे गंभीर स्वरूपाचे आहेत. आरोपीनेच यापूर्वी खटल्यातील कार्यवाहीला स्थगिती मिळवली होती.

### शिवभोजन योजनेच्या प्रलंबित बिलाची रक्कम

# सरकार लवकरच अदा करणार

**अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे आश्वासन**



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :**
शिवभोजन योजनेतंर्गत केंद्र चालविणाऱ्या संचालकांची गेल्या अनेक महिन्याची देयके थकित असून, शासनाच्यावतिने थकीत देयके लवकरच अदा करण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

नागपूर येथून गेलेल्या एका शिष्टमंमंडळाचे निवेदन स्विकारल्यानंतर भुजबळ यांनी प्रलंबित देयके अदा करण्याबाबत सकारात्मकता दाखविली.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात शिवभोजन केंद्रे आहेत. ही योजना महाविकास आघाडी सरकारने सुरू केली होती. परंतु सरकार बदलल्यानंतर राज्यात महायुती सरकार सत्तेत आले आणि संपूर्ण राज्यात अशी अफवा पसरली की लाडकी बहिण योजना सुरू झाल्यामुळे शिवभोजन योजना बंद होईल. परंतु ही योजना सुरू ठेवून सरकारने सिद्ध केले की सरकार प्रत्येक घटकाची काळजी घेते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांनीही योजना बंद करणार नसल्याचे स्पष्ट केले . परंतु गेल्या पाच महिन्यांपासून नागपूर आणि संपूर्ण महाराष्ट्रात शिवभोजन योजनेच्या केंद्र चालकांची बिले मिळालेली नाहीत. त्यामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार विक्रांत पाटील, आमदार संजय केणेकर आणि विभागाचे प्रधान सचिव यांची भेट घेतल्यानंतर महात्मा फुले समता परिषदेचे नेते ईश्वर बाळबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

आमदार प्रवीण दटके, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन शिफारस केली आहे. यावर छगन भुजबळ यांनी सर्वांना जुलैच्या पहिल्या आठवड्यात सर्वांचे बिले मिळतील असे आश्वासन दिले. तसेच, ही योजना सर्वसामान्यांसाठी असल्याने राज्याचे मुख्यमंत्री आणि अजित पवार, अर्थमंत्री ही शिवभोजन योजना अखंडपणे सुरू ठेवतील, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक भास्कर पराते, भारती खोब्रागडे, सुशीला माटे, अंजली पार्कवार, चंद्रपूर येथील सारिका नागराडे यांच्यासह महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

## खासदार सांस्कृतीक महोत्सव समितीतर्फे विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनांचा होणार जागर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनांवर आधारित विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ व १७ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते ७ या वेळेत नागपूर येथील सोमवारी क्वार्टर सक्करदरा येथील श्री संताजी सभागृहात ही स्पर्धा होईल. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने हे आयोजन करण्यात आले असून स्पर्धेच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनांचा जागर होणार आहे.

या खंजरी भजन स्पर्धेत सहभागी मंडळांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पारंपरिक चालींवर आधारित तसेच प्रबोधनात्मक व राष्ट्रभक्तीवर आधारित विषयांवरची २ भजने १२ मिनिटांच्या अवधीत सादर करायची आहेत. भजन मंडळांत जास्तीत जास्त १२ लोकांचा सहभाग अपेक्षित आहे. भजन करताना वाद्यवृंदामध्ये तबला, हार्मोनिअम, टाळ यासोबत खंजरी असणे अनिवार्य आहे. ही स्पर्धा विदर्भस्तरीय असून विजेत्या भजनी मंडळांना रोख पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या स्पर्धेची महाअंतिम फेरी शुक्रवार, १८ जुलै रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता ना. श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील. खंजरी भजन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दि. १९ जून ते २ जुलै या कालावधीत ऑफलाइन अर्ज भरता येईल. प्रत्यक्ष अर्ज प्राप्त करण्यासाठी नितीन गडकरी यांच्या खामला येथील जनसंपर्क कार्यालयात किंवा गुरुदेव सुपर बाजार विश्वकर्मा नगर, ज्ञानेश्वर रक्षक, श्री गुरुदेव सेवा मंडळ सुभाष रोड, राजेश कुंभलकर येथे संपर्क साधावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीने केले आहे.

**विजेत्या मंडळाला १ लाख रुपयांचा पुरस्कार**

प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या मंडळाला १ लाख रुपये रोख, उपविजेत्या मंडळाला ७१ हजार रुपये, तृतीय क्रमांकाला ५१ हजार रुपये, चतुर्थ क्रमांकाला ४१ हजार रुपये, पाचव्या क्रमांकाला ३१ हजार रुपये, सहाव्या क्रमांकाला २१ हजार रुपये तर सातवा क्रमांक पटकावणाऱ्या मंडळाला ११ हजार रुपयांचा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. याशिवाय १० मंडळांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येतील.

## दुचाकी चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या

■ **महासागर प्रतिनिधी कामठी, दि. १८ :**
जुना पोलीस ठाणे हद्दीतील हनुमान नगर पेड की पुरा जे एन रोड येथे राहणारे फियार्दी सारंग प्रभाकर गायधने यांची घरासमोर उभी केलेली सिल्वर रंगाची स्प्लेंडर गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. पोलीसांनी आरोपी अनुराग ज्ञानसिंग मरस कोल्हे रा. शिवनी, मध्य प्रदेश यास अटक केली त्याने आपले साथीदार आरोपी सतीश शामसिंग बोपचे, पालेन्द्र कुमार सिंह पारधी व राकेश यशवंत हरीणखेडे यांच्यासोबत लकडगंज पोलीस ठाणे हद्दीत व कळमना ठाणे हद्दीत गाड्या चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपीच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली मारुती सुझुकी कंपनीची अल्टो व तीन मोबाईल असा एकूण 2 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चारही आरोपींना न्यायालयाच्या आदेशान्वये नागपूर कारागृह येथे बंदिस्त करण्यात आले. ही कार्यवाही डीसीपी कदम एसीपी शिरसागर यांच्या मार्गदर्शनात प्रशांत जुमडे, पीएसआय मनीष हिवरकर, गणेश बोराटे, श्रीकांत भिष्नुरकर यांनी केली.

## एन. एस कोळसा टालवर पोलिसांची धाड

### सहा आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १८ :**
टेकाडी शिवारात असामाजिक तत्त्वांचा आशिवार्दाने सुरू असलेल्या कोळसा टाल वर कन्हान पोलीसांनी धाड टाकून ३० टन कोळसा , तीन दुचाकी वाहना सह एकुण २ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन सहा आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .

पोलिसांच्या माहिती नुसार, मंगळवार दि. १७ रोजी सकाळी ९:३० वाजताच्या दरम्यान नागपुर - जबलपुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील टेकाडी शिवारात एन.एस कोळसा टाल वर मोठ्या प्रमाणात कोळसा साठवलेला आहे. अशी माहिती मिळताच पोलीसांनी टाल वर धाड टाकली असता पोलीसांना पाहुण दुचाकी सोडुन वाहन चालक पळुन गेले . टाल जवळ रवि सुरेश गेडाम (१९) रा. टेकाडी आढळून आल्याने पोलीसांनी त्याला सखोल विचारफुस केली असता एन.एस कोळसा टाल निलेश राजे श्रीवास्तव (३२) रा. खदान यांच्या मालकीचे असून येथे खरेदी विक्रीचे काम राजु विजय सहानी रा.खदान करत असल्याचे सांगीतले. या ठिकाणी कामठी ओ.सी.एम. येथील कोळसा चोरुन विक्री करत असल्याचे दिसुन आले .

पोलीसांनी घटनास्थळा वरुन ३० टन कोळसा किंमत १ लाख ५० हजार रुपए , दुचाकी वाहन क्रमांक एम एच ३३ एच ५२३७ किंमत २०,००० रु , एम एच ४० टी ८५८७ किंमत २०,००० रु , एम एच ३१ व्हीएस ९४४३ किंमत २०,००० रु आणि दोन इलेक्ट्रीक वजन तराजु असा एकुण २ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला . जप्त केलेला कोळसा वेकोलि कडे सुपुर्द करण्यात आला . कन्हान पोलीसांनी वेकोलि कामठी ओसीएमचे सुरक्षा प्रभारी संतोष यादव यांचा तक्रारी वरून सहा आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .

सदरची कारवाई कन्हान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनात, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, उपनिरीक्षक एकनाथ राठोड , उपनिरीक्षक राजकुमार देशपांडे , पोहवा जैलाला सहारे सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

# शालिनीताई मेघे रुग्णालयात मोफत जयपुर फूट वाटप शिबीर




■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १८ :**
वानाडोंगरी केवळ तीन वर्षात शालिनीताई मेघे रुग्णालय व संशोधन केंद्र ने ४५० खाटापासून १०२० खाटाच्या बहुविशेषज्ञता रुग्णालयापर्यंतची झेप घेतली आहे. मध्ये भारतातील गरीब व गरजूंसाठी परवडणारी व दर्जेदार वैद्यकीय सेवा देणारे हे रुग्णालय आता समाजोपयोगी उपक्रमांमधूनही पुढे येत आहे.

या समाजसेवेच्या भावनेतून, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३०, रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ, आणि साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या सहकार्याने मोफत कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) वाटप शिबिराचे आयोजन रविवार, २२ जून २०२५ रोजीशालिनीताई मेघे, वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपूर येथे केले जात आहे.

हा उपक्रम माननीय आमदार समीर मेघे (हिंगणा विधानसभा क्षेत्र) यांच्या प्रेरणेतून जाणि शालिनीताई दत्ता मेघे (माईसाहेब) यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित केला जात आहे. हा कार्यक्रम समीर मेघे यांच्या वैयक्तिक निधीतून आयोजित केला जात आहे. जयपूर फूट ही एक आंतरराष्ट्रीय दर्जाची, खर्चिक नसलेली आणि परिणामकारक कृत्रिम टांग आहे, ज्यामुळे हजारों अपंग व्यक्तींना चालण्याची व आत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे.

समीर मेघे म्हणाले, 'माईसाहेबांकडून शिकलेल्या करुणा व सेवेच्या मूल्यांना ही एक नम्र मानवंदना आहे. कोणालातरी पुन्हा चालण्यास मदत करणे, हा माणुसकीचा सर्वोच्च सन्मान आहे.

कॅम्पसचे संचालक डॉ. अनुप मरार यांनी यावर भर दिला की, आम्ही नेहमीच सामुदायिक आरोग्यसेवेला प्राधान्य दिले आहे मग ते महाआरोग्य शिबिरांद्वारे प्रतिबंधात्मक पोहोच असो, टेलिमोडेसिन असो किंवा जयपूर फूट कॅम्पसारखे पुनर्वसन प्रयत्न असोत. हा उपक्रम समावेशक काळजी आणि सामाजिक जबाबदारीसाठी आमची वचनबद्धता आणखी वाढवतो.₹

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३० चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजिंदरसिंग खुराणा यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अशा अर्थपूर्ण कार्यात योगदान देण्याचा आम्हाला अभिमान आहे.'

राजीव वरभे, अध्यक्ष, आदिवासी कल्याण समिती, रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०, यांनी नमूद केले, कायमच आरोग्य सेवा क्षेत्रात नेतृत्व दाखवले आहे. यशस्वी आयोजनासाठी डॉक्टर, सामाजिक संस्था आणि नेतृत्व एकत्र आले आहे.

डॉ. सुधीर सिंह, वैद्यकीय अधीक्षक, यांनी सांगितले की, शिबिराचे नेतृत्व डॉ. वसंत गावंडे, प्रमुख, अस्थिरोग विभाग, करतील, त्यांच्यासोबत डॉ. शिवम गुप्ता, कु.भाग्यश्री गोहाणे, अजय ठाकरे, डॉ. सीमा सिंग व नीरज कलीहारी यांची समर्पित टीम असणार आहे.

अश्विन रडके, विशेष कार्य अधिकारी (सामुदायिक सेवा) यांनी माहिती दिली की, शिबिर रविवार, २२ जून २०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत शालिनीताई मेघे वानाडोंगरी, नागपूर येथे होणार आहे. यात नोंदणी, तपासणी, अस्थिव्यंग मूल्यांकन, मोजमाप आणि नंतर कृत्रिम पायांचे निर्मितीप्रक्रिया केली जाईल. सुमारे ३० दिवसांत वितरण समारंभ होईल.

हा संपूर्ण उपक्रम पूर्णपणे मोफत असून, पूर्वनोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी रूग्णालय आणि संशोधन केंद्रात संपर्क साधता येईल. गरजूंनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेस ज्योती कपूर, डॉ.अली अकबर मैनुम, वैद्यकीय संचालक डॉ श्याम वाधवानी, अमित दास, संकेत सुरकार, डॉ. नुरूल अमीन व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# आदर्श शालेय शिक्षण प्रणालीच उत्कृष्ट दर्जाचे सावनेर पॅटर्न तयार करू : आमदार डॉ. आशिषराव देशमुख

## डॉ. आयुक्षी देशमुख यांनी केले सादरीकरण




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

अतिशय वेगाने बदलणाऱ्या आधुनिक शिक्षण प्रणालीत समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबातील पाल्यांच्या शिक्षण व्यवस्थेत अनन्य साधारण महत्व असलेल्या नगर परिषद आणि जिल्हा परिषद शाळांचा विद्यार्थी भविष्य हित केंद्रीत करून नगर परिषद व जिल्हा परिषद शाळांचा एकंदरीत दर्जा उंचविण्यासाठी प्रभावी उपाययोजना तयार करून ती यशस्वीरित्या राबविण्याबाबतचे निर्देश आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी सावनेर तालुक्यातील खापा येथे आयोजित सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचालित शाळांना शैक्षणिक दर्जा वाढविण्यासंदर्भातील राधाकृष्ण हॉल खापा येथे पार पडलेल्या कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या, मार्गदर्शन करतांना आमदार डॉ.आशिषराव देशमुख ह्यांना आदर्श शालेय शिक्षण प्रणालीचं महाराष्ट्रातील सर्वात उत्कृष्ट असं सावनेर पॅटर्न तयार करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हया शैक्षणिक कार्यक्रमाचं आणखी एक वैशिष्ट म्हणजे, माझी माउली फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. आयुश्री आशिषराव देशमुख यांचं मॉडेल स्कुल संबधी केलेलं पीपीटी सादरीकरण, ज्यामध्ये त्यांनी खापा नगर परिषदेच्या सर्व शाळांमधील माझी माउली फाउंडेशनच्या आदर्श शाळा अभियान अंतर्गत केलेल्या विकास कार्यासोबतच, सर्व शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची एक विस्तृत रूपरेषा अतिशय मार्मीकपणे सादर केली. ज्यामध्ये शाळेतील भौतिक सोयी सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, नैतिक मूल्यसंवर्धन, खेळ संस्कृती, सामाजिक सहभागिता, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शालेय पोषण, विद्यार्थी आरोग्य व स्वच्छता इत्यादी विषयांवर वस्तुनिष्ठ मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना फक्त शिक्षित नव्हे तर योग्य, जबाबदार व संवेदनशील नागरिक बनवून शिक्षणातून समाजोन्नतीच उद्दिष्ट साध्य करावं, असे विचार डॉ. आयुश्री देशमुख यांनी व्यक्त केले,

क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी जि. प. व. न.प. शाळांमधील व्यवस्था दर्जेदार करण्यासंदर्भात लक्ष केंद्रित केल्याने खापा शहरातील नागरिकांकडून त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करण्यात आले.

हया कार्यक्रमास जि. परिषद नागपूर चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उपजिल्हाधिकारी प्रविण माहिरे, सह आयुक्त नगर पालिका प्रशासन नागपुर विनोद जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, भाजपा जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, अरविंद इण्डो पब्लिक स्कूल अमरावतीच्या मुख्याध्यापिका विजया बागदेव, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, सावनेर चे मुख्यअधिकारी बागडे मॅडम, खापा नगर परिषदने मुख्य अधिकारी धनंजय सरनाईक, कळमेश्वर नगर परिषदचे आकाश सुरडकर तसेच दोन्ही तालुक्यातील गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, केन्द्र प्रमुख व सर्व मुख्याध्यापक व खापा शहरातील प्रफुल्ल मोहटे, खेमराज बारापात्रे, अमोल भूते, पियुष बुरडे, राजेंद्र बुरडे, पवन पैठणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन केंद्र प्रमुख वाहाणे व आभार प्रदर्शन मुख्याधिकारी न. प. खापा सरनाईक यांनी केले. नेहारे, मेश्राम , खडसे मोंडे मॅडम व इतर शिक्षकानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम केले.

# खतावर होत असलेली लिंकींग थांबवा : सलील देशमुख

## कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना निवेदन




■ महासागर प्रतिनिधी
काटोल,दि. १८ जून:

सध्या पेरणीचा हंगाम तोडावर आला असल्याने शेतकरी खते व बियाणे खरेदी करण्याची तयारी करीत आहे. परंतु बाजारात मागणी असलेली खते उपलब्ध नाही. याचा फायदा घेवून आता खत कंपनीने लिंकींग करुन बाजारात खते विक्रीसाठी आणण्याची तयारी करीत आहे. ज्या गोष्टीची गरज शेतकऱ्यांना नाही अशी गोष्टी त्यांना जबरदस्तीने देवून एक प्रकारे त्यांची लुटच करण्यात येत आहे. यामुळे खतावर होत असलेली लिंकीग थांबवावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सलील देशमुख यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची मुंबई येथे बुधवारी मंत्रालयात भेट घेऊन निवेदन देवून केली.

डि.ए.पी., १०:२६:२६, १६:१६:१६, १४:३५:१४, १५:१५:१५ या खतांची मोठया प्रमाणात मागणी असते. परंतु हीच खते आज बाजारात उपलब्ध नाहीत. सर्वात जास्त मागणी ही डि.ए.पी या खताची असते. केवळ नागपूर जिल्हाचा विचार केला तर या खताची एकही रॅक ही आली नाही. ईफको व गोदावरी या कंपनीच्या डि.ए.पी. मागणी शेतकरी करीत असतात. याचा फायदा घेत आता या कंपनी दुकानादारांना २०० बँग डि.ए.पी. सोबत १०० बँग स्लफर घेण्यासाठी सांगत आहे. जर लिंकीग करुन खताची विक्री केली तर दुकानदाराला दोषी ठरवुन त्याच्यावर कारवाई केली जाते. यामुळे कारवाईच्या भितीने दुकानदारही लिंकींगची खते विक्री करण्यास तयार नाही. यामुळे मागणी असलेली खते शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याची मागणी सलील देशमुख यांनी आपल्या निवेदनातुन केली आहे.

दुसरीकडे मोठया प्रमाणात बोगस बियाणे विक्रीचे प्रकार समोर येत आहे. मागील वर्षी तर राज्य शासनाच्या अखत्यारीत येत असलेल्या महाबिजचे बियाणेच बोगस निघाल्याच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. ज्या कपाशीच्या वाणाला पेरणीसाठी बंदी आहे ते वाण सर्रासपणे बाजारात विकल्या जात आहे. कृषी विभगाच्या वतीने यात काही बोगस बियाणे पकडल्याचे सांगत असले तरी बाजारात आजही बंदी असलेले आणि इतर बोगस बियाणे उपलब्ध आहे. या बोगस बियाण्याच्या विक्रीवर अंकुश लावण्याची गरज असल्याचेही सलील देशमुख यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# करिअर टेक्सटाइल इंजीनिअरिंग ही १० व १२ वी नंतरची खात्रिने नोकरी देणारी एकमेव शाखा

## कमी वेळात उत्तम भविष्यासाठी वस्त्रनिर्माण पदविका अभ्यासाशिवाय पर्याय नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

शासकीय तंत्रनिकेतन नागपुर मध्ये वस्त्रनिर्माण विभागाचा पदविका अभ्यासक्रम राबविला जातो. अन्न, वस्त्र आणि निवारा अत्यंत आवश्यक आहे. त्यांचा व्यतिरिक्त काहीच संभव नाही. त्याच प्रमाण वस्त्रनिर्माण शाखेची गरज आहे व पुढे सुद्धा गरज लागणारच आहे. वस्त्रनिर्माण तंत्रशास्त्र या अभियंत्रिका शाखेला फार मोठ्या प्रमाणात मागणी दिसून आलेली आहे. झटपट चांगल्या पगाराच्या नौकरीकरिता व कमी वेळात उत्तम भविष्यासाठी वस्त्रनिर्माण पदविका अभ्यासाशिवाय पर्याय नाही. या संस्थेमध्ये वरील अभ्यासक्रम ४३ वर्षापासून सुरळतरित्या सुरु आहे.

वस्त्र ही मनुष्याची मुलभुत गरज असून आज टेक्सटाईल हे क्षेत्र सर्वव्यापी आहे. भारताचा आर्थिक व्यवस्थेत महत्वाचा साहभाग असणारे व करोडो लोकांना रोजगार देणारे हे एक लोकप्रिय क्षेत्र असून कॉटनवुल, सिल्क पोलिस्टर, नायलॉन इ. नैसर्गिक व कुत्रिम फायबरच्या सबंधीत आहे. आधुनिक काळात टेक्निकल टेक्सटाइलने टेक्सटाइलची व्याख्याच बदलून टाकली आहे. कारण याचा वापर हा वस्त्र परिधान एवढाच सिमित राहिला नसून आरोग्यसेवा, बांधकाम, ऑटोमोबाइल, एरोस्पेस क्रीडा. सरक्षण, वाहन, शेती, वस्त्र, इंटेरियर रस्ते, पैकेजिंग अशा विधि प्रमाणात होत आहे व त्या संबंधीत कारखाने सुद्धा भारतात चालू आहेत. तांत्रिक प्रगती लक्षात घेवुन, टेक्निकल टेक्सटाईल क्षेत्रामध्ये महत्व समावून घेण्यासाठी भारताच्या वस्त्रद्योग क्षेत्रातही मोठा बदल होत आहे. पण त्या दृष्टीने भारतात टेक्सटाईल इंजिनिअर तयार करणारे बोटावर मोजण्या इतकेच महाविद्यालये आहेत. या लेखातून टेक्सटाइल इंजिनिअरिंग ही गरंटेड करिअर घडवणारी शाखा दहावी व बारावी नंतर वस्त्र निर्माण तंत्रशास्त्र पदविका आहे.

टेक्सटाईल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केल्यानंतर मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्याना नामांकित कंपन्यात चांगल्या पकेजचे जॉब मिळतात.नामांकित कंपन्यात टेक्सटाइल डीझायनर म्हणुन नौकरी मिळते.

संबंधीत साराशत टेक्सटाईल इंजीनीअरिंग ही शाखा मल्टी डीसीपलिनरी आहे. भारतामध्ये कमी संखेने महाविद्यालये असल्यामुळे कमी प्रमाणात इंजिनिअर बाहेर पडतात, त्यामुळे नोकरी मिळण्याची नेहमीच खात्री असते. तसेच या क्षेत्रामधून एमबीए, एमटेक परदेशात शिक्षण, सरकारी नौकरी, सॉफ्टवेअर इंडस्ट्रीमध्ये नौकऱ्या अशा विविध क्षेत्रामध्ये करियर करता येते. त्यामुळे उच्च व माध्यमिक पातळीच्या विद्यार्थ्यांना ही गरेंटेड करिअर घडविणारी टेक्सटाइल इंजिनिअररिंगची महत्वपूर्ण शाखा आहे. या अभ्यासक्रमा बद्दल अधिक माहिती आपण खाली दिलेल्या प्राध्यापक कडून मिळवू शकता. असे विभाग प्रमुख वस्त्रनिर्माण विभागाचे डॉ. चंद्रराज कापसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# २६ ला कोल्हापुरात शाहू मेळा

## विदर्भातून हजारो कार्यकर्ते जाणार : उत्तम शेवडे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

बहुजन राजे राजर्षी शाहू महाराजांची जयंती सणासारखी साजरी करावी असा संदेश डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना दिला होता. त्यानुसार बसपा संस्थापक कांशीरामजी यांनी आरक्षण धोरणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू यांच्या आरक्षण शताब्दी व जयंती निमित्त कोल्हापूर सहित देशभर शाहू मेळे भरविले होते. त्याचाच एक भाग म्हणून २६ जून या शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंती निमित्त कोल्हापुरात राज्यस्तरीय शाहू मेळयाचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बसपाचे राष्ट्रीय कॉर्डिनेटर, माजी राज्यसभा खासदार व महाराष्ट्र प्रदेशचे प्रभारी राजारामजी व प्रदेशाध्यक्ष एड सुनील डोंगरे प्रामुख्याने उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या ऐतिहासिक शाहू मेल्याला राज्यभरातून शेकडो पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी दिली.

कही हम भूल ना जाये राष्ट्रीय अभियानांतर्गत २६ जून रोजी कोल्हापूरच्या शाहूपुरी येथील ईरवीन मल्टीपर्पज हॉल मध्ये शाहू मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बसपाचे प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजीपदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक ट्रेन, ट्रॅव्हल्स, बसेस व स्वतःच्या दुचाकी, चारचाकी गाड्याने मोठ्या प्रमाणात पोहोचणार आहेत.

२६ जून रोजी सकाळी नऊ वाजेपासून तर सायंकाळी दहा वाजेपर्यंत छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक झोन, जिल्हा, विधानसभा व सेक्टर स्तरावर कार्यकर्त्यांच्या बैठकी घेऊन कोल्हापूर ला चालण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केल्या जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे नागपूर सहित विदर्भातून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते आपल्या स्थानिक नेत्यासह कोल्हापूरला पोहोचण्यासाठी २३, २४ व २५ जून पासून निघत आहेत.

शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी मागास वर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षणाचा अध्यादेश काढला होता. त्याला १०० वर्ष झाल्याने आरक्षण शताब्दी महोत्सव म्हणून कांशीरामजींनी २६ जुलै ते १ ऑगस्ट २००२ रोजी कोल्हापुरात आरक्षण शताब्दी महोत्सवाचे आयोजन केले होते. यावेळी उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्री मायावती या सुद्धा होत्या. मायावती यांनी २५ जुलै २००२ रोजी शाहू महाराजा तर्फे १९०८ पासून चालवल्या जाणाऱ्या जनता शिक्षण संस्थेच्या मिस क्लार्क होस्टेलला भेट दिली. वस्तीगृहाची दयनीय स्थिती बघून त्यांनी उत्तर प्रदेश सरकार च्या वतीने १० लाख निधी देण्याची घोषणा केली. आणि दुसऱ्या दिवशी २६ जुलै रोजी त्या वस्तीगृहाच्या संचालकांच्या हातात दहा लाख रुपयांचा धनादेश दिला होता हे कोल्हापूरच्या जनतेने प्रत्यक्ष अनुभवले आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मारकाचे उद्घाटन आज




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

१९ जून रोजी, सकाळी ९.३० वाजता. कमला नेहरू कॉलेज येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे उद्घाटन मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांच्या हस्ते करण्यात येत आहे. तरी सर्व रघुजीनगर वासियांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवावी.

काही महिन्यापूर्वी राष्ट्रपती महात्मा गांधी यांचा पुतळा अतिक्रमणाच्या वेढ्याने पूर्णग्रासलेला होता. शिवसेना महिला आघाडी तर्फे देण्यात आलेल्या निवेदनानंतर मनपा आयुक्तच्या आदेशानुसार अतिक्रमण पूर्णपणे हटविले व राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना मोकळा श्वास मिळाला, त्यावेळी सहाय्यक झोन आयुक्त नरेंद्र बावनकर यांना निवेदन सादर करून येथे पूजनीय महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे व जागेचे सौंदर्य करण्यासाठी निवेदन दिले, झोन अधिकारी यांनी सुद्धा सामाजिक कार्याला सहकार्य केलं अथक प्रयत्नामुळे व सहकार्यामुळे इथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे अतिशय सुंदर प्रतिमा साकार झाली. याचे उद्घाटन मनपायुक्त अभिजीत चौधरी यांच्या शुभहस्ते होत आहे. याचा मला आनंद आहे. समाजात एक चांगला संदेश आपल्यातर्फे जावा याकरता रघुजीनगर येथील नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित दर्शवावी असे मनीषा पापडकर जिल्हाप्रमुख शिवसेना नागपूर यांनी सांगितले.

# सीआरपीएफ क्षेत्रिय परिवार कल्याण संस्थेचा उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

सीआरपीएफ च्या क्षेत्रिय परिवार कल्याण संस्थेचा स्थापना दिवस मंगळवारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून साजरा केला. पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने पुढाकाराने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कीर्ती जांभोळकर, पुनम गुप्ता, भावना खोब्रागडे, श्वेता राजे, स्वागत कैलाश व परिसरातही महिलांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला होता. याप्रसंगी औषधीय फळदार व सावलीदार वृक्षांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांनी वृक्ष संगोपन व संवर्धनाचा संकल्प घेतला. १८ जून रोजी स्केटिंग स्पर्धा. १९ जून ला आरोग्य शिबीर. २१ जून ला आंतरराष्ट्रीय योग दिन आणि २२ जून रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकात दिली.

# प्रा. विवेक अलोणी यांची राज्य ग्रंथ निवड समितीवर नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणा-याराज्य ग्रंथ निवड समितीची पुनर्रचना करण्यात आली असून त्यात नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासचे ग्रंथालय संचालक प्रा.विवेक अलोणी यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

साहित्य संस्थांमधून शिफारस केलेले अशासकीय प्रतिनिधी म्हणून पुढील तीन वर्ष ते राज्यात प्रकाशित झालेल्या मराठी भाषेतील उपयुक्त ग्रंथाची निवड करून यादी तयार करण्याच्या कामात आपले योगदान देतील. अभिराम भडकमकर यांच्या अध्यक्षतेत ही समिती काम करणार आहे. यात शासनाने नियुक्त केलेले अशासकीय प्रतिनिधी म्हणून नागपूरचे रविंद्र पांडे आणि राज्य ग्रंथालय संघाचे विभागवार प्रतिनिधी म्हणून नागपूर विभागासाठी डॉ. गजानन कोटेवार यांचीदेखील सदस्य म्हणून या समितीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

# संताजी विकास पॅनलच्या विजयाला आम सभेची मंजूरी





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १८ जून:

जवाहर विद्यार्थीगृहाच्या १५ जूनला झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी संताजी विकास पॅनलच्या शेखर सावरबांधे यांनी १४१३ मते मिळवून बिनविरोध विजय मिळविला. त्यांनी विद्यमान अध्यक्ष रमेश गिरडे यांचा २९६ मतांनी पराभव केला. उपाध्यक्ष म्हणून नरेंद्र कुमार दिवटे, मुख्य कार्यवाह पदासाठी गंगाधर काचोरे, सहकार्यावाहकासाठी हर्षवर्धन बेले, कोषाध्यक्ष पदासाठी बालाचंद टापरे या संताजी विकास पॅनलच्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना आमसभेने एकमताने मंजुरी दिली. कार्यकारी सदस्यांसाठी ऍड नितीन तेलगोटे यांनी जी नावे जाहीर केली त्यापैकी रमेश पिसे, प्रवीण अंबागडे, विजय मोटघरे, प्रज्ञा बडवाईक, हरीश जयपुरकर, सुखदेव वंजारी, अनिल साखरकर, रवी उराडे, लोकनाथ भुरे, कृष्णा घुग्गुसकर, प्रकाश तिळगुळे, हरीश दांडेकर या बारा संताजी विकास पॅनलच्या तर देवेंद्र वाडीभस्मे व चंद्रकांत ढोबळे या दोन पुरोगामी पॅनलच्या उमेदवारांना आमसभेने विजयी झाल्याची मंजुरी प्रदान केली.

# ग्रामीण भागातील लाजेस कुंटणखाण्यंचे मार्गावर

## संबंधित विभागांनी वेळीच पावले उचलावी



■ महासागर प्रतिनिधी
काटोल ,दि. १८ जून:

सध्या स्थितीत नागपूर (ग्रा) जिल्ह्यालगतच्या तालुक्यातील अधिकृत (अनाधिकृत) लाजेस व अनेक फार्म हाऊसेस विश्रांती गृहांऐवजी कुंटण खाण्यांचा मार्गावर जात असल्याचे दिसून येते आहेत.

सावनेर, कामठी, नागपूर (ग्रा, बाजार गाव),हिंगणा, उमरेड, रामटेक नंतर आता काटोल(कोंढाळी) नरखेड नागरी व ग्रामीण भागातील लाजेस मधे तरूणाई सह आंबटशौकीनांचे अड्डे बनत चालले आहेत. खरेतर! शहरी भागातील किंवा नागरी भागातील नागरिकांना आपल्या व्यवसाया दरम्यान किंवा विशिष्ठ सोहळ्या दरम्यान विश्रांती साठी थांबा त्याकरिता विश्रांतीगृह चा अर्थ *लाज* म्हणून संबोधले जाते. मात्र १८चे वर मुली तरूणी किंवा २१चे वर युवक ह्या वयोगटावरिल तरूणाई ही आपल्याला स्वराचाला परवाना समजतात की काय ?

१८/२१वयोगटातील तरूणाई किंवा त्या वरिल वयोगटातील आंबटशौकीन आपले आंबट शौकाचे चोचले पुरवण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील लगतच्या अधिकृत किंवा अनाधिकृत लाजेस चा आर्थिक किंमत मोजून उपयोग करतात. व लाजस संचालकांना संबधीतीत आंबटशौकिनां कडून एक-दोनतासातच २४ तासांची किंमत मिळत आहे तर तो लाज संचालक १८/२१वयोगटातील कोणत्याही जोडप्याला एक दोन तासाकरीता लाजची रूम उपलब्ध करून देत आहोत.

सावनेर -कामठी-रामटेक तालुक्यातील लाजस वर मागील एका वर्षात अनेदा धाडी पडत आहे, (तरिही अवैध धंदे सुरू आहेत) या करिता तरूणाई व आंबटशौकिनांनी आपले चोचले पुरवण्यासाठी काटोल तालुक्यातील कोंढाळी भागातील लाजेस -कम्हाबे,सोटस चां मोठ्या प्रमाणावर वापर होत असून समाजातील वाममार्गाला चालना मिळत आहे.

समाजातील वाममार्गाला थोपविण्यासाठी समाजातील सर्वंच घटकांची जबाबदारी आहे. या करिता राजस्व किंवा पोलीस विभागाचे सामाजिक सुरक्षा विंग कडून देखरेखी ची जबाबदारी असली तरी आर्थिक सहयोग राशी चे ओझ्या खाली दबलेले संबधीतीत विभागाकडून आलेल्या तक्रारींची दखल घेण्यासाठी नियमावली ची खानापुर्ती करत , शासकिय १८/२१ वयोगटाची नियमावलीचा बहानापुढे करत व खिसे गरम करून परततात हे समाजआरोग्य धोक्यात घालण्यास अप्रत्यक्ष मदतच करतात.

पोलीस खात्यांचे वरिष्ठ कार्यालयाकडून केसेस करण्याचे आदेश/निर्देश झाले तेंव्हाच काही लाजेस वर कार्यवाही केल्याची माहिती वृत्तपत्रांमधून वाचल्यांन येते.

खरे तर आता नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक लाजेस अनेक ढाबा कम लाजेस, तसेच अनेक रिसोर्टस व फार्म हाऊसवर सुरू असलेल्या देह व्यवसाय हळु हळु कुंटणखान्यांची जागा घेत चालले आहे एवढे नक्की...

प्रकरणी लाजेस , रिसोर्टस, फार्म हाऊसे, ढाबे कम लाजेस, हाटेल कम लाजेस सुरू करण्यासाठी लागणारी नियमावली जाहीर केल्यास अनैतिक/अवैध/शारिरीक संबंध व्यवसाय केंद्रांच्या तक्रार करता येईल. त्यावर गृह खाते +स्थानिक पोली स्टेशन/ सामाजिक सुरक्षा विंग तसेच राजस्व विभाग व एंटरटेनमेंट विभागाकडून कडक कारवाई केल्यास ग्रामीण भागातील सामाजिक आरोग्य स्वास्थ्य बिघडणार नाही याची काळजी घ्यावी हि अपेक्षा समाजाकडून संबधीतीत विभागांचे प्रमुख जिल्हाधिकारी यांचे कडे करण्यात येत आहे.

**जाहिरनामा**

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क.ली /प्रस्तु-२/तह. नाग (शहर)/कावि - ३०१/२०२५
दिनांक : १२/०६/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. श्री कृष्णराव रामचंद्र पळसोदकर रा. साफल्य बी-४ लक्ष्मीनगर नागपूर यांचा अर्ज दिनांक २०/०५/२०२५

ज्याअर्थी अर्जदार श्री कृष्णराव रामचंद्र पळसोदकर रा. साफल्य बी-४ लक्ष्मीनगर नागपूर यांनी मुलाच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू मंदार कृष्णराव पळसोदकर यांचा जन्म ०१/०९/१९८० रोजी राहत्या घरी नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता

## क्राईम कॉर्नर

### शहरात चोरी, मध्यप्रदेशात विक्री

■ **नागपूर,दि. १८ जून:** नागपूर, क्राईम रिपोर्टर. शहराच्या विविध भागातून दुचाकी वाहनांची चोरी केल्यानंतर भावाच्या माध्यमातून मध्यप्रदेशात त्यांची विक्री करणाऱ्या अट्टल वाहन चोराच्या गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने मुसक्या आवळल्या. गुन्ह्यात सहकार्य करणाऱ्या त्याच्या भावालाही पोलिसांनी अटक केली. चौकशीत आरोपीने केवळ शहरच नाहीतर नागपूर ग्रामीण व आसपासच्या जिल्ह्यातूनही वाहन चोरी केल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून ३१ दुचाकी वाहन जप्त केले आहेत. राहुल सुखचंद ठाकरे (४३) रा. मिनीमातानगर, कळमना आणि दिनेश सुखचंद ठाकरे (३७) रा. सातनेर, बैतूल, मध्यप्रदेश अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

राहुल हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध वाहन चोरीच्या अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. फिर्यादी रमेश दादाराव इंगळे (५९) रा. एलआयजी म्हाडा कॉलनी, आठवा मैल, वाडी यांनी गत १२ मेच्या रात्री त्यांची एमएच-४०/बीटी-५३३६ क्रमांकाची मोटारसायकल परिसरातील राठी हॉस्पिटलजवळ पार्क केली होती. ८ ते ८.३० वाजता दरम्यान कोणीतरी त्यांची मोटारसायकल चोरून नेली. त्यांच्या तक्रारीवरून वाडी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. गुन्हे शाखा युनिट १ चे पथकही या गुन्ह्याचा तपास करीत होते. सीसीटीव्ही फुटेजवरून राहुलचा सुगावा लागला. पोलिसांनी राहुलची माहिती काढण्यासाठी खबऱ्यांना कामावर लावले. दरम्यान ही चोरी राहुलनेच केली असल्याची खात्री पटली. तसेच राहुल शहराच्या विविध भागातून वाहन चोरी करतो. त्यानंतर चोरीचे वाहन मध्यप्रदेशात नेऊन भावाच्या माध्यमातून त्यांची आसपासच्या गावात विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी थेट दिनेशच्या घरी धडक दिली. त्याला ताब्यात घेऊन अंगणात ठेवलेल्या दोन दुचाकी वाहनांबाबत विचारले असता त्याने ती चोरीची असून राहुलने विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोन्ही वाहन जप्त करून दिनेशला अटक केली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी थेट दिनेशच्या घरी धडक दिली. त्याला ताब्यात घेऊन अंगणात ठेवलेल्या दोन दुचाकी वाहनांबाबत विचारले असता त्याने ती चोरीची असून राहुलने विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोन्ही वाहन जप्त करून दिनेशला अटक केली. नागपुरात आणून त्यांची सखोल चौकशी केली असता त्याने आसपासच्या गावात आतापर्यंत १७ वाहन विकल्याची माहिती दिली. पोलिसांनी ती सर्व वाहने जप्त करून राहुलला पकडण्यासाठी सापळा रचला.

राहुल कळमना परिसरातील मोरे लॉजमध्ये लपून राहात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी लॉजवर धाड टाकून राहुलला बेड्या ठोकल्या. लॉजखालीही पोलिसांना चोरीच्या दोन मोटारसायकल आढळल्या. पोलिसांनी त्याची आणखी सखोल चौकशी केली असता त्याने आसपासच्या गावात १२ दुचाकी वाहन विकल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्याच्या माहितीवरून त्या १२ दुचाकीही जप्त केल्या. अशा प्रकारे दोन्ही आरोपींकडून पोलिसांनी एकूण ३१ वाहने जप्त केली. ही वाहने नागपूर शहरच्या वाडी, वाठोडा, नंदनवन, बेलतरोडी, हुडकेश्वर, पारडी, ग्रामीणच्या कोंढाळी, जलालखेडासह वर्धा, भंडारा, वरूड, अमरावती व मध्यप्रदेशातील विविध भागातून चोरी केल्या होत्या. या घटनेचा पुढील तपास वाडी पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोनि अमोल देशमुख, सपोनि सचिन भोंडे, पोहवा रितेश तुमडाम, योगेश सेलुकर, रवींद्र खेडेकर, नितीन वासनिक, हेमंत लोणारे, रवी अहीर, सुनीत गुजर, आदींनी केली.

### वाडीतून २ तडीपार गजाआड

■ **नागपूर,दि. १८ जून:** वाडी पोलिसांनी गस्तीदरम्यान वेगवेगळ्या कारवाईमध्ये दोन तडीपार गुंडांना विना परवानगी परिसरात फिरताना अटक केली. सुशील उर्फ झिंगा विजय कांबळे (२६) आणि विजय उर्फ गोलू दिलीप मोरे (३६) दोन्ही रा. आंबेडकरनगर, कंट्रोल वाडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

मंगळवारी रात्री १२.३० वाजताच्या सुमारास वाडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत महादेवनगर पहाडी परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान सुशील पथकाला पाहून पळताना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. गुन्हेगारी अभिलेख तपासला असता डिसेंबर २०२४ मध्ये झोन १ च्या डीसीपींनी त्याला दोन वर्षांसाठी तडीपार केले असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ त्याला अटक केली. दुसरी कारवाई रात्री १.२० वाजताच्या सुमारास करण्यात आली. अमरावती मार्गावरून गोलूला ताब्यात घेतले. त्यालाही डिसेंबरमध्येच २ वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. पोलिसांनी गोलू यालाही अटक केली. दोन्ही आरोपींविरुद्ध तडीपारीचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला.

### गोंदियातून ट्रकद्वारे गोवंशांची शहरात तस्करी

**चालक अटकेत, २८ जनावरांची सुटका**

■ **नागपूर,दि. १८ जून:** गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर पारडी परिसरात सापळा रचून गोवंशांची तस्करी करणारा ट्रक पकडला. झडतीदरम्यान ट्रकमध्ये २८ गोवंश मिळाले. पोलिसांनी ट्रक चालकाला अटक करून गोवंशांची सुटका केली. चौकशीत चालकाने गोंदियातून ही जनावरे नागपूरला कत्तलीसाठी आणल्याची माहिती दिली. पोलिसांनी गोवंश मागवणाऱ्या आरोपीविरुद्धही गुन्हा नोंदविला आहे. तो फरार असल्याची माहिती मिळाली आहे. दीक्षांत जयचंद धनगाव (२६) रा. मिसपिरी, देवरी-गोंदियाअसे अटकेतील चालकाचे नाव आहे. फरार आरोपी इमरान हाजी रा. भाजी बाजार, कामठीचा शोध सुरू आहे.

मंगळवारी रात्री गुन्हे शाखेचे पथक पारडी ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान गोंदियातून गोवंशांची कत्तलीसाठी नागपुरात ट्रकद्वारे तस्करी होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी भंडारा मार्गावर कापसी परिसरात सापळा रचला. माहितीच्या आधारावर पोलिसांनी एमएच-३५/एजे-५६४४क्रमांकाचा ट्रक अडवला. पंचासमोर झडती घेतली असता ट्रकमध्ये २८ गोवंश मिळाले. त्यांना अत्यंत क्रुरपणे कोंबून ठेवलेले होते. त्यांच्या चारा-पाण्याचीही व्यवस्था केली नव्हती. त्यामुळे काही गोवंशांची स्थिती दयनिय झाली होती. पोलिसांनी तत्काळ गोवंशांची सुटका करून त्यांची गोशाळेत रवानगी केली. चालक दीक्षांतला अटक करून ट्रक जप्त केला. चौकशीत दीक्षांतने सांगितले की, ही जनावरे कामठीच्या इमरान हाजी याने मागवली होती. पोलिसांनी इमरानविरुद्ध गुन्ह्याची नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे. ही कारवाई पोनि संदीप बुवा आणि त्यांच्या पथकाने केली.

### दुचाकीच्या धडकेत कुल्फी विक्रेत्याच्या मृत्यू

■ **नागपूर,दि. १८ जून:** एका तरुणाने भरधाव वाहन चालवत एका कुल्फी विक्रेत्याला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी कुल्फी विक्रेत्याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. नागेश पंजाबराव कलाने (३२) रा. ताजनगर, मानकापूर असे मृताचे नाव आहे.

नागेश हा मुळचा अमरावतीच्या तामसवाडी येथील रहिवासी होते. ताजनगरात नसीम सय्यद मंसूर यांच्या घरी भाड्याने राहात होते. घरीच ते कुल्फी बनवून ठेल्यावर वेगवेगळ्या भागात जाऊन विकत होता. मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास तो ठेला घेऊन बोखारा मार्गाने जात होता. ऑर्चिड स्कूलसमोर मोटारसायकल क्र. एमएच-४०/सीजी-५४७४क्रमांकाच्या चालकाने त्याला मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. नागेश खाली पडून गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. डोक्याला गंभीर दुखापत असल्याने त्याला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. उपचारादरम्यान रात्री २ वाजताच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## नशामुक्त समाज घडविण्यासाठी प्रतिबद्ध

**✻ पोलिस आयुक्तांचे युवकांना पुढे येण्याचे आवाहन ✻ ऑपरेशन थंडरमुळे गुन्हेगारांत धडकी ✻**

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:**
विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी नशामुक्त समाजाची संकल्पना अमलात आणली आहे. नशा मुक्त समाज घडविण्यासाठी ऑपरेशन थंडर या नावाने मोहीम राबविण्यात येत आहे. व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना झळ पोहोचल्यानंतर ते व्यसन मुक्तीचा संकल्प घेतात. मात्र, तेवढ्याच प्रमाणात नवे तयार होतात. हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे नशामुक्त समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढे येण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात विशेषत: युवकांत जनजागृती केली जाणार आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी दिली. यावेळी सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, डीआयजी वसंत परदेशी, राजेंद्र दाभाडे, शिवाजी राठोड, डीसीपी निकेतन कदम, राहुल माकणीकर, श्वेता खेडकर, लोहित मतानी, महक स्वामी आणि अश्विनी पाटील यांचीही उपस्थिती होती.

पोलिस आयुक्तांनी सांगितले की, अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामाध्यमातून समाजातील शेवटच्या वर्गापर्यंत जनजागृती करण्यात येईल. यासाठी शाळा, महाविद्यालय, समाजिक संस्थांची मदत घेतली जाईल. ऑपरेशन थंडर-एकत्रीवूया नशा मुक्त समाज घडवूया या मोहिमेतंर्गत अंमली पदार्थ विक्री, सेवन आणि जवळ बाळगणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध कारवाया सुरू आहे. जेणे करून शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसेल. अंमली पदार्थ मुक्त शहर व्हावे या करिता जनजागृतीपर कार्यक्रम आणि अंमली पदार्थ विरोधी कारवाई राबविली जात आहे, असेही डॉ. सिंगल यांनी सांगितले. जनजागृतीपर कार्यक्रमात ज्यांनी नशा मुक्तीचा संकल्प घेतला, असे व्यक्ती स्वत:चे अनुभव सांगतील. त्यांच्या अनुभवातून व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना व्यसनातून मुक्त होण्यासाठी मार्ग मिळेल. शाळा, महाविद्यालयाच्या जवळपास काही पानटपऱ्या असतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. यासंदर्भात शाळा व्यवस्थापनाने सुद्धा लक्ष द्यावे, अशा आशयाचे पत्र दिले आहे. तसेच महाविद्यालयात न्टी नारकोटिक्स क्लब सुरू करावे आणि समूपदेशक नियुक्त करावा, अशा सूचना देखील महाविद्यालय व्यवस्थापनाला पत्राद्वारे दिल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

ऑपरेशन थंडर अंतर्गत १४ महिन्यात ५४० गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. ६ कोटी ३९ लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून एकूण ८ कोटी ६५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सततच्या कारवाईमुळे अमली पदार्थाची विक्री, खरेदीवर बरेच नियंत्रण मिळाले आहे.

२० जून रोजी व्यसनमुक्तीकरिता मानकापूर स्टेडियम येथे सामूहिक शपथ. २० ते २६ जून दरम्यान रिल, पोस्टर आणि निबंध स्पर्धा, शाळा, महाविद्यालय, सोशल मीडिया, पोलिस ठाणे आणि सार्वजनिक ठिकाणी. न्टी ड्रग्स म्बेसेडर आणि जनजागृती, याच कालावधीत शाळा, महाविद्यालयात परिसंवाद, २१ ते २४ दरम्यान अंमली पदार्थ विरोधी एकता रॅली, २१, २२ जून रोजी सर्व ठाण्यात क्रीडा स्पर्धा, २३ व २४ जून रोजी पोस्टर, घोषवाक्य स्पर्धा. २३ जून रोजी लघु नाट्य, २४ जून रोजी अंमली एनडीपीएस मुद्देमाल नाश मोहीम. २५ जून रोजी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या उपस्थितीत ऑनलाईन चर्चा आणि २६ जून रोजी सुरेश भट सभागृहात कॉफी टेबल बुकचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

## नाले सफाई तातडीने पूर्ण करा

**आ. प्रवीण दटके यांनी मनपा प्रशासनाला धरले धारेवर**



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:**
पावसाळा तोंडावर असताना नागपूर आणि विशेषतः मध्य नागपूरातील नदी नाल्यांच्या सफाई बाबत आमदार दटके यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. आमदार प्रवीण दटके यांनी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त आणि अधिकाऱ्यांसोबत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत नालेसफाई ,पाणीसाठा आणि स्वच्छतेसंदर्भात परिस्थितीचा आढावा घेतला.

मध्य नागपुरातील हत्ती नाला, राहतेकर वाडी नाला, जामदार शाळेजवळील नाला, लेंडी तलावाजवळील नाला, तसेच रमण विज्ञान केंद्राजवळील नाला या ठिकाणची स्वच्छता प्राधान्याने करण्याबाबत सूचना दिल्या. नाल्यांत साचणारे पाणी, कचऱ्यामुळे निर्माण होणारा अडथळा आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता स्वच्छतेच्या कामांना तातडीने सुरूवात करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. गांधीबाग, सतरंजीपुरा, धंतोली, आसीनगर आणि हनुमान नगर झोन अंतर्गत येणाऱ्या या भागातील स्वच्छता तसेच पावसाळी नाल्यासंदर्भातील अडचणींबाबत त्वरित विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी आ दटके यांना आश्वासित केले.

या बैठकीत नागपूरचे माजी महापौर व भाजपा महानगर अध्यक्ष श्री दयाशंकर तिवारी, तसेच संबंधित झोनचे अधिकारी, माजी नगरसेवक, वॉर्ड अध्यक्ष, प्रभाग संयोजक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नाग नदीच्या स्वच्छतेबाबतही योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त यांनी सांगितले, पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व प्रलंबित स्वच्छतेची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे अशा सूचना आ प्रवीण दटके यांनी दिल्या.

## मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा शुक्रवारपासून

**देशातील १५ वर्षाखालील कुस्तीपटूंची नागपुरात रंगणार दंगल**

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:**
नागपूर महानगरपालिका व शहर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वर्षाखालील मुलांची मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा २०२५ येत्या २० जूनपासून मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री मान. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या २१ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री मान. श्री. नितीन गडकरी राहणार आहेत.

मुलांमध्ये भारतीय खेळांबद्दल आकर्षण निर्माण व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाने यासाठी पुढाकार घेतला आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सहकार व नागरी उड्डयण राज्यमंत्री मान. श्री. मुरलीधर मोहोळ, राज्याचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मान. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री मान. श्री. दत्तात्रय भरणे, राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री मान. श्री. आशीष जयस्वाल, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष श्री. संजय कुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस उपस्थित राहणार आहेत.

ही स्पर्धा तीन दिवस चालणार असून, यात देशातील १५ वर्षाखालील उदयोन्मुख कुस्तीपटू सहभागी होणार आहेत. येत्या शुक्रवारपासून सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत या स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान केली जाणार आहेत. या स्पर्धेचा समारोप येत्या २२ जूनरोजी सायंकाळी ७ वाजता मुख्यमंत्री मान. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते होणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री मान. श्री. नितीन गडकरी भूषविणार आहेत. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय नागरी उड्डयण व सहकार राज्यमंत्री मान. श्री. मुरलीधर मोहोळ, राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मान. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री मान. श्री. दत्तात्रय भरणे, राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री मान. श्री. आशीष जयस्वाल, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष श्री. संजयकुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांच्यासह नागपूर जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदार उपस्थित राहणार असल्याची माहिती शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आमदार श्री. संदीप जोशी, महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त श्री. विनोद जाधव, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर, आयोजन समितीचे उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे यांनी दिली आहे.

### इमारतीवरून पडल्याने मजुराचा मृत्यू

■ **नागपूर,दि. १८ जून:** निर्माणाधीन इमारतीत काम करताना खाली पडल्याने एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत घडली. नीतेश पन्नालाल झारिया (४५) असे मृताचे नाव आहे. नीतेश मुळचा शिवनीच्या घनसौर येथील रहिवासी होता. मजुरासाठी नागपुरात आला होता आणि इतर मजुरांसह टेकानाका परिसरात राहात होता. जरीपटकाच्या कस्तूरबानगरात ग्यानचंदानी नावाच्या बिल्डरकडून समादा अपार्टमेंटचे बांधकाम सुरू आहे. या अपार्टमेंटच्या बांधकामावर नीतेश गत एक वर्षापासून मिस्त्री काम करीत होता. सकाळी १० वाजताच्या सुमारास तो बल्लीच्या चैलीवर उभा राहून इमारतीच्या सहाव्या माळ्यावर प्लास्टरचे काम करीत होता. या दरम्यान चैली तुटली आणि तो थेट सहाव्या माळ्यावर चवथ्या माळ्यावर पडला.

## कळमेश्वर तालुक्यात बजरंग दलाची शाखा



■ **महासागर प्रतिनिधी**
**कळमेश्वर,दि. १८ जून:**
कळमेश्वर येथील स्थानीय विश्रामगृहात विश्व हिंदू परिषद बजरंग दलाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी रामटेक जिल्हा मंत्री मंगलप्रसाद घुगे व रामटेक जिल्हा सह संयोजक संकेत बहें यांच्या उपस्थितीत कळमेश्वर तालुक्याची व शहराची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

यामध्ये तालुका अध्यक्ष म्हणून अजय वानखेडे , उपाध्यक्षपदी वैभव फुलारे मंत्री म्हणून स्वप्नील भुसारी, सहमंत्री लोकेश कावडकर, संयोजक ऋषब राऊत, सह संयोजक यश राऊत, सत्संग प्रमुख आरध्य डफरे, गोरक्षा प्रमुख योगराज तेजी, कळमेश्वर नगर मंत्री म्हणून योगेश भुसारी, सह मंत्री तन्मय बरापात्रे व मेघराज बांबल, संयोजक सार्थक पोतले, बल उपासना प्रमुख मृणाल तपासे, विध्यार्थी प्रमुख वेदांत तपासे ,

व दुर्गा वाहिनी संयोजिका म्हणून परिनिता ठाकरे म्हणून विविध पदावर घोषणा करण्यात आल्या व सर्वांना त्यांचा जबादाऱ्या सांगण्यात आल्या व कळमेश्वर तालुक्यात बजरंगदलाचे काम वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. आभार दिनेश कोवे व रितेश कामडी यांनी मानले.

## एनएमआरडीएच्या क्षेत्रात नाग नदीची स्वच्छता करण्याचे मनपा आयुक्तांचे निर्देश





■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:**
केडीके अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ असलेल्या पिवळी नदी आणि नाग नदीच्या संगमाच्या पुढे नदीची स्वच्छता, खोलीकरण व रुंदीकरण नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) करावे असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज बुधवारी या भागाची पाहणी केली. यावेळी मुख्य अभियंता श्री. मनोज तालेवार, सहायक आयुक्त श्री. विजय थुल, कार्यकारी अभियंता श्री. संजय माटे उपस्थित होते.

आयुक्तांनी स्मार्ट सिटी क्षेत्रातील करारेनगर येथील नागनदीवर सुरु असलेल्या पुलाचे बांधकामाचे सुद्धा निरीक्षण केले. या पुलाच्या सुरु असलेल्या बांधकामामुळे पाण्याचा प्रवाह बाधीत होण्याची शक्यता आहे. आयुक्तांनी हा अडथळा काढून प्रवाह सुरुळीत करण्याचे निर्देश दिले.

## न्यू कैलाश नगरात कुत्र्यांचा आतंक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:** दक्षिण नागपूरच्या न्यू कैलास नगर व प्रगती नगरात कुत्र्यांचा आतंक असून दररोज लहान मोठ्यांना भटके कुत्रे चावत आहेत. काल १७ जून रोजी रात्री बोधी तामगाडगे नावाच्या सात वर्षीय मुलीला कुत्रा चावला. तिच्यासोबत तिचे आजोबा सुद्धा होते. यापूर्वी बोधी च्या आईला सुद्धा याच ठिकाणी कुत्र्याने चावा घेतला होता. न्यू कैलास नगर व प्रगती नगर च्या सीमेवरून जाणाऱ्या डॉ आंबेडकर मार्गावर हे ठिकाण आहे. येथील बन्सीविला, प्रगती नगर बोर्ड व कुलकर्णी यांचे घर या ठिकाणी हे कुत्रे रात्रंदिवस बसून असतात. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांच्या मागे धावतात, या परिसरात या कुत्र्यांची दहशत आहे. या मार्गावरून मेडिकल कॉलनी च्या बास्केटबॉल कोर्ट व गार्डनमध्ये लहान मुले जात असतात, त्यातील अनेकांच्या मागे कुत्रे धावले आहेत व चावले सुद्धा आहेत.

## शाळा सुरू करण्याच्या निर्णयावर समन्वय समितीचा आक्षेप



■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी ,दि. १८ जून:**
शाळा २३ जूनपासून सुरू करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयाने काढलेल्या पत्राचा निषेध नोंदवत मंगळवार १७ जुन रोजी शिक्षण समन्वय समिती, जिल्हा नागपूरच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे यांची भेट घेतली. संघटनांना विश्वासात न घेता अचानक निर्णय घेण्यात आल्याचा त्यांनी जाहीर विरोध केला.

कॅलेंडर वर्ष २०२५ साठीच्या शालेय सुट्ट्यांचे नियोजन जानेवारी महिन्यात शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) रोहिणी कुंभार यांच्या अध्यक्षतेखालील संघटना सभेत ठरले होते. त्या पार्श्वभूमीवर १६ जून रोजी शिक्षण विभागाने शाळा २३ जूनपासून सुरू करण्याचे निर्देश दिल्याने संघटनांमध्ये नाराजी निर्माण झाली.

या बैठकीत शिक्षणाधिकारी रोकडे यांनी स्पष्ट केले की, शासन स्तरावरून मिळालेल्या निर्देशांनुसारच संयुक्त पत्र काढण्यात आले असून, संघटनांशी चर्चा न होऊ शकल्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली.

त्याचबरोबर, ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी सहा दिवस अतिरिक्त सुट्ट्यांचे पुनर्नियोजन करण्यात येईल व शिक्षकांना त्या सुट्ट्यांचा लाभ मिळेल, असे आश्वासन शिक्षणाधिकारी रोकडे यांनी दिले. तसेच, जून महिन्यातील वेतनात वाहतुक भत्ता टॅबच्या दुरुस्तीसह ८ दिवसांचा वाहतुक भत्ता दोन दिवसांत वितरित केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी समन्वय समितीच्या सर्व प्रमुख संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हळदगांव गट ग्रामपंचायत येथे प्रलंबित रस्त्याच्या कामाकरिता गावकऱ्यांनी केले आंदोलन




■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. १८ जून:**
हळदगांव गट ग्रामपंचायत येथे प्रलंबित असलेल्या रोड कामाकरिता समस्त गावकऱ्यांनी मिळून आंदोल करण्यात आले .गेल्या पाच वर्षा पासून प्रलंबित असलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली असून दैनंदिन अवस्था खूप वाईट परिस्थीमधे आहे. चांपा,हळदगाव,परसोडी,सायकी,दव्हा,खापरी,ह्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत त्यामुळे नागरिकांना जाण्या येण्यास खूप त्रास सहन करावा लागतोय म्हणून चांपा ते सायकी दव्हा खापरी सिमेंटीकरण करावा या करिता २२ गाव मिळून चक्का जाम धरणा आंदोलन करण्यात आले या आंदोलनाचे नेतृत्व करणारे लक्ष्मीकांत गुंडेराव धोपटे सामाजिक कार्यकर्ता , गोविंदराव ढगे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, शशिकांत मेश्राम बीएस पी , सुनील पोहनकर सामाजिक कार्यकर्ता रुपेश हजारे सामाजिक कार्यकर्ता , गोविंदराव हाते सरपंच व सचीन मोटघरे यांचा नेतृत्वात करण्यात आले असून आंदोलनात मुख्य भेट देणारे आनंदराव राऊत जिल्हाध्यक्ष भाजपा ग्रामीण नागपूर, उमरेड चे तहसीलदार मनोहर चव्हाण तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व मंडळ अधिकारी तलाठी तसेच किशोर डिकोडवर महाराष्ट्र प्रदेश महामंत्री बजरंगदल, हरिभाऊ शिंदे गावातील उपस्थित नागरीक गोविंदराव हातें सरपंच ,प्रशांत व्यापारी ,निखिल धोपटे, नरेश नेवारे , रवी नेवारे, अश्विन उईके, सिकंदर शंकर छापेकर, जगदीश सोनवाणे, व समस्त गावकरी उपस्थित होते.

# ३ हजार रुपयांत वर्षभराचा फास्ट टॅग

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची महत्वाची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
एक ऐतहासिक पाऊल टाकत १५ ऑगस्ट २०२५ पासून ३ हजार रुपये किमतीचा फास्टटॅग आधारित वार्षिक पास सुरू करण्यात येणार आहे. हा पास सुरू होण्याच्या तारखेपासन एक वर्षापर्यंत किंवा २०० यात्रा यापैकी जे पहिले असेल तोपर्यंत तो वैध राहील.

हा पास केवळ गैर व्यावसायिक खासगी वाहने (कार-जीप-व्हॅन आदी) यासाठी विशेष रुपात तयार करण्यात आला आहे. तो देशभरातील राष्ट्रीय महामार्गवर तो चालणार आहे. वाषिक पाससाठी लवकरच महामार्ग ॲप व एनएचआच्या संकेतस्थळावर एक स्वतत्र लिंक उपलब्ध केली जाणर आहे. ज्यामुळे पास उपलब्धता अधिक सुलभ होणार आहे.




पास उपलब्ध करून देण्याचे धोरण ६० किलोमीटर परिसरात असलेल्या टोल नाक्यांपासून तर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या कस्सन्र्सला अधोरेखीत करेल तसेच टोल नाक्यावर कर देण्याची प्रक्रियाही सुलभ होईल. टोल नाक्यावर होणारा विलंब कमी होईल. नाक्यावर होणारी वाहनांची गर्दीही कमी होईल तसेच विविध कारणांमुळे नाक्यांवर होणारे वादही कमी होतील, असा विश्वास नितीन गडकरींकडुन व्यक्त करण्यात आला आहे.



**१० हजाराची बचत**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्यासाठी वार्षिक पासची योजना घोषित केली. या योजनेमुळे वाहन धारकांची वर्षाला १० हजार रुपयांची बचत होईल, असा दावा गडकरी यांनी केला.

गडकरी यांनी यासंदर्भात एक निवेदन जारी केले आहे. त्यानुसार वाहन मालकाला तीन हजार रुपयात पास खरेदी करावी लागेल. त्याची वैधता एक वषार्ची असेल. ती फक्त राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्यावरच वैध असेल.

राज्य शासनाच्या किंवा इतर सरकारी प्राधिकरणाच्या टोल नाक्यावर ती चालणार नाही. या पासवर एका वर्षात २०० फेऱ्या मारता येईल. सध्या प्रत्येक टोल वर ५० ते ८० रुपयांपासून पुढे टोल आकारला जातो. या पासमुळे तो केवळ १५ रुपये लागेल. यामुळे वाहन धारकांची पैसे तर वाचेलच वेळेची बचत ही होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बोलून दाखवला आहे.

# स्वतःच्या बचावाकरिता ठाण्यात पोहोचला अभिषेक

## अमनच्या मारेकऱ्यांना २० पर्यंत पोलीस कोठडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
प्रेम त्रिकोणातून विद्यार्थ्याच्या हत्या प्रकरणात मानकापूर पोलिसांनी ३ आरोपींना अटक केली होती, तर एका अल्पवयीनला ताब्यात घेतले होते. अटकेतील तिन्ही आरोपींना पोलिसांनी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना २० जूनपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

लकी सुनील मेंढेववार (१९) रा. स्विपर कॉलनी, गंगाबाई घाट, अभिषेक राजेश कटारिया (२५) रा. गोरेवाडा आणि सुलभ उर्फ राज धर्मेंद्र ठाकूर (२५) रा. विशाखा सोसायटी, गोरेवाडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. १७ वर्षीय अल्पवयीन आरोपीला बाल न्याय मंडळाने बाल सुधारगृहात पाठविले आहे.

अभिषेक नावाच्या आरोपीने रविवारी दुपारी मानकापूर ठाण्यात पोहोचून घटनेची माहिती दिल्यानंतर शनिवारी रात्री घडलेले हे हत्याकांड उघडकीस आले होते. अभिषेकला भीती होती की, अमनच्या खुनाचा खुलासा झाला तर सर्वांना अटक होईल आणि त्याला तुरुंगात जावे लागेल.

स्वतःला वाचविण्यासाठी तो स्वतः ठाण्यात पोहोचला आणि पोलिसांना लकी व अमनमध्ये झालेल्या भांडणाची माहिती दिली. तसेच लकीने अमनच्या छातीत चाकू भोसकून खून केल्याचे सांगितले. इकडे रात्र होऊनही अमन घरी न पोहोचल्याने कुटुंबीय चिंतीत झाले. रात्रभर त्याचा शोध घेण्यात आला, मात्र तो मिळाला नाही.

अभिषेकसह पोलिस घटनास्थळी पोहोचलेच होते की, अमनचे कुटुंबीय तो बेपत्ता असल्याची तक्रार घेऊन ठाण्यात पोहोचले. तत्काळ त्यांच्याकडून अमनचा फोटो मागवण्यात आला. त्यानंतर खून झालेला तरुण अमनच असल्याची खात्री पटली.

वडिलांकडून मृतदेहाची ओळख पटवल्यानंतर पोलिसांनी चारही आरोपींना पकडले. लकी, अभिषेक आणि सुलभपैकी कोणाचाही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही, मात्र अल्पवयीनविरुद्ध लकडगंज ठाण्यात खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद आहे.

अमनशी संबंधित लोकांनुसार, त्याने तरुणीशी मैत्री तोडली होती. मात्र लकीला अमन अजूनही त्याच्या प्रेयसीच्या संपर्कात असून दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याचा संशय होता. त्यामुळे त्याने तरुणीच्या नावाने इंस्टाग्रामवर बनावट खाते उघडून अमनशी चॅटिंग केली. इंस्टाग्रामवरच मॅसेज करून अमनला भेटायला बोलावले. पोलिस या प्रकरणात तरुणीचीही विचारपूस करीत आहेत.

# एम. टेक. पदवीनंतर तरूणाने निवडला चोरीचा मार्ग

**जुगारात गमावले २३ लाख**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
नागपुरमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली. एम. टेक. पदवीधराला धंतोली पोलिसांनी चोरीच्या प्रकरणात अटक केली आहे.

पदवीधर चोराने मोठ्या बंगल्यांना लक्ष करत अनेक ठिकाणी चोऱ्या केल्या. तशी कबुली त्याने दिली. त्याची पदवीधर ते चोरी करण्यापर्यंतचा प्रवास धक्कादायक आहे.

एम. टेक. पदवी घेतल्यानंतर या तरुणाने आय. टी. कंपनीत नोकरी केली. त्यादरम्यान जुगारात २३ लाख गमावल्यावर तो चोरी करू लागला. आशिष रेडिमल्लाने असे चोरीच्या घटनेत अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

सदर तरुणाने एम. टेक. असे उच्च शिक्षण घेतले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार आरोपी आशिष रेडिमल्लाने एम. टेकचे शिक्षण घेतल्यावर पुणे आणि नागपूरच्या नावाजलेल्या आयटी कंपन्यांमध्ये नोकरी केली. नोकरी दरम्यान त्याची अनेक व्यक्तींसोबत मैत्री झाली. त्यात बरेच व्यक्ती वाईट मार्गावरील होते. दरम्यान वाईट मित्रांच्या संगतीमुळे त्याला जुगाराचे व्यसन लागले. हळू- हळू तो स्वतःच्या वेतनासह जमा केलेली पुंजीही जुगारात हरू लागला.

जुगाराच्या व्यसनामुळे त्याचे आयुष्य गुन्हेगारीच्या मार्गावर गेले. दरम्यान नागपुरातील धंतोली परिसरात राहणाऱ्या शीतल चिंतलवारच्या घरात चोरी झाली होती. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांकडून तपास सुरू केला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा स्केच तयार केले. प्राप्त माहितीच्या आधारे चंद्रपूर जिल्ह्यातील आशिष रेडिमल्लाला पकडण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीला पोलिसांनी आपला हिसका दाखवल्यावर त्याने नागपूरच्या इतर पोलिस ठाण्यांच्या परिसरातही चोरी केल्याची कबुली दिली आहे.

## किराणा दुकानातून दीड लाख चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
कॉटन मार्केटच्या महात्मा फुले बाजार परिसरात चोरांनी एका किराणा दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून १ लाख ४५ हजारांची रोकड चोरी केली. या प्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी सागर लक्ष्मण गोदानी (३९) रा. जरीपटकाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

सागर यांचे महात्मा फुले बाजारात आनंद किराणा स्टोअर आहे. रात्री ८.३० वाजताच्या सुमारास ते दुकान बंद करून घरी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. गल्ल्यातील १.४५ लाखांची रोकड चोरी करून पसार झाला.

सागर सोमवारी दुकानात आले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची फुटेज तपासली असता एक आरोपी पहाटेच्या सुमारास चोरी करताना दिसला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## सहा महिन्यापासून निराधार प्रतिक्षेत

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १८ :
निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मागील सहा महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याने अनेकांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे.

शासनाच्या विविध योजनेंतर्गत निराधार व्यक्तींना श्रावणबाळ, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना आणि अन्य योजनेत महिन्याकाठी १५०० रूपये मानधन दिले जाते . तथापि, मागच्या सहा महिन्यांपासून त्यांना मानधनाची रक्कम मिळाली नाही.

वृद्ध निराधार तहसील कार्यालय आणि संबंधित बँकेत जावून विचारपूस करतात . परंतु, शासनाकडून निधी आला नसल्याचे सांगून तहसील कार्यालयातून बोळवण केली जात असल्याचे समजते . बँकेत गेल्यानंतर सुद्धा त्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्याचे सांगण्यात येते . परिणामी, लाभार्थ्यांना निराश होवून परतावे लागत आहे.

शासनाच्या निराधार योजनेत विधवा, संजय गांधी निराधार योजना, घटस्फोटीत, वयोवृध्द दिव्यांग अशा लाभार्थ्यांना लाभ मिळतो. शासनाकडून मिळणारे या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मागील सहा महिन्यांपासून मिळत नसल्याने या योजनेचे लाभार्थी कमालीचे त्रस्त आहेत. त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

दुसरीकडे, लाडकी बहीण योजनेत संबंधितांच्या बँक खात्यात नियमितपणे मानधन जमा होत आहे. लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी तुपाशी तर निराधार योजनेचे लाभार्थी उपाशी अशी परिस्थिती दिसून येते . निराधार लाभार्थ्यांच्या खात्यात मानधन जमा करुन त्यांचा रोष कमी करावा, त्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे .

## खाजगी शाळा शिक्षक संघाची बैठक

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :
खाजगी शाळा शिक्षक संघाने शिक्षणाधिकारी माध्यमिक राजेंद्र पातळे यांच्यासोबत बैठक घेतली. शिक्षकांचे वेतन वेळेवर होण्यासाठी ई-कुबेर प्रणालीचा वापर करण्याबाबत चर्चा झाली. २०१६ पासून नियुक्त कनिष्ठ शिक्षकांची थकबाकी २०२३ मध्ये दिल्याचा मुद्दा उपस्थित झाला.

अनुकंपा नियुक्ती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, दिव्यांग आरक्षण, वैद्यकीय अर्ज, आणि जिल्ह्यातील सीबीएससी/आयसीएससी शाळांना जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या सुट्यांची अंमलबजावणी यावर चर्चा झाली. विविध प्रलंबित नियुक्त्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

माध्यमिक विभागात २८ कर्मचारी यांची गरज असतांना फक्त आठ कर्मचारी आहेत एकही उपशिक्षणाधिकारी नाही तरीही वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी ४८० प्रकरणास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे असे राजेंद्र पातळे यांनी सांगितले. जिल्ह्यातील सीबीएससी,आयसीएससी शाळांना मा.जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी घोषित करण्यात आलेल्या सुट्टींची अंमलबजावणी होत नसल्याचे शिक्षणाधिकारी यांचे निर्दशनास आणून देण्यात आले ,शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे कार्यालयात प्रलंबित वैद्यकीय अर्जास मंजूरी याबाबत चर्चा करण्यात आली.

# २३ जूनपासून होणार विदर्भातील शाळांचा शैक्षणिक वर्षारंभ



प्रत्येक जिल्ह्यात प्रवेशोत्सव कक्ष पहिल्या आठवड्यात सकाळी सत्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
नवीन शैक्षणिक सत्रात राज्यातील शाळा १६ जून पासून सुरू झाल्या आहे. तर, विदर्भातील शाळा सोमवार २३ जूनपासून सुरू होत आहेत.

विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम साजरा करावा लागणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. कक्षामध्ये आवश्यक कर्मचारी अधिकारी यांची नेमणूक करण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांची गुणवत्ता व मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येतो.विदर्भात शाळा २३ जूनपासून सुरू होत असल्याने २१ व २२ जून रोजी हा कक्ष सतत सुरू राहणार आहे. याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. शाळा प्रवेशोत्सवाबाबत आवश्यक पूर्वतयारी करण्याचे निर्देश देण्यात आले असून मागितलेली माहिती तत्काळ द्यावी लागणार आहे. शाळा प्रवेशोत्सव या उपक्रमाची माहिती तत्काळ त्याच दिवशी वरिष्ठ स्तरावर द्यावी लागणार असल्याने गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनला शाळा प्रणालीमध्ये शाळा भेटीचा अहवाल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२३ जून रोजी भेट देणारे लोकप्रतिनिधी किंवा अधिकारी यांच्या भेटीच्या अहवालाची नोंद त्याच दिवशी तत्काळ शाळा प्रणालीमध्ये करावी लागणार आहे. ही सुविधा प्रवेशोत्सवाच्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता बंद होणार असल्याने तत्पूवी सर्व माहिती शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

२३ जून ते २८ जून या पाच दिवस शाळा सकाळच्या सत्रात म्हणजे सकाळी ७ ते ११.४५ या कालावधीत घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २९ जून रोजी रविवार असल्याने सुट्टी राहील. ३० जूनपासून शाळा नियमित वेळेवर सुरू होणार आहेत.

## एसईसी नागपूरद्वारा योग जागरूकता प्रचार उपक्रम व चर्चासत्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाने १९ जून'२५ (गुरुवार) रोजी सायंकाळी ४ वाजता गुंजन येथे योग चर्चासत्र जागरूकता आणि प्रचार उपक्रमांवर एक चर्चासत्र आयोजित केले आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता प्रमुख पाहुणे तर अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीकांत चंद्रिकापुरे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भारती यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात, नागपूर येथील आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेतील प्रशिक्षित योग तज्ञ योगाबद्दल माहिती देत शारीरिक आणि मानसिक आरोग्य फायदे आणि दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करतील.

याप्रसंगी मंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहन योग आणि मानसिक आरोग्याचे फायदे घेऊ शकतात. संबंधितांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ड्रग्ज तस्कराचा पोलिसावर हल्ला

## जखमी शिपायावर उपचार सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
वस्तीत शस्त्राच्या धाकावर धुमाकूळ घालत असलेल्या ड्रग्ज तस्कराला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसावरच त्याने हल्ला केला. धक्काबुक्की करीत खाली पाडून जखमी केले.

ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत भांडेवाडी परिसरात घडली. शैलेश कुंभलकर असे जखमी पोलिसाचे नाव असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे घटनेच्या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक मंदा मनगटे आणि ठाण्याचे अंमलदार उपस्थित होते.

या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली आहे. किरण सडमाके (५५) असे आरोपीचे नाव आहे.

किरण हा अवैध दारू विक्री करायचा. गत काही दिवसांपासून तो अंमली पदार्थांच्या तस्करीत सक्रीय आहे. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. यापूर्वीही त्याच्यावर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

रात्री १० वाजताच्या सुमारास किरण याचा नातेवाईकांशी वाद झाला. त्यावरून त्याने चाकू घेऊन वस्तीत गोंधळ घालण्यास सुरूवात केली. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक मंदा मनगटे आणि पोलिस अंमलदार यांनी घटनास्थळ गाठले. आरोपीला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पोलिस कर्मचारी शैलेश आणि सहकारी आरोपीला पकडत असताना, त्याने चाकूचा धाक दाखविला. मात्र, त्यानंतरही शैलेशने त्याला पकडले.

त्यामुळे संतापलेल्या किरणने त्यांना धक्काबुक्की करून खाली पाडले. यामुळे शैलेश जखमी झाले. पोलिसांनी किरणला पकडून ठाण्यात आणले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तर जखमी पोलिस कर्मचाऱ्यास खाजगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# पावसाअभावी समस्यांत वाढ

■ राजेंद्र सांबारे, हिंगणा, दि. १८ :
नवतापच्या वेळी जेवढी उष्णता होती तेवढीच आताही आहे. प्रचंड उष्णता आहे. कुलर आणि पंखेही काम करत नाहीत. नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने आणि ते कुठून भरायचे म्हणून कुलर चालवणे देखील एक समस्या आहे.

कडक उन्हामुळे आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे लोकांना आधीच अडचणी येत होत्या. त्यांना आशा होती की मृग नक्षत्रानंतर पाऊस पडेल आणि मुसळधार पाऊस काही प्रमाणात आराम देईल. परंतु अद्याप पाऊस सुरू झालेला नाही आणि लोक चिंतेत आहेत. आता लोक फक्त म्हणत आहेत, बरखा राणी, कृपया मुसळधार पाऊस पाड. कडक उन्हामुळे लहान मुले, वृद्धांपासून ते रुग्णांपर्यंत सर्वांनाच अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. बेसा-मानेवाडा रस्त्यालगतच्या वस्त्यांमध्ये, बेसा, पिपला, मनीषनगर, बेलतरोडी आणि ग्रामीण भागात कडक उन्हामुळे लोक त्रस्त आहेत.



नक्षत्रात पाऊस नसल्याने बेसा, मनीष नगर येथील नागरिक त्रस्त आहेत. कडक उन्हामुळे लोकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे आणि आजारांचा धोका वाढला आहे. उष्णतेमुळे लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

लोकांना उष्णतेशी संबंधित आजार, डिहायड्रेशन आणि थकवा यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनातही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**हवामान बदलामुळे आजारांचा धोका**

उष्णता आणि पावसाअभावी आजारांचा धोका वाढला आहे. मलेरिया, अतिसार आणि इतर जलजन्य आजारांचा धोका वाढला आहे. लोकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

बेसा, मनीषनगर परिसरात तीव्र उष्णतेमुळे नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शहराचे तापमान सतत वाढत आहे, ज्यामुळे लोकांना उष्णतेच्या लाटा आणि उष्ण हवेचा सामना करावा लागत आहे. वीज संकट आणि पाण्याच्या कमतरतेमुळे ही समस्या आणखी वाढली आहे. पावसाअभावी परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. नागपूर हे भारतातील सर्वात उष्ण शहर आहे.

जून महिन्यात दिवसाचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहते असे या शहरात म्हटले जाते. शहराचे भौगोलिक स्थान आणि अनियंत्रित शहरीकरणामुळे ही समस्या वाढली आहे.

**नागरिकांनी वृक्षारोपणावर भर द्यावा नंदनवार**

बेसा पिपला नगरपंचायतीचे प्रशासक आणि मुख्याधिकारी भरत नंदनवार म्हणाले की, वाढते तापमान, पाऊस न पडणे आणि वेळेवर पाऊस पडणे हे पर्यावरणाचे असंतुलन आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी बेसा नगरपंचायतकडून वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनीही वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. झाडे थंड, थंड हवा, फळे देखील देतील, त्यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल आणि पावसाळ्यातही खूप फरक पडेल. वेळेवर पाऊस पडल्याने लोकांना दिलासा मिळेल.

प्रशासक नंदनवार म्हणाले की, भविष्यात अधिक उष्णता आणि पावसाचा अभाव टाळण्यासाठी लोकांनी आत्तापासूनच वृक्षारोपणाकडे विशेष लक्ष द्यावे आणि आजपासूनच झाडे लावण्याची प्रतिज्ञा घ्यावी आणि त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या वाढदिवस आणि स्मृतिदिनी झाडे लावावीत आणि त्यांच्या काळजीकडे विशेष लक्ष द्यावे.

# पेंच नदीत पाहिले मगरांचे नैसर्गिक अधिवास






## सालई, कोलितमारा गावातील विद्यार्थ्यांना समजले मगर संवर्धनाचे महत्त्व

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
जागतिक मगर दिनानिमित्त सातपुडा फाउंडेशन आणि पेंच व्याघ्र प्रकल्पाने विशेष शैक्षणिक उपक्रम राबवला. सालई आणि कोलितमारा या बफर गावांतील प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

सालई गावातील विद्यार्थ्यांनी सिल्लारी येथील अमलतास मोगली पर्यावरण शिक्षण केंद्रात टायगर टेल आणि घोटुल माहिती केंद्राला भेट दिली. तेथे त्यांना व्याघ्र, आदिवासी संस्कृती आणि जैवविविधतेची माहिती मिळाली. मोगली कॉन्फरन्स हॉलमध्ये मगरांवरील माहितीपट दाखवून संवाद सत्र घेण्यात आले.



कोलितमारा गावातील विद्यार्थ्यांनी पेंच नदीकाठची सफर केली. नागपूर परिसराची जीवनरेखा असलेल्या पेंच नदीत नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात ५३ मगर आणि अनेक अंडी घालण्याच्या जागा आढळल्या. विद्यार्थ्यांनी नदीकिनारे, दलदली पक्षी आणि मगरांच्या वावराचे पुरावे पाहिले.

सालई गावातील विद्यार्थ्यांनी दुपारी सिल्लारी गेटहून कॅन्टर सफारी केली. जुना बोट कॅम्प आणि मियावाकी लागवड क्षेत्राला भेट दिली. त्यांना जंगलातील खुणा, सूर्यस्नान करणाऱ्या मगरी आणि त्यांचे अधिवास समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाची संकल्पना सातपुडा फाउंडेशनचे उपसंचालक मंदार पिंगळे यांची होती.

पेंच व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मणकर यांचे पाठबळ लाभले. फाउंडेशनचे अधिराज सिंग, बंदू उईके, दिव्यम वाळके, निखिल कोहळे आणि राधिका भालवी यांनी कार्यक्रम यशस्वी केला.